

कथासंग्रह

# ऊन पावसाच्या खेळ

लेखक

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)

# ऊनपावसाचा खेळ

कथासंग्रह

अॅड. यशवंत बाबुराव कदम

कोमल प्रकाशन

**ऊनपावसाचा खेळ /कथासंग्रह**
Unpavsacha Khel / Kathasangrah
पहिली आवृत्ती : १ मे २०२३

ISBN No. : ?

**लेखक :**
© ॲड. यशवंत बाबुराव कदम
बी-११०१, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.
भ्रमणध्वनी : ९८९२०४६८६८/९६१९३६०६६१

**प्रकाशक :**
१) कोमल प्रकाशन
३०२, कृष्ण श्रद्धा, पांचाळनगर,
नालासोपारा (प.), जि. ठाणे.
मोबाईल : ९१३७६ ६५९६८/९९८७७ ७६८९९
२) ई-साहित्य प्रतिष्ठान

**मुखपृष्ठ :**
नरेश ठाकूर
मोबाईल : ९८२०३८०२९९

**अक्षर जुळणी :**
चैतन्य आर्टस्, दादर, मुंबई ४०० ०२८.
मोबाईल : ९२२३४७८४८९

**मुद्रक**

----

**मूल्य**
रु.१६०/-

**'ऊनपावसाचा खेळ'** या माझ्या कथासंग्रहातील कथांमध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कथेतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा... **ॲड. यशवंत बाबुराव कदम, नमनेश्वर**

# ऊन पावसाचा खेळ

(कथासंग्रह)

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल टीम ई साहित्य प्रतिष्ठान

लेखक- **ॲड. श्री यशवंत बाबुराव कदम**

आणि प्रकाशक- **कोमल प्रकाशन**

यांचे मनःपुर्वक आभारी आहे.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण ॲड. श्री. यशवंत बाबुराव कदम यांना **ybkadam14@gmail.com** या ई मेल पत्त्यावर किंवा **9892046868** या phone क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

धन्यवाद


सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237


(Whatsappवर विनामूल्य ई पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

# अल्प–परिचय

**ॲड.यशवंत बाबुराव कदम**
बी.ए., एल एल बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

**जन्मतारीख** : १४ ऑगस्ट १९४८
**मूळगांव** : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी
**प्राथमिक शिक्षण** : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई
**महाविद्यालयीन शिक्षण** : रुईया महाविद्यालय, मुंबई
न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई
**नोकरी** : आयकर खाते (मुंबई) येथून वरीष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त
सध्या – मुंबई उच्च न्यायालयात वकिली

***

खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग
काव्यमंच, मुंबई
कोकण मराठी साहित्य परिषद
मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई
लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था

***

**प्रकाशित साहित्य** :

१. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय १९७५
२. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह २००८
३. जीवनगाणे (काव्यसंग्रह) ५ जून २०१०
४. अंतरंगत (काव्यसंग्रह) २८ फेब्रुवारी २०१०
५. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह २०११
६. जय दुर्गे (आरती संग्रह) २०११
७. भक्तिरंग (काव्यसंग्रह) २०१२
८. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) ११ जानेवारी २०१३
९. तांडव (चरित्र) ११ जानेवारी २०१३
१०. जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती
११. श्री कुस्वामीनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, ८ मे २०१३

१२.बोलके झाड (कथासंग्रह) मार्च २०१६
१३.महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च २०१६
१४.दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा इतिहास (संपादित एप्रिल २०१६)
१५.आकाशाचे पंख (कथा संग्रह) १८ फेब्रुवारी २०१७
१६.अंतरीचा दीप (अभंगगाथा) १२ एप्रिल २०१८
१७.गडगीचा डोह (कथासंग्रह) २० मे २०१८
१८.देव माणूस (व्यक्तिचित्र) मे २०१८
१९.लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च २०१९)
२०.हरिपाठ चिंतन (मार्च २०१९)
२१.वळणावळणाची वाट (कादंबरी) १६ डिसेंबर २०२२
२२.मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२३.गरुडझेप (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२४.ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२५.लंडनचा किनारा (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२६.आडवळणाची वाट (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२

**आगामी पुस्तके** :
- ◆ चांदण्याचा पाऊस (ललित लेख)
- ◆ मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह)
- ◆ शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)
- ◆ क्षितीजा पलीकडच्या प्रवासात (मराठी काव्यसंग्रह)
- ◆ आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ – एक अभ्यास (ज्ञानदेव आणि तुकाराम)

**पुरस्कार** : 'जीवन गौरव पुरस्कार' – वंदना प्रकाशन उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल.
लोटिसमाचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा पुरस्कार २०१८ बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या नावाचा कथेला तृतीय पुरस्कार २०१८ कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'गडगीचा डोह' या कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, २०१८.

# अर्पण पत्रिका

''ऊनपावसाचा खेळ'' हा माझा कथासंग्रह
मी माझे कोकण मराठी साहित्य परिषदेतील सहकारी साहित्यिक
सौ. नमिता कीर,  सौ. रेखा नार्वेकर, जेष्ठ कवि सूर्यकांत मालुसरे सर,
सौ. अनुराधा नेरुरकर, श्री. कमलाकर राऊत, श्री. शिवाजी गावडे,
यांना अर्पण करीत आहे...

– ॲड. यशवंत बाबुराव कदम
नमनेश्वर

# माझे मनोगत

आजवर माझे सहा कथा संग्रह प्रकाशित झाले. त्यात बोलके झाड, आकाशाचे पंख, गडगीचा डोह, गरुडझेप, मावळतीच्या सावल्या, लंडनचा किनारा, आडवळणाची वाट, ऊनपावसाचा खेळ आणि शिवाय वळणावळणाची वाट ही कादंबरी प्रकाशित होत आहे.

खरे तर कथा लेखनाकडे मी वळलो तो आमचे पुज्य पितृतुल्य आदरणीय पद्मश्री मधु मंगेश कर्णिक आणि त्यांच्या समकालीन कथा लेखकांच्या कथा वाचनाने. आणि मग हा प्रवाह अविरत चालू राहिला.

कथेचा विषय कसा निवडावा, त्यातील पात्रे, प्रसंग आणि समर्पक मांडणी या गोष्टी या मागच्या पिढीतील दिग्गज कथा लेखकांच्या संस्कारातून आम्ही आत्मसाद केले.

आमची कोकण मराठी साहित्य परिषद स्थापन होऊन ३० वर्षे होऊन गेली आणि या संस्थेच्या संस्कारातून माझ्यासारख्या अनेक नवोदित लेखकांना नव्या दिशा मिळाल्या. त्यातून अनेक लघुकथा, दिर्घकथा लिहिल्या गेल्या. लिहित्या हातांना बळ मिळाले.

त्याचे असे झाले, काही कथा ५०/६० पानांपेक्षा पुढे वाढल्या आणि त्या लघुकथांच्या संग्रहात सहभागी करता येईनात, एकतर पाने वाढत किंवा इतर लघुकथा बाकी राहिल्या म्हणून मला गुरुस्थानी असलेले डॉ.पांडूरंग भानुशाली यांनी आता या दिर्घकथांचा एक कथासंग्रह व्हावा अशी इच्छा व्यक्त केली. आणि या 'ऊन पावसाचा खेळ' हा दिर्घ कथांचा संग्रह काढण्याचे ठरले.

मग या कथा संग्रहात चिखल, तोडगा आणि ऊन पावसाचा खेळ कोणी ह्या तीन कथांचा समावेश केला.

माझे गुरु डॉ.भानुशाली म्हणाले, आज काल दीर्घ कथांचे संग्रह कोणी काढीत नाही, कारण दीर्घ कथा कोणी लिहीतच नाहीत. सगळे लेखक लघुकथा संग्रहच काढतात. म्हणून या कथा संग्रहाचे नक्कीच स्वागत होईल. मी त्यांची इच्छा शिरसावंद्य मानली. ते या कथा संग्रहाला प्रस्तावना देणार होते. पण त्यांच्या दिर्घ आजारामुळे ते त्यांना शक्य झाले नाही. असो.

खरेतर दीर्घ कथा संग्रहाच्या कथानकाचा आवाका मोठा असतो. विषय, पात्रे, प्रसंग पण सामाजिक मर्यादांच्या सिमारेषा, पण हे कथानक वेगाने पुढे सरकत जाते. प्राणी मात्रांचे स्वभाव विशेषतः व्यक्त व्हायला भरपूर वाव मिळतो.

आणि ती कथा दीर्घ स्वरूपात साकार होते. समाजाला, आजच्या तरुण पिढीला, बुजूर्गानाही काही संदेश देऊन जाते.

डॉ. पांडुरंग भानुशाली यांचे आणि माझे जन्मोजन्मीचे नाते आहे. हे वडीलकीचे, पितृत्वाचे, आदर्श शिक्षक म्हणून, लेखक, कवी, समिक्षक, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक म्हणून मी त्याना गुरुस्थानी मानतो.

या कथा संग्रहात तीन कथांचा समावेश करण्यात आला. त्यातील ऊन–पावसाचा खेळ ही शीर्षक कथा, तसेच तोडगा व चिखल या ही दिर्घ कथांचाही समावेश ह्या कथा संग्रहात केला.

मग, माझे मित्र रविराज गंधे, लेखक आणि माध्यम तज्ञ यांना या कथा संग्रहासाठी त्यांनी प्रस्तावना लिहावी अशी विनंती केली. आणि त्यांनी समर्पक अशी प्रस्तावना लिहून दिली. मी त्यांचा ऋणी आहे.

या कथा संग्रहाची अक्षर जुळणी माझ्या भगिनी नंदाताई यांनी त्यांच्या चैतन्य आर्टस् येथे अगदी प्रेमाने, आपले समजून केले. त्यांच्या ऋणात मी राहू इच्छितो. त्यांच्या सगळ्या सहकाऱ्यांनी जीव ओतून ह्या सगळ्या पुस्तकांची अत्यंत कमी वेळात अक्षर जुळणीचे काम पूर्ण केले, त्यांचाही मी ऋणी आहे.

हा कथा संग्रह ई–साहित्य प्रतिष्ठान या साईटवर प्रकाशित होत आहे.

चैतन्य आर्टस्चे श्री.नरेश ठाकूर यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार केले अगदी प्रेमाने त्यांचाही मी ऋणी आहे.

'कोमल प्रकाशन' तर्फे हा कथा संग्रह प्रकाशित होत आहे. ही सहा पुस्तके झाली ती 'कोरोना'च्या काळातल्या लिखाणाने. निवांतपणा मिळाला म्हणून. त्यालाही धन्यवाद !

अधिक न बोलता थांबावे हे बरे. माझ्या वाचक वृदांना हा कथासंग्रह आवडेल, अशी आशा व्यक्त करतो. आणि थांबतो !

**ॲड.यशवंत बाबुराव कदम,**
**नमनेश्वर**

# प्रस्तावना
## ऊन पावसाचा खेळ

श्री यशवंत कदम हे साहित्यिक, कवी म्हणून आपल्याला परिचित आहेत. आजवर त्यांची कथा-कादंबऱ्या अन कवितासंग्रहाची असंख्य पुस्तके प्रकाशित झाली आहेत. काहींना मान्यवर साहित्य संस्थांचे पुरस्कार हि प्राप्त झाले आहेत. त्यांच्या **ऊन पावसाचा खेळ** या कथा संग्रहात एकूण **तीन कथा** आहेत.

**तोडगा** या कथेत लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरवलेला उदय हा लहानपणा पासून घराच्या अन घरातील माणसांच्या प्रेमाच्या मायेच्या शोधात असतो त्याची हि भावनिक भूक ओळखून नीलम तिची बहिण अंजू आणि त्यांची आई त्याच्या भोवती प्रेमाचे आपुलकीचे खोटे जाळे विणतात, त्यात तो पुरा फसतो अन लुबाडला जातो. तेव्हा त्याच्या आयुष्यात पेशाने वकील असलेली रंजना येते अन त्याला आपल्या प्रेमाची उब देत कायदेशीर लढा देत त्याला त्याचे घर मिळवून देते अन त्याची जीवनाची साथीदार बनून त्याच्या समस्येवर यशस्वी **तोडगा** काढते. अशा आशयाची रंजक कथा आहे.

तर **चिखल** या कथेत नंदू, त्याची बायको अंकिता अन मुलगी यांच्या वादळी संसारिक जीवनाची चित्रकथा लेखकाने रंगविली आहे. नंदूच्या आयुष्यात आलेल्या कुंदा हया त्याच्या प्रेयसीमुळे. त्यांच्या त्रिकोणी कुटुंबाला कुठला अकल्पित चौथा कोन लाभतो हे प्रत्यक्ष कथेत वाचकांनी वाचावे.

तर ऊन-पावसाचा खेळ या कथेत समीर आणि रजू भावस्पर्शी प्रेमाची अन तिला मिळालेले नियतीचे अकल्पित झोके देत कशी यशस्वी होते हे लेखकाने प्रभावीपणे मांडले आहे.

सर्व कथा या पुरुषांच्या जीवनाविषयी भाष्य करणाऱ्या असल्या तरी प्रत्यक्षात त्या स्त्री केन्द्री आहेत. प्रत्येक कथेत पुरुषाला, त्याच्या चुकांना-दोषांना सावरून घेत, त्या पोटात घालीत त्याच्यावर मायेची पखरण करणारी

सशक्त स्त्री आपल्याला पहायला मिळते. स्त्री हि क्षणाची पत्नी किंवा प्रेयसी असते अन अनंत काळाची माता असते असा संदेश देणारा, स्त्री शक्तीच आगळेवेगळे दर्शन घडविणाऱ्या या समर्थ कथा आहेत अन हेच या कथांचे वैशिष्ट्य आहे. लेखनाची शैली हि साधी-सरळ, वेगवान अन चित्रदर्शी अशी आहे. या साऱ्या कथांवर सिनेमा-नाटक या माध्यमात सादर केल्या जाऊ शकतात असा कथावस्तूचा त्यात आशय आहे. नानाविध प्रसंग, घटना अन जिवंत वर्णन यांनी नटलेल्या कथा वाचकांचं मनोरंजन तर करतीलच त्या बरोबर त्याचं जीवनविषयक उद्‌बोधन हि करतील, हि या कथा संग्रहाची जमेची बाजू आहे. श्री. यशवंत कदम यांच्या या कथा संग्रहाचे वाचक स्वागत करतील अशी आशा आहे. त्यांच्या भविष्यातील लेखन कार्यास माझ्या अनेक शुभेच्छा...!

**रविराज गंधे**
**लेखक, माध्यमतज्ञ**

# अनुक्रमणिका


१. ऊन पावसाचा खेळ

२. तोडगा

३. चिखल

# ऊन पावसाचा खेळ

आपले अधुरे स्वप्न घेऊनच समीरने हिंदुस्थान सोडले. अगदी दुःखी अंतकरणाने, जीवापाड प्रेम आपण केले रजूवर. तिने खरेतर फसवले म्हणता येणार नाही, पण आपले प्रेम घरच्यांना सांगण्यात ती कचरली तेव्हा ती पुण्यात होती.

आपले इंजिनीअरींगचे शिक्षण घेतल्यावर समीर अहमदाबादला बजाज मध्ये नोकरीवर गेला आणि रजुने तिच्या वडिलांच्या कारखान्यातच काम स्वीकारले. तसे जरी त्या दोघांच्या रहाण्यात खुप अंतर होते तरी ती दोघे तासन तास बोलत मोबाईलवर, एकमेकांना मेसेज पाठवीत, पण गेल्या ८/९ महिन्याच्या काळात त्यांची भेट काही होऊ शकली नाही ना फोन. समीरचे मुंबईला कोणी नव्हते. अख्खे शिक्षण त्याने हॉस्टेलमध्ये राहूनच पूर्ण केले. आणि नोकरीसाठी मुंबई सोडली. त्यानंतर मोबाईलवरच त्यांचे संभाषण होत होते. ना समीरचे, येणे झाले ना रजूचे, आणि हा दूरावा खुपच एकाकीपणात गेला. समीरचा जॉब जरी अहमदाबादला होता तरी त्याच्या कंपनीच्या मशीन सेल्स करण्यासाठी त्याला भारतभर फिरावे लागत होते. हाच दुरावा दुश्मन ठरला, त्याच्या प्रेमाच्या नात्यात.

बारावी नंतर त्यानी एस्. पी. कॉलेज मध्ये ॲडमिशन घेतले आणि पहिल्या सेमीस्टरमध्ये तो पहिला आला. सगळ्या मुलांनी त्याचे अभिनंदन केले त्यात रजु ही होती. कॉलेजच्या पहिल्या दिवसापासून त्याला रजु आवडली होती. समीरचे शिक्षण इंग्रजी माध्यमात झाले तर रजुचे मराठी तेव्हा तिला इंग्रजीमुळे अनेक गोष्टी समजावून घेण्यास वेळ लागे. पण समीर पहिला आला. त्याला ९६% मार्क मिळाले शिवाय वर्गात प्रोफेसर बरोबर त्याचे डीस्कशन होत असे. त्याची इंग्रजीवरची कमांड आणि विषयाची मांडणी तिला खूप भावली. सगळ्यात महत्वाचे म्हणजे त्यांची गणितावरची कमांड हीच गोष्ट त्याना जवळ आणण्यास कारणीभूत झाली.

रजु पुण्यात रहात असल्यामुळे ती तिच्या घरी बंडगार्डनला रहायची पण समीर एस्.पी. कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये. रात्री ९/९ वाजेपर्यंत समीर कॉलेजच्या लायब्ररीत बसून अभ्यास करीत असे. कारण हॉस्टेल मध्ये लाईटची अडचण, शिवाय मेस कॉलेजजवळ. त्यामुळे कॉलेज मधून समीर रात्री जेवूनच हॉस्टेलवर

जात असे. रजु आणि समीर हे दोघेही लायब्ररीत बसूनच अभ्यास करीत असत. रजुला त्याचा फायदा होई. अभ्यासातल्या अडचणी समीर तिला समजावीत असे. याच गोष्टी मैत्रीत व नंतर प्रेमात रुपांतरीत झाल्या. पण दोघानीही आपल्या प्रेमा मुळे अभ्यासात व्यत्याय आणुन दिला नव्हता. रजुही नंतरची सगळी सेमीस्टर चांगल्या मार्कांनी पास होत गेली. समीर तर विद्यापीठात पहिला आला.

तसे पाहिले तर समीर कोकणातला रत्नागिरीच्या गोगटे विद्यालयाचा विद्यार्थी, रत्नागिरीच्या नांदगावचा तो रहिवासी. घरी फक्त त्याची आई  होती. त्याचे सगळे शिक्षण स्कॉलरशिपवर झाले होते. आणि पुण्याला येऊन त्याने दहावीची परिक्षा दिली त्यातही तो अव्वल आला आणि एस.पी.कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाले. गावात त्यांची खुप शेती होती. आई तशी साठीत आली होती त्यामुळे मकत्याने शेती देत असे. येणाऱ्या धान्यापैकी तसेच आंबे, फणसाच्या उत्पनातून समीरचा हॉस्टेलचा खर्च निघत होता, शिवाय त्याने दोन शिकवण्याही मिळवल्या होत्या. त्याचे ठीक चालले होते. समीरला ... कॅम्पस मधील .......... तच मिळाला आणि परिक्षा झाल्या बरोबर तो अहमदाबादला नोकरीवर रुजु झाला आणि रजु तिच्या वडीलांच्या मागे काम पाहु लागली. त्यांचा मोटारचे पार्टस् बनविण्याचा उद्योग होता.

कॉलेजमधल्या चार वर्षाच्या काळात म्हणजे दुसऱ्या सेमिस्टर नंतर एकमेकांचे मित्र बनलेले हे दोन जीव प्रेमात रुपांतरीत झाले ते चौथ्या वर्षात शिकत असताना बहार आला होता त्यांच्या प्रेमाला. अधिक अधिक वेळ ते सोबत असत. अखख्या कॉलेजला हे प्रकरण माहित होते चौथ्या वर्षाच्या पहिल्या सेमीस्टर मध्ये रजुने आपल्या प्रेमाची कबुली समीरला दिली आणि समीरनेही. हे घडले अगदी अनपेक्षीत पणे, कारण त्यांची एक टुर कॉलेजने आंध्रमधल्या एका मोठ्या कंपनीमध्ये नेली होती. हा एक प्रकारचा सेमीनार होता. त्यात समीरने चांगली चमक दाखवली आणि तेथेच 'रजु' त्यावर फिदा झाली आणि त्याच दिवशी संध्याकाळी तिने आपल्या प्रेमाची कबुली दिली.

समीरच्या मनातही तेच होते. आणि मग दोघेही प्रेमाच्या वर्षावात वाहून लागली. आणाभाका झाल्या. आपण जीवन भराचे साथी राहू अशी कबुली दोघानी दिली. आणि शेवटचे सेमीस्टर कधी संपतेय असे झाले. परिक्षांचे निकाल लागला, समीर प्रथम आला. रजुलाही ८०% मार्क  मिळाले आणि

आनंदी आनंद झाला.

अजून  रजूने आपल्या घरच्याना या प्रेम प्रकरणाचा पत्ता लागू दिला नव्हता. सारे काही गुलदस्त्यात होते. समीरने मात्र गावी आल्यावर आपल्या आईला तशी कल्पना दिली. तिलाही आनंदा झाला. चांगल्या घरातली मुलगी सुन म्हणून येणार यामुळे ती आनंदात होती.

एक दिवस हॉस्टेल सोडण्यापूर्वी रजुने समीरला आपल्या घरी बोलाविले. त्याची ओळख आई बाबा व कुटुंबीयांना करुन दिली. हा सगळा फार्स आटोपला.

'' तुमच्या घरी कोण कोण असते ?'' वडील.

'' मी आणि माझी आई !''

''वडील काय करीत होते ?''

''शेती !''

झाले त्याचा हिशोब तेथेच झाला.

'चला ! मला फॅक्टरीला जायचे आहे. रजु... चल तुही निघ ! आजपासून तु फॅक्टरीचे प्रोडक्शन डिपार्टमेंट सांभाळ !

रजुही आत गेली आणि रजुचे वडिलही. मग समीरकडे उठून जाण्याशिवाय पर्याय उरला नव्हता. समीरची हुशारी येथे जराही कामाला आली नाही. रजुच्या वडीलांना श्रीमंताचेच संबंध ठेवायला आवडत असावे. गरीब, शेतकरी याचा तिटकारा आहे असे समीरला जाणवले. आणि एकंदरीत रजुच्या वडिलाच्या चेहऱ्यावरचे भाव काय आहेत हे समीरला समजले. शिवाय वडिलांनी सांगताच रजुही समीरला एकटा सोडून निघून गेली. दोन मिनिटेही तिला थांबायला वेळ नव्हता. या गोष्टीचे वैशम्य समीरला खूप काही सांगून गेले.

तो उठला आणि बंगल्याच्या कंपाऊंड बाहेर आला. बाहेर येताच त्याने बंगल्याकडे पाहिले आणि तो त्याला ओका-बोका वाटु लागला. रजु आत गेली ती परत आलीच नाही. काय समजायचे ते समीर समजला.

हॉस्टेलला आल्यावर समीरने रजुला ३/४ वेळा फोन केला. बेल वाजत होती पण तिने तो उचलणे टाळले. आपले प्रेमप्रकरण येथेच संपले असे त्याला वाटले. पूढचे चार दिवस तिच्या फोनची वाट समीरने पाहिली आणि दुसऱ्याच दिवशी कॉलेजचे हॉस्टेल त्याने सोडले अगदी खिन्न मनाने. त्याने रजुवर अगदी मनापासून प्रेम केले. आता त्याला संकेत मिळाला ही प्रेम-बीम सारे झूट आहे,

असे त्याला वाटते. आणि हे प्रकरण संपवीण्याचा त्याने विच्चार केला.

तो सरळ गावाला आला. आईला भेटला आणि अहमदाबादला जाऊन त्याने आपला जॉब स्विकारला. हा जॉब पण चांगला होता. सद्या कंपनीचे रेस्ट हाऊस त्याला देण्यात आले, पण हा जॉब फिरतीचा होता. आज मुंबई, उद्या कलकत्ता, परवा दिल्ली. अशा प्रकारे तो एका ठिकाणी स्थिर नव्हता. तिथल्या मशीनरी .... कंपनीने बसवल्या होत्या त्या फॅक्टरीत जाऊन त्यांचा मेंटेनन्स, सर्व्हिसिंग पहाणे असा होता. प्रत्येक ठिकाणी रेंज नसे. रजुशी संपर्क करावा असे अनेक वेळा त्याला वाटले. पण मग ती का नाही फोन करीत ? याच विवंचनेत दोन महिने निघून गेले, ना फोन ना मेल.तो समजला आता एकदाच आणि एकदाच तिला फोन करावा. अणि एकदिवस सकाळी ८ ला त्याने रजुला फोन केला, बराच वेळ बेल वाजत होती पण तिने उचलला नाही. कदाचित ती आजारी असेल असे समजून त्याने घरच्या लॅन्ड लाईनवर फोन केला. तो तिच्या ऐवजी तिच्या वडिलानी उचलला......

"कोण बोलत आहे"

"मी समीर, मी कलकात्याहून बोलतोय रजु आहे का ?"

"नाही, आता तुम्ही तिला कधीच फोन करु नका. तिच लग्न ठरले आहे!"

आणि त्यानी फोन ठेऊन दिला.

समीरला वाटले आता ती का ? फोन उचलत नाही, इतकी रजू निष्ठुर कशी झाली कि माझ्या घरच्या गरीबीचा झेंडा मध्ये आडवा आला. खरे तर असे होणे शक्य नाही हे तो आपल्या मनाला पुनः पुनः समजावीत होता.हे अनेक दिवस चालले . आणि हे प्रकरण आपण विसरावे असे समीरने मनोमन ठरविले. निदान आता तरी यावर पडदा पडला होता. पुढे महिनाभर हे प्रेमप्रकरण समीरला सतावीत होते. पण मनापासून केलेले प्रेम या प्रेमाचा मनोरा हळुहळु कोमेजत गेला. तरीही समीर हे काही विसरु शकला नाही. आता त्याने आपल्या करीअर वर आपले लक्ष केंद्रीत केले आणि प्रेम प्रकरण सायडींगला टाकले.

आता त्याच्या कामाचे स्वरुपही बदलले होते. तो अहमदाबादला राहून कंपनीचे प्रोडक्शन विभाग सांभाळत होता. याच वर्षात त्याने अहमदाबादच्या एमबीए मधून. एमबीएची डिग्रीही घेतली. आता अहमदाबादला त्याने स्वतंत्र घरही घेतले होते.

मे महिन्यात तो आईला भेटण्यासाठी गावाला आला, पण पुण्याला

फिरकला नाही. पुन: परत येऊन त्याने आपले काम चालू ठेवले याच काळात समीर ने मॅनेजमेंटच्या संदर्भातील पेपर्स इन्टेशनल मॅगझिनमध्ये प्रकाशीत झाले. त्यासाठी त्याने संशोधन केले व प्रोडक्शन संबधी बहुमोल माहिती दिली. जगात त्याचे खूपच कौतुक झाले, त्याच्या कंपनीने त्याचे काम पाहून व त्या प्रकाशीत पेपर्सच्या मुळे समीरला प्रोडक्शन मॅनेजर या पदाचे प्रमोशन दिले. आता तो खूपच खुष होता, खरा पण रजुच्या प्रदिर्घ न झालेल्या संपर्कामुळे तो थोडे (नाराज) होताच.

आता अहमदाबादला येऊन त्याला २ १/२ वर्ष होऊन गेली होती, आता त्याचे वय २५/२६ झाले होते. आई त्याने लग्न करावे यासाठी सातत्याने त्याचा पाठपुरावा करीत होती. पण समीर कान हलवायला तयार नव्हता. कारण रजुचे लग्न त्यांच्या कंपनीतल्या मॅनेजर बरोबर झाले होते. ही बातमी त्याच्या कंपनी मधील मित्र/मैत्रिणीनी त्याला सांगीतली जेव्हा एका सेमीनारसाठी एस.पी. कॉलेजने त्याला प्रमुख वक्ता म्हणून निमंत्रीत केले होते. कॉलेजमध्ये आल्यावर त्याला जुण्या सगळ्या आठवणीनी खुप त्रास दिला. ह्या कार्यक्रमात समीर उपस्थीत विद्यार्थ्यामध्ये रजुचा चेहरा शोधीत होता. आणि चौथ्या रांगेत त्याने तिला पाहिले, स्वत:ला सावरले पण रजुशी संपर्क केला नाही. ती तिची मुलगी २ वर्षाची व नवरा, तसेच वडील ही होते.

भाषण अप्रतिम झाले. रात्री तो अहमदाबादला विमानाने पोहचला. त्या रात्री रजुच्या आठवणीनी त्याच्या मनाचा बांध फुटला. त्याला त्या रात्री जराही झोप लागली नाही. मग मात्र कंपनीच्या कामात तो व्यस्त झाला. आता ते मृगजळ होते असा पक्क समज समीरने करुन घेतला व रजु प्रकरण संपवले. पण तरीही रजु त्याच्या काळजातुन काढून टाकणे त्याला कठीण जात होते.

त्याच्या कंपनीने समीरला मॅनेजींग बोर्डावर घेतले व यूएसए / यूके आणि युरोप येथील कंपनीच्या एक्सपोर्टची जबाबदारी त्याला दिली तो खूष होता. हिंदुस्थानभर त्याच्या कामाच्या स्किलचा बोलबाला हिंदुस्थान भर झाला होता. त्याला अनेक चांगल्या संधी परदेश व देशातील मोठमोठ्या ग्रुपकडून येत होत्या. पण याही वेळी तो स्थिर होता.

आपण आपल्या आईला अहमदाबादला आणावे असे बरेच दिवस त्याच्या मनात होते. पण ती अचानक आजारी पडली. समीर तिच्यापर्यंत पोहचला पण तिचे प्राण वाचवू शकला नाही. दु:खी अंत:करणाने तो पुन्हा अहमदाबादला

परतला. आता मात्र समीरच्या जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली होती. एकटेपणा त्याला खायला येत होता. पुढचे दोन दिवस तो ऑफिसमध्ये गेलाच नाही.

त्याला प्रमोशन मिळाल्यापासून सतत त्याच्या ऑफिसमध्ये आणि नंतर घरीही लोकांची ये जा वाढली होती. आता त्याचे घरच त्याला लहान वाटू लागले होते. कंपनीने मोठे घर देण्याचे कबुल केले. एक छान मोठा बंगलो बंद गार्डन रोडवर त्याला देण्यात आला. आता त्या येवढ्या मोठ्या सहा बेडरुमच्या घरात अधिकच एकाकीपण जाणवू लागला होता. त्यात समीरच्या परदेशातल्या टुरही वाढल्या होत्या. त्याने हा चार्ज घेतल्यापासून कंपनी अधिक भरभराटीला आली होती. एक्सपोर्ट वाढला होता. जागतीक स्थरावर या कंपनीचे नांव आदराने घेतले जात होते आणि त्याच बरोबर त्याचेही. जागतिक स्थरावर आता त्याला मोठा मान मिळत होता.

आपली डोळे दिपविणारी प्रगती रजुला समजावी असे मनोमन समीरला वाटत होते. आपल्या गरीबीमुळेच तीच्या वडीलानी हे स्थळ नाकारले याचे सतत वैशम्य त्याला वाटत होते. आता त्याने वयाची २७ वर्षे पार केली होती. येवढ्या लहान वयात हे यश नजर लागावी असेच होते. आता वाढत्या वयात लग्न करावे लागेल आणि एकत्र रहाण्याच्या आणा भाका घेऊन ताटातुट झालेले त्याच्या मनाला अधिकच लागले होते. ती आता कोठे असेल. काय करीत असेल. लग्न तर  झाले होते, हे त्याला समजले होते. जेव्हा तो एस.पी.कॉलेज मध्ये सेमीनारला गेला होता. नंतर काहीच समजले नव्हते. अजुनही समीरच्या डोक्यातुन रजुचे भुत उतरले नव्हते.

अनेक वेळा त्याने आपल्या मनाला समजाऊन पाहिले पण फरक पडत नव्हता. आता आता तर हे प्रकरण अधीकच धारदार होत गेले होते.

अमेरिका पार आणि युरोप मधला थंडीचा बर्फाचा सिझन ओसरला होता. समीरला या सगळ्या देशात दोन महिन्यात जाऊन यायचे होते. मार्च शेवटला त्याच्या प्लॅनिंगप्रमाणे सारे काही ऑलवेल अस हे का ? हे त्याला पहायचे होते. शिवाय क्वालिटी कन्ट्रोलचा आढावाही त्याला घ्यायचा होता. आपल्या टुरची सगळी तयारी त्याने केली होती.  आणि २/३ दिवसात तो जाणार होता.

त्याच्या बंगल्याच्या बाजुला बरेच बंगले होते. 'बंगलानुनगर' म्हणुनच हा विभाग ओळखला जात असे. या बंगल्यात आल्यापासून समीरला एका

मिनिटाचा वेळ नव्हता. आजु बाजुला बघण्यासाठी. सकाळी लवकर निघायचे रात्री उशीरा घरी यायचे, हाच परिपाठ होता. आज तो सगळे व्याप संपवून घरी लवकर आला. त्याला त्या टुरसाठी तयारी करायची होती. हि काय त्याची पहिली टुर नव्हती. त्यामुळे त्याची टुरवर नेणारी बॅग नेहमी तयारच असे. काही पेपर वर्क बाकी होते. तिकडच्या मिटींग, अ‍ॅग्रीमेंट यांचे वाचन करायचे होते म्हणून तो आज लौकर घरी आला.

गाडी बंगल्याच्या दरवाज्यात थांबली, कारण एक ५/६ वर्षाची मुलगी दरवाजात स्केटींग खेळत होती बराच वेळ गाडी बाहेरच उभी होती रस्त्यावर. ती काही हटायला तयार नव्हती, मग समीर खाली उतरला. त्या मुलीशी बोलला:-

''बाळा आम्हाला आत जायचे आहे ! तू थोडावेळ बाजूला हो ! म्हणजे गाडी आत जाईल. मग हवे तर तू खेळ!'' समीर.

तरी ती मख्ख. त्याच्याकडे पहातच राहिली सुटाबुटातला समीर तिला आवडला असावा. आता नाईलाज होता. तो तिच्या जवळ गेला. गाडीतले मोठे चॉकलेट आणून दिले. ती खुश झाली आणि ते सुंदर ध्यान पळत बाजुच्या बंगल्यात घुसले.....

'' मम्मी !'' म्हणत.

समीर पुन: गाडीत बसला. गाडी पोर्चमध्ये पार्क झाली. पण समीरच्या मनातून ती चिमुरडी काही जायला तयार नव्हती. समीर बंगल्यात आला आणि सगळी कामे आटोपून, झोपण्यासाठी गेला, पण त्याला झोप काही येत नव्हती. सारखी ती चिमुरडी त्याच्या डोळ्या समोर येत होती.

आणि त्याला रजुची आठवण झाली. आज आपले लग्न झाले असते तर असे सुकुमार ध्यान आपल्या मांडीवर खेळले असते. थोडावेळ त्याने आपले डोळे मिटले आणि ती चिमुरडी त्याच्या नजरेतून काळजाला स्पर्श करुन गेली. रात्रभर तो जागाच होता.

त्या मुलीचा चेहरा रजू सारखा आहे असे राहून राहून त्याला वाटत होते. पुन: पुन: तो चेहरा त्याच्या नजरे समोर येई आणि हटायचे नाव घेईना. आणि रजूच्या आठवणीने आज तो अगदी सदगदीत झाला होता. कॉलेजनंतर पुणे सोडल्याला सहा वर्षे होऊ न गेली होती. रजुचे लग्न तिच्या वडीलानी त्या कंपनीच्या मॅनेजरशी लावले. तीही मनावर दगड ठेऊन तयार झाली.

आता त्या चिमुरडीचा चेहरा आपल्याला पुन: कधी पहायला मिळणार? तो

बेचैन होता. आज ऑफीसला जायचा त्याचा मुड नव्हता कारण दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरचे फ्लाईट होते. अधून-मधून तो आपल्या बंगल्याच्या गॅलरीत येई आणि बाजुच्या बंगल्यात कोण येते का ? जाते का हे पहात होता.

संध्याकाळचे ५ वाजले होते. कालचीच वेळ. त्या बंगल्याच्या समोरील लॉन वर दोन टिपके त्याला दिसले. समीरने ओळखले. तिच ती चिमुरडी होती. आणि तिच्या शेजारी तिची आई. त्यांचा खेळ रंगात आला होता. आणि समीर टक लाऊन पहात होता. येवढ्यात तिचा बॉल गेटमधून बाहेर पडला आणि तो आणायला ती चिमुरडी निघाली...

'' स्वप्नाली ! थांब तू जाऊ नकोस, मी आणते! तु आतच थांब !'' ती.

आणि तो आवाज ओळखीचा आहे असे समीरला वाटले. तिने त्यांच्या बंगल्याचा गेट उघडला आणि बॉल घेऊन परतली. चेहरा ओळखीचा वाटला. थोडा स्थूल, पांढरे फटफटीत कपाळ, सफेद साडीत पाहून तो थोडा बावरला. ही रजु तर नसेल, तशीच चाल तसाच चेहरा पण फटफटीत कपाळ ? त्याला प्रश्न पडला पण त्याचा पडतळा घेणे शक्य नव्हते. ती तिच्या बंगल्याच्या लॉन वर आली आणि पुनः खेळ सुरु झाला.

'' स्वप्ना ! पुनः कधीच गेट उघडुन बाहेर पडायचे नाही, गाड्या रस्त्यावर येत जात रहातात !'' ती.

आपण उगाच रेंगाळतोय रजु कशी असु शकेल ती, ती तर पुण्याला. अहमदबादचा तिचा संबंध काय ? आणि तो आत आला. रात्रीचे जेवन फारसे घेतले नाही त्याने. पण ती रात्र मात्र खूपच बेचैनीत गेली. हा तिढा कसा सुटणार याच विवंचनेत तो होता.

रात्री त्याच्या ऑफीस मधून त्याला मेल आली. त्याचे फ्लाईट बदलले होते ११/३० चे होते. इप्थानसा एअर लाईनचे. शिवाय एअरपोर्टवर जाताना ऑफीसला येऊनच पूढे जा असा निरोप चेअरमनने पाठवला होता. समीर वेळेचा पक्का. तो वेळेवर पोहचेल, यासाठी विक्रम साराभाई कंपनीचे चेअरमन वेळेवर हजर होते.

समीर बंगल्यातून बाहेर पडला. तर डाव्या बाजुला त्या चिमुरडीला घेऊन तिची आई उभी होती. समीरने शॉफरला गाडी थांबवायला सांगितली. त्याने पाहिले ती मुलीला शाळेच्या गाडी साठी सोडायला आली होती. गाडी आली ती चिमुरडी शाळेच्या गाडीतून गेली आणि ती डावीकडे वळली. ती रजु होती.

समीरने तिला हाक मारली...

"रजु ?"

अनपेक्षीत आवाजाने ती बावरली. या नावाने हाक मारणारी माहेरची माणसे आणि समीरच होता. कारण लग्नानंतर तिचे नांव रंजना ठेवले होते...

तो आवाज ऐकूण क्षणभर ती थबकली. ती तिच होती. म्हणून समीर गाडीतून उतरला. आणि....

पण त्याच्याकडे न पाहताच ती गेट उघडून आपल्या बंगल्यात गेली. समीरकडे न पहाताच. समीरने तिला ओळखले होती. पण का जाणे ती समीरकडे न पहाताच निघून का गेली ? याच विच्याराने तो पुनः चक्रावला. त्याच्या चेहऱ्यावर तर रजु भेटल्याचा आनंद क्षणात मावळला, तिचे फटफटीत कपाळ पाहून तो अधिकच बावरला. आणि ती ही नसावीच नाहीतर मला टाकुन ती का गेली ? तो पुनः आपल्या गाडीत बसला आणि ऑफीस गाठले. चेअरमन बरोबर चर्चा झाली. .... मध्ये एक फॅक्टरी उभारावी तिथल्या नेल्को या कंपनी बरोबर करार करुन असा त्यांचा मानस होता. चर्चा संपली आणि समीर अहमदाबाद एअर पोर्टवर आला. अजुन १/२ तास बाकी होता फ्लाईटला. तो वीआयपी गेटने आत गेला. दोन मिनिटात सगळे सोपस्कार पूर्ण झाले. आणि तो फ्लाईटची वाट पहात होता. आज त्याच्या मनातले काहुर त्याला मिनिटा मिनिटाला अस्वस्थ करीत होते. त्याचा बिझनेस क्लास असल्याने तशी गर्दी नव्हती. पण त्या दिवशीच्या दिवस भराच्या प्रवासात त्याच्या नजरे समोरुन रजु जात नव्हती. ही टूर १५ दिवसांची होती, तेव्हा जर ती रजुच असेल तर दिसणार नव्हती. मग हा योगा योग कसा ? त्याला... हा बंगला द्यायला, त्याच्या बाजुचा बंगला रजुचा आणि तिचे फटफटीत कपाळ. नियतीच्या मनात काय आहे ? त्याला समजत नव्हते. तसा अंदाज बांधणेही कठीण पण पुढचे १५ दिवस हीच गोष्ट त्याला त्रास देणार होती, जोवर सगळे चित्र स्पष्ट होत नाही. येवढे मात्र खरे.

त्या विचारात्च त्याचे १५ दिवस कधी गेले समजले नाही. यू.एस.गव्हर्नमेंटने संमत्ती दिल्याने लवकरच फॅक्टरीचे काम सुरु होईल आणि समीरचे पुनः पुनः अमेरीकेत येणे होणार होते.

अहमदाबाद येताच चेअरमनने समीरला बोलावले. त्याना खूप आनंद झाला. आणि आपल्या कंपनीचा 'चेअरमन म्हणून समीरची नेमणुक केली. ही

खूप आनंदाची गोष्ट होती. पण तरीही रजूच्या आठवणीने त्याची अस्वस्थता दिवसे दिवस वाढतच होती. इथे येताच त्याने दोन दिवस आराम करायचे ठरविले होते. समीरने त्या चिमुरडीसाठी खूप खेळणी, चॉकलेट आणली होती. दुसऱ्याच दिवशी त्या मुलीला द्यावे असे त्याचे मन सांगत होते पण तिच्या आईला हे आवडेल का ? ती रजु असेल तर ती कशी वागेल, त्या दिवशी ती वागली तशी. कदाचित आपल्या नशीबाच्या फेऱ्याला ती दोष देत असावी. समीरवर तिचे निस्सीम प्रेम होते. पण मग आपण त्याला का टाळावे. आपण असे वागायला नको होते. आपण कच खाल्ली आणि लग्नाला तयार झाले.

खरे तर हे लग्न झाले. तो गुजराथी होता. मुळचे ते अहमदाबादचे पण नोकरी निमीत्त तो पुण्याला आला होता. लग्ना नंतर ती दोघे हनिमुनला गेली सिंगापुरला आणि त्याचे रंग ढंग तिच्या ध्यानात आले. आपण चुकलो हे तिने ओळखले पण परतीचे रस्ते बंद झाले होते. सारे काही ना खूशीने तिने ते स्वीकारले होते. येवढे मात्र खरे. हे आता तिला पटले होते. आपण मोठी घोडचूक केली. प्रेमाला लाथाडले. आणि त्यातूनच हे दुःख वाट्याला आले होते. तिच्या नवऱ्यानेही बाबांच्या फॅक्टरची नोकरी सोडली आणि ते दोघे अहमदाबादला आले. मुंबईचे श्रीमंत कुटूंब पण संस्कृतीचा, संस्कारांचा, स्पर्श ही न झालेले आणि त्यानंतर ती पूण्याला परतलीच नाही. ती गरोदर राहीली आणि ही मुलगी झाली. स्वप्नाली तिचे नांव. पण हा आनंद वर्षभरच टिकला. ट्रेन अपघातामध्ये महेश गेला. आणि गेली ४ वर्षे वैधवात दिवस काढीत होती. घरची श्रीमंती. काही कमी नव्हते. कमी होते ते प्रेम. ते तिच्या कधीच वाट्याला आले नाही.

समीर त्या दिवशी निघून गेला आणि दोन मिनीटे ती त्याच्या गाडीकडे पहातच राहीली. रोडस् रॉयल गाडी, करोड रुपयाची, त्याचा सुटाबुटातला पेहराव यातून ती त्याला ओळखू शकणार नव्हते हे कसे ? पण वेळच तशी होती त्याची गाडी दिशेनाशी झाली आणि ती गेट उघडून बंगल्यात आली. आणि तिने सोफ्यावर अंग टाकून दिले. आम्ही ठरवले एक आणि दुसरेच हे सारे नियतीला मान्य होते म्हणूनच असा समज करुन तीने आपल्या मनाला समजावीले. पण नंतरचे १५ दिवस ती बेचैनच होती. समीरची गाडी बंगल्यात अलेली तिला दिसली अणि ती सुखावली.

येथे आल्यावर समीर खूप कामात होता. बंगल्यात खुप लोकांची ये–जा चालू होती, तेव्हा त्याला बाहेर पडता आले नाही. पण समीरने स्वप्नालीसाठी

आणलेली चॉकलेट, खेळणी तिला कधी द्यायची ? कशी द्यायची ? आपला हा प्रकार आगाऊपणाचा न होईल याची खात्री त्याला नव्हती. आणि तो संधीची वाट पहात होता पण संधी सापडेना. शेवटी समीरने आपल्या ड्रायव्हरला त्या वस्तु बंगल्याच्या मालकीणीला देण्यास सांगितल्या.

बेल वाजली, दरवाजा उघडला,

''आपण कोण ?''

''मी समीर दिक्षीत साहेबांचा ड्रायव्हर !''

'' काय काम आहे ?''

''हि तुमच्या मुलीसाठी त्यानी यू.एस.हून आणलेली खेळणी आणि चॉकलेटस देण्यास सांगितली आहेत !.

'' ठीक !.

तिने ती स्वीकारली आणि पुनः दरवाजा बंद करुन घेतला. म्हणजे तो हाच समीर होता तर तो येथे कसा काय ? की येथे त्याचा बंगला माझ्या बंगल्या शेजारी. हा योगायोग कसला ? आणि ती खूपच अस्वस्थ झाली रडून तिने ती रात्र काढली. नियतीच्या मनात माझ्या मनाला डागण्या देण्याचे आहे काय? की काही घडणार आहे. म्हणून आम्ही शेजारी आलो ! आज तर समीर तिच्या नजरे समोरुन हटत नव्हता, ते पुण्यातले कॉलेजचे दिवस, प्रेमाच्या नशेत नखशिकांत भिजलेले तिच्या मनात विचारांचे काहुर माजवित होते. पुढचे दोन दिवस अगदी अस्वस्थ अवस्थेत गेले. अनेक वेळा ती बंगल्यातून बाहेर आली, पण गाडी जागेवरच होती. आणि समीर बाहेर आलेला दिसला नाही तिला.

तो येवढा मोठा प्रवास करुन आला, हवामान वेगळे तब्बेत तर ठीक असेल ना त्याची ? की काही ? शंकेने तिचे मन साशंक झाले होते. तो तोच समीर आहे येवढे मात्र खरे होते. येवढे तिने जाणले होते. पण त्याने आपल्यालाही ओळखले आहे. हे ही खरेच पण आपण त्याला रिस्पेक्ट दिला नाही तेव्हा ही रजु नाही असे तर त्याला वाटले नसेल ना ? या विचारात तिचा एक दिवस सरत होता. जेवणावर तिची वासनाच नव्हती. पण स्वप्नाली मात्र खूष होती. खुप चॉकलेट, खेळणी...... तिची तर चांदीच झाली होती आणि ती त्या काकांवर खूष होती. शनिवार, रविवार असेच गेले सोमवारी स्वप्नालीच्या शाळेसाठी सोडायला ती बंगल्याबाहेर उभी होती.

तेवढ्यात समीरची गाडी बंगल्यातून बाहेर आली त्यावेळी रजु बाहेर उभी

होती तिने समीरला पाहिले, पण समीरने तिच्याकडे पाहिलेच नाही. खरेतर तो अजूनही संभ्रमात होता. कसे शक्य आहे. रजु इथे अहमदाबादमध्ये रहात आहे हा विचार बरेच दिवस त्याच्या मनात घोळत होता.

तो, सोमवार होता, रजु आपल्या मुलीला शाळेत जाणाऱ्या स्कुल बसमध्ये सोडण्यासाठी उभी होती. बस अजून आली नव्हती. समीरची गाडी बंगल्यातून बाहेर पडली, आणि डावीकडे वळणार येवढ्यात मागून येणाऱ्या शाळेच्या गाडीला ओवर टेक करुन एक ट्रक येऊन समीरच्या गाडीवर आदळला. उजवा दरवाजा उखडला डाव्याबाजुचाही निघाला आणि समीर बाहेर फेकला गेला. ड्रायव्हरने गाडी तेथेच सोडली समीरला बरेच लागले होते. आपल्या हातातली दप्तराची थैली स्वप्नालीकडे देऊन रजु धावली तिने समीरला उठवले व खाली नीट बसविले, मुलीच्या बाटलीतील पाणी प्यायला दिले. अजुन त्याने डोळे उघडले नव्हते. त्याच्या बंगल्याच्या गेटच्या पिलरला धरुन तो बसून होता.

त्याला पहाताच रजुने त्याला ओळखले. हा समीर आहे. थोडे पाणी चेहऱ्यावर मारले, समीरने डोळे उघडले तर रजु त्याला हव घालीत होती.

"मी कोठे आहे ?"

" येथेच बंगल्यासमोर" ड्रायव्हर बोलला.

पुन: त्याने डोळे बंद केले. त्याला ग्लानी आली होती. रजुने आपल्या बंगल्याच्या गेटची कडी लावली आणि ड्रायव्हरच्या मदतीने समीरला बंगल्यातल्या त्याच्या बेडरुम मध्ये आणले. डॉ. ना बोलावले. त्यानी तसे काही घाबरण्यासारखे नाही असे सांगून समीरला थोडा वेळने कॉफी देण्यास सांगितले. घरात दुसरे कोणी नव्हते. समीरच्या बंगल्यात किचन कोठे आहे, हे ही तिला माहित नव्हते.

"भाऊ ! तुम्ही साहेबाना पहा मी कॉफी घेऊन येते ! मी बाजुच्याच बंगल्यात रहाते! येते लगेच !" रजु.

म्हणत ती निघून गेली. आणि ताबोडतोब कॉफी बनवून थर्मास मधून घेऊन आली. समीर सकाळी कंपनीत गेल्यावर ब्रेक फास्ट करीत असे. आज उपाशीच बाहेर पडला होता.

" साहेबानी काही खल्ले आहे का ?"

"नाही !"

"घरात कोणी बाई माणुस ?"

" नाही! ते एकटेच रहातात !"

"म्हणजे !" .

" साहेबांचे लग्न नाही झाले !" ड्रायव्हर.

रजु स्तब्धतच राहिली. तिला काय बोलावे समजत नव्हते. अजून याने लग्न नाही केले ? तिला याच गोष्टीचे आश्चर्य वाटले. कां बर? कि अजून तो माझ्या धक्क्यातून सावरला नाही ! मी खुप मोठी चुक केली. त्याची शिक्षा मी भोगते आहे चुकलेच मी. 'मी हिमतीने माझ्या लग्नाला विरोध केलाच नाही. समीरचे प्रेम लाथाडले. म्हणूनच माझ्या वाट्याला हे दिवस आले. पैसा भरपुर पण प्रापंचिक कौटुंबीक सुख शुन्य' मी एकाकी जीवन जगते आहे की देवानेच मला शिक्षा दिली. तिला अश्रू अनावर झाले.

"भाऊ ! मी येते नाष्टा घेऊन तुम्ही साहेबांना पहा ! मी आलेच!" रजु.

आणि १० मिनीटात रजु परत आली तिने उपमा, करुन आणला होता. शिवाय घरी जेवण झाले असल्याने येताना टिफीन मधून जेवणही आणले होते. तिने ते डायनिंग टेबलवर ठेवले व समीरला हाक मारली.

"समीर ! उठा मी रजु !"

थोडावेळ असाच गेला. समीरची ग्लानी उतरली होती. तो उजव्या कुशीवर वळला. डोळे उघडले आणि समोर पहातो .'रजु' पलंगासमोर बसून समीर उठण्याची वाट पहात होती.

तो धडपडत उठला.

"रजु तू? येथे कशी ?".

"मी येथेच बाजुच्या बंगल्यात रहाते !" .

समीरचा अंदाज बरोबर निघाला.

बराच वेळ तो तसाच पडून होता. त्याने डोळे मिटले उघडावे असे वाटेना. रजुला तेथे पाहून तो थोडा गडबडलाच, काय बोलावे समजेना !.

"समीर ! डॉ. नी तुला कॉफी घ्यायला साांगितले आहे उठल्यावर !" रजु.

समीरने उठण्याचा प्रयत्न केला पण त्याला उठता येईना. तो पुनः तसाच पडून होता.

"भाऊ ! आपण याना बसवुया टेकून पलंगाच्या उशीला ! मला मदत करा !" रजु.

आणि त्या दोघानी समीरला पलंगावरचं पाठ टेकवून बसविले. समीरने डोळे

उघडले. आता तो पुर्णपणे शुद्धीवर आला होता. समोर रजु बसली होती, समीरने डोळे उघडताच ती उठली, तीने मगामध्ये कॅफी ओतली आणि समीरला देण्यासाठी पलंगाजवळ आली. समीर तिच्याकडे पहातच राहीला.

''कॉफी घे ! डॉ.नी सांगीतली आहे घ्यायला ! तु सकाळपासून काहीही खाल्ले नाहीस ! बरे वाटेल तुला !'' रजु.

समीरने हातवर केला कप घ्यायला पण हातवर येईना. त्याने पुनः पुनः आपल्या हाताकडे पाहीले. थोडी सुज आली होती मनगटाला. तरीही जोर करुन तो प्रयत्न करीत होता.

''नको! तुझ्या हाताला काहीतरी इजा झाली असेल!'' रजु.

आणि तिने तो मग त्यांच्या ओठाना लावला. पहिला घोट घेतला त्याने आणि तो थांबला. तो रजुकडे पहातच राहिला. डोळे मिटून आणि हरवला भुत काळात.

''समीर ! संपवना ही कॉफी ! मग बघू या हॉस्पीटलला जाऊन एक्स-रे काढावा लागेल ! तु आधी ही कॉफी संपव !'' रजु.

रजु देत असलेली कॉफी तो प्याला.

''तु इथे कशी ?'' समीर.

''मी बाजुच्या बंगल्यात रहाते, तुझे ॲक्सीडंट झाले तेव्हा मी बाहेर उभी होते स्वप्नालीला शाळेच्या गाडीला सोडायला. मी आणि ड्रायव्हर यानी तुला बंगल्यात आणले, तु त्यावेळी बेशुध्द होतास !'' रजु.

पण तू इथे अहमदाबादला कशी ?''

ती काहीच बोलली नाही.

''तू आधी हा नाष्टा कर, मी तुझ्यासाठी तुझा आवडता उपमा केला आहे ! तुझ्या पोटात काही नाही, तेव्हा हे खा! म्हणजे बरे वाटेल ! मी माझ्या फॅमिली डॉक्टरना फोन करुन बोलावते ! मग ठरवू, हॉस्पीटलला जायचे की नाही ! रजु.

समीर काहीच बोलला नाही. रजुने दिलेली उपम्याची प्लेट संपवली, पाणी प्यायला आणि हात धुन्यासाठी उठणार तर पाय खाली येईना, त्याने पाहिले पायाला सुज आली होती...

मी घरी जाऊन येते! डॉ. आता येतीलच !.

डॉ.कश्यप आले त्यानी समीरला चेक केले. पायाच्या हाडाला आणि हाताच्या खुब्याला मार लागला होता. त्याला सुज होती. एक्स-रे करणे जरुर

होते म्हणजे नक्की फॅक्चर किती आहे ते समजेल, असे डॉ. म्हणाले.

समीरने ऑफीसला फोन करुन दुसरी गाडी मागविली. आणि अहमदाबादला श्रवण हॉस्पिटलमध्ये जाऊन एक्स-रे काढले. डॉ.कश्यप सोबत होतेच. तसे सिरीयस काही नव्हते. पण आराम करावा लागणार होता. समीर एकटा घरात फिरु शकत नव्हता. त्याला कोणाची तरी मदतीची गरज होती.

''भाऊ ! तुम्ही घरात थांबा, साहेबांची काळजी घ्या !'' रजु.

ड्रायव्हरला सांगून रजु निघणार येवढ्यात समीरने रजुला हाक मारली.

'' रजु! धन्यवाद तुझ्या मदतीबद्दल!'' नाहीतर या सगळ्या गोष्टी कोणी केल्या असत्या ? तु देवा सारखी धाऊन आलीस आणि मी आता सुरक्षीत आहे ! हे सारे तुझ्यामुळे ! धन्यवाद !'' समीर.

''धन्यवाद कसले मानतोस ! मी माझे कर्तव्य केले. ६/७ वर्षानंतर तु भेटलास हा योगायोग समजायला हवा! माझा एकही दिवस, तुझ्या आठवणीशीवाय जात नाही ! हे सांगुनही, तुला समजणार नाही, म्हणजे तुझा विश्वास बसणार नाही ! तू निघुन गेलास आमच्या घरुन तेव्हा आणि मी वडीलांच्या भुलथापाना बळी पडले ! पुढे सगळा अंधार आहे. तुला सांगुन काय करु !'' रजु.

हे सांगत असताना तिला हुंदका फुटला अणि घळा घळा अश्रूंच्या धारा लागल्या. ती तेथेच समीरच्या पलंगावर बसली आणि मुसुमुसु रडू लागली.

''रडू नकोस ! सावर स्वतःला, काही गोष्टी आपल्या हातात नसतात ! नियतीचे नियोजन नाही बदलता येत आपल्याला. असेच समज ! म्हणू समीरने आपला हात तीच्या खांद्यावर ठेवला. ती सावरली. आवरले तिने अश्रू आणि उठणार येवढ्यात....

''थांब ! तु अजुन थोडा वेळ ! मला बरे वाटेल !'' समीर.

१२.३० वाजून गेले होते रजुने, तिने आणलेला टिफीन उघडला आणि ओवनमध्ये गरम करुन समीर समोर ताट ठेवले. डाव्या हाताने समीरने जेवण घेतले. रजुने त्या ताटातच त्याला हात धुवायला सांगितले कारण पायाला बँडेज होते उठता येत नव्हते....

''आता तुला कोण बघणार ! कोणाची तरी घरात गरज आहे ! तुझ्या बायकोला ताबडतोब बोलावून घे !'' रजु.

''कसली बायको ? माझे कोणी नाही. आई गेली तीन वर्षापुर्वी. आणि मी

लग्नच केले नाही अजून !'' समीर.

''मग आपण एखादी नर्स ठेऊ या का ?''

''नको' रजु तूच माझी नर्स हो !''

रजु काही वेळ स्तब्धच झाली, काही बोलावे समजेना तिला. तिने स्वतःला सावरले आता शाळेची गाडी येण्याची वेळ झाली होती.

'' मी जाऊन येते ! स्वप्नालीची गाडी येईल आता १ वाजलाय ! म्हणत ती निघून गेली. समीर तिच्या पाठमोऱ्या पहातच राहीला. तिचे येथे असणे, माझा अपघात तिने प्रेमाने केलेली मदत, या गोष्टीबरोबर ७ वर्षा मागच्या साऱ्या भेटी, गाठी, गप्पा त्याला आठवल्या आणि आपोआप त्यचे डोळे मिटले. मग कितीतरी वेळ तो त्याच नशेत होता. येवढ्यात रजु आली येताना तिच्या बरोबर तिची मुलगी होती.

''मम्मी! याच काकानी मला चॉकलेट दिली होती ! छान हो ही हं ! आवडले मला काका ! म्हणत स्वप्नाली त्याच्या पलंगावरच बसली. समीरने तिला जवळ घेतले. खुप आनंद झाला तिला.

''तुला हवी का अजून !''

''नकोत, तुम्ही परवा दिलेली चॉकलेट आहेत, खेळणी आहेत ! काका ! माझ्या बरोबर खेळायला कोणी नसते ! मी येऊ तुमच्याकडे!'' स्वप्नाली.

''हो ! का नाही ! मी घरी आल्यावर ये, नक्की ! मी तुला कॅरम, चेस, लुडो, साप शिडी, सारे शिकवीन जरुर ये !'' समीर.

आता समीरच्या सुश्रृशेसाठी रजुचे अनेक वेळा बंगल्यात येणे होई. खरेतर अमेरिकेतून आल्यावर सगळ्या गोष्टींची माहिती चेअरमन आणि मॅनेजींग कमिटीला देण्यासाठी समीर ऑफीसला चालला होता. पण हा अपघात झाला. पण चेअरमन आणि काही महत्वाचे सदस्य त्याच्या बंगल्यावर आले. संध्याकाळची वेळ होती. ते आल्यावर रजुने त्यांचे आदरतिथ्य केले. सारे खरेतर समीरच्या मिशनमुळे खुशीत होते, त्यांच्यावर कंपनीची यू.एस.मध्ये एक मोठी फॅक्टरी उघडणे हे खरे तर कंपनी आणि देशाला भुषणावह होते. भारताच्या अर्थ मंत्र्यानी चेअरमन आणि समीर यांना दिल्लीला बोलावले, कारण त्यासाठी भारत सरकारचे पुर्ण सहकार्य आणि परवानगी होती त्यासाठी आणि त्याचे अभिनंदन करण्यासाठी बोलाविले होते, त्याचा निरोप घेण्यासाठी हे लोक आले होते. शिवाय चेअरमनला समीरचे अपघात झालेला समजले म्हणून ते

स्वत:च आले. घरातल्या डायनिंग टेबल वरच सगळी चर्चा झाली. चेअरमन साराभाई यान खुप आनंद झाला. त्यांचे आदरतीथ्य ही रजुने छान केले. सगळेच खुष झाले.

शेवटी निघताना–

'' मी. समीर तुम्ही लौकर बरे व्हा ! तुम्हाला यू.एस.ला १५ दिवसात जावे लागेल पुढचे सगळे सोपस्कार पुरे करण्यासाठी. हवे तर त्यासाठी आपण नवीन कंपनी फॉर्म करु, पण आठवड्याभरात ऑफीसला या ! ओके. तुमच्या मिसेसने आमचे छान आदरतिथ्य केले धन्यवाद !'' साराभाई.

त्यांच्या रजुला मिसेस म्हणून केलेला उल्लेख ऐकल्यावर समीर गोरा मोराच झाला, पण समोर उभी असलेली रजु पण भांबावली. समीर बरोबर रजु नेही त्या सर्वांना नमस्कार केला. ती मंडळी निघून गेली.

रजु काही बोलली नाही, न बोलताच तशीच आपल्या घरी गेली 'चेअरमनने' तिचा केलेला मिसेस म्हणूनच्या उल्लेखाने ती भांभावलीच आणि समीरही त्याबाबत एक चकार शब्द बोलला नाही याचे तिला आश्चर्य वाटले. मग काहीच न बोलता ती निघून गेली. पुन: दिवसभर ती समीरकडे फिरकली नाही. संध्याकाळी स्वप्नालीने हट्टच केला म्हणून ती समीरकडे आली, पण येताना तिने संध्याकाळचे जेवण आणले होते.

आता समीर घरातल्या घरात फिरत होता. जमल्यास कॉफी बनवत असे कारण रात्रीचे त्याचे जेवण तो हॉटेल मधून पार्सल मागवीत असे.

आज स्वप्नाली खूपच मुड मध्ये होती. आज तिचा दुसरीचा रिझल्ट लागला होता. तेव्हा समीर साठी तिने मिठाई आणली होती. ती तिने समीरला भरवली, त्यालाही आनंद झाला. मग बराच वेळ त्यांचा कॅरमचा खेळ रंगला होता. स्वप्नालीने चेस, कॅरम या खेळात खूपच चांगली तयारी केली होती. त्यांचा खेळ चालत असताना रजु T.V. पहात होती. तो खेळ संपल्यावर रजु ने त्याला जेवायला वाढले व ती स्वप्नालीला घेऊन आपल्या बंगल्यात गेली.

गेल्या महीना भरात रजुला समीर बद्दल काहीच माहिती नव्हते. कोणत्या कंपनीत काम करतो, तो कोण म्हणून. त्याच्या परदेशातल्या जाण्याबद्दल ना समीरने काही सांगीतले. उगाच गैरसमज होऊ नयेत या भिती पोटी, ना रजुने आपल्याबद्दल समीरला सांगीतले, न त्यानेही रुची दाखविली हे जाणून घेण्याची, ती विधवा आहे येवढेच त्याला समजले होते. ते बंगल्या बाहेरच्या

नावा वरुन 'श्रीमती रजु रमेश कोठारी' या पाटीवरुन. सौ. असे का लिहीले नाही. असाही प्रश्न त्याला पडला पण त्याने तो टाळला का? या गोष्टीने तिही विचारात पडली. घरी गेल्यावर याच विचारात त्या रात्री तिला जराही झोप लागली नाही. आपल्या आयुष्यात नियतीने काय लिहीले आहे ? याचा पुनः पुनः ती विचार करत होती. दुसऱ्या दिवशी समीरच्या घरी जावे की नाही ? असाही प्रश्न तिला पडला. पण तो असहाय्य आहे हे जाणून तिने त्याचा जेवणाचा डब्बा ड्रायव्हरच्या हातात दिला. ती आली नाही कां ? असाही प्रश्न समीरला पडला. की खरोखरच ती दुखावली गेली या घटेनेमुळे. त्याच्या कंपनीचे चेअरमन साराभाई यांनाही माहीती नव्हते कि समीरचे लग्न झाले आहे की नाही. आणि रजुच्या घरातील सफाईदार, सालस, संस्कारी वागण्यातून तिने त्या मंडळीचे केलेले आदरातीथ्य एकाद्या घरच्या स्त्रीसारखे होते. सहजीकच साराभाईंचा तसा समज झाला असणार आणि ते बोलले. त्याचे काही चुकले नाही. समीरने त्या बाबत त्या क्षणी सांगावे असे काही भान त्याला नव्हते असे म्हणणेही काही चुक नव्हते. रात्र भर रजु या गोष्टी बरोबर आजवरच्या सगळ्या घटना आठवीत बसली आणि केव्हातरी सकाळी तिला थोडी झोप लागली. समीरचीही अवस्था तशीच होती.

त्या रात्री रजुला मागे घडलेली एक गोष्ट आठवली. हे पुर्वीचे लग्न खरेतर वडीलांच्या हट्टाने नाखूशीने झाले होते. समीरचे प्रेम आपण लथाडले त्यानंतर त्याचे सगळे संबंध तोडले. याचेही आता वैशम्य तिला वाटत होते. तिचे वडील एका वर्षापूर्वी अहमदाबादला आले सोबत आई होती. त्यांच्या मनात होते की रजुने पुनः लग्न करावे. चांगले स्थळ पहावे शिवाय तिच्या मुलीला सांभाळणारी माणसे भेटली तर उत्तमच अन्यथा ती त्यांच्याकडे आजोळी राहील असा होरा धरुन. एका मराठी मुलाचे प्रपोजल रजु समोर ठेवले. या गोष्टीने ती भयंकर चिडली आणि तिने तिच्या आई वडीलाना त्याच रात्री पुण्याला रवाना केले. खुप दु:ख झाले तिला. आताही तीचे वय काही फार नव्हते २७/२८ वर्षाची. अख्खे आयुष्य वैधव्यात घालवणे तसे क्लेशकारक होते. शिवाय सुरक्षीत नव्हतेच. म्हणून आई-बाबानी हा विचाार तिच्या समोर ठेवला. खरे तर त्यात चुक नव्हतीच, पण, एकदा अनिच्छेने पोळलेल्या हाताला मेहेंदी लावणे रजुला गुन्हेगारासारखे वाटत होते. त्यानंतर आई बाबांचे जाणे येणे वा फोन सारेच बंद झाले होते. आणि रजुनेही ते टाळले. आता तिने खंबीरपणे आपल्या मुलीसाठीच

जगायचे ठरवून लग्नाच्या वाटेने जायचे नाही असे ठरवले होते. पण पुन: समीरची भेट झाल्यावर मात्र आता तिचे मनही चलबीचल होऊ लागले होते. येवढे मात्र खरे आणि समीरची अवस्था काही वेगळी नव्हती.

समीर आठवडाभर घरीच होता. आता त्याची तब्बेत ठीक होती. पायाचे बँडेज पण काढले होते. आता तो बंगल्यात फिरु शकत होता. रजु त्याची सगळी व्यवस्था पहात होती. ठीक चालले होते. त्यात समीरला स्वप्नालीची छान कंपनी मिळली होती. खेळ गप्पाना उत येत होता आणि बऱ्याच वेळा रजुही त्यात सहभागी होत असे. अगदी खेळीमेळीचे वातावरण होते. तो आठवडा कसा गेला समीरलाही समजला नाही.

आता एक आठवड्यानंतर समीरला यू.एस.ची टूर करावी लागणार होती म्हणून समीर सोमवारीच ऑफीसला गेला. कंपनीने नवी गाडी पाठविली होती. सकाळी ९ वाजता तो ऑफीसला गेला. आता मात्र त्याचा बंगला साम सुम होता. रजुचाही आठवडा समीरच्या सुश्रूशेत गेला. तोही आनंदात होता. आता दोघांमधल्या संबंधाचे टेंशन कमी झाले होते.

त्यादिवशी समीर घरी आल्यावर रजु त्याच्या बंगल्यात आली. समीर फ्रेश होऊन बसला होता. ७ वाजले होते.

''समीर ! आज तू माझ्याकडे जेवायला यायचे आहे. मी खास बेत केला आहे. येशील ना'' ?.

''हो ! का नाही ! आता मीच हॉटेलला फोन करुन डीनर मागवणार होतो. आजचा दिवस सतत मिटींग होत होत्या. त्यामुळे खरेतर दुपारी जेवायला वेळच मिळाला नाही. दिवसभरात पाच कप कॉफी झाली तेवढीच. ठीक आहे मी येतो. किती वाजता येऊ ?.''

''आता आलस तरी चालेल, बोलता येईल, तोवर जेवणाची वेळ होईल !'' रजु.

'' हो तु चल... , मी येतोच!.

अर्ध्या तासाने समीर रजुच्या बंगल्यात आला. तो आला म्हणून स्वप्नालीला खुपच आनंद झाला. टाळ्या वाजवत तीने समीरचे स्वागत केले. आणि येऊन त्याच्या मांडीवर विसावली. हे सारे रजु पहात होती. तीलाही खुप आनंद झाला. स्वप्नालीचे समीरचे मैत्रीचे नाते घट्ट होत होते याचा आनंद रजुला झाला होता. हे आपले छोटेसे कुटुंबच झाले होते असे तिला वाटले.

रात्री डिनरनंतर तो निघणार होता आपल्या बंगल्यात तेवढ्यात स्वप्नालीने समीरला अडविले आणि कॅरमचा एक डाव खेळण्यास सांगीतला आणि समीर तो नाकारु शकला नाही.

आज रजुला समीरच्या कुटुंब, करीअर, कं. बद्दल बरेच काही जाणून घ्यायचे होते. तो थांबला म्हणून मधे मधे ती समीरला प्रश्न विचारीत होती आणि समीर उत्तर देत होता. समीर आणि स्वप्नालीचा खेळही रंगात आला होता.

''समीर ! तुझ्या कुटुंबात आता कोण कोण असते ! आणि ते कोठे आहेत''!.

''आई गेली! मी लग्न केले नाही ! तेव्हा सध्या मी एकटाच असतो. परवाच्या Accident मध्ये माझी सुश्रृशा छान केलीस, जेवणची व्यवस्था केलीस. धन्यवाद!'' समीर.

'' तू लग्न का केले नाहीस ?''.

'' करावेसे वाटले नाही! अणि सतत कामातून जराही वेळ नव्हता. त्यात तुझ्या आठवणी नाही विसरु शकलो मी. केव्हातरी पुढे पाहू म्हणून हा विषय सद्या प्रलंबीत आहे! परवाच्या अपघातानंतर कोणीतरी आपली काळजी घेण्यासाठी हवे आहे याची पहिल्यांदाच जाणीव झाली. येवढे मात्र खरे. तु होतीस माझी काळजी घ्यायला म्हणून सारे निभावले !'' समीर.

यावर रजू काहीच बोलली नाही. ती किचन मध्ये गेली आणि ग्लासभर दूध समीरसाठी घेऊन ती हॉलमध्ये आली. ततपुर्वी स्वप्नालीचा गेम संपला होता आणि ती बेडरुममध्ये पळाली.

ते दुध पिऊन समीर निघाला.-

'' छान ! डिनर झाले ! पूढल्या मंगळवारी मी यू.एस.ला जात आहे १५ दिवसासाठी, माझ्या साराभाई ग्रुपची एक मोठी कंपनी यू.एस.मध्ये सेट-अप करण्याचे प्लॅम आहे. या कंपनीचा जी.एम. म्हणून मी कंपनीचा रिप्रेझेन्टेटींव म्हणून तेथे जात आहे. आणि पुढे सतत जाण्याचा प्रसंग येणार आहे. इटस पार्ट ऑफ माय जॉब!''' समीर.

आता मात्र समीरने केलेल्या निवेदनातून त्याची सगळी माहीती रजुला झाली होती. खुप आनंद झाला होता या माहीती मुळे, ती सुखावली आणि आपण पुर्वी लग्न करुन चुक केली. एका चुकीच्या माणसाबरोबर संसार मांडला. कारण लग्नानंतर २/३ महिन्यातर त्याचे रंग ढंग तिला माहीती पडू लागले. रजु बाबांची

एकच कन्या तिच्या नवऱ्याला ती कंपनी लाटायची होती. त्याचसाठी तीच्या वडिलांवर त्याने गारुड केले होते. आणि ते ही त्याला बळी पडले आणि यात तिचाही बळी गेला. ती गरोदर राहिली आणि स्वप्नालीच्या जन्मापुर्वीच एका रात्री दारु पिऊन येत असताना त्याचा अपघात झाला. त्यात तो गेला. तो गर्भ पाडून टाकावा असा विचार तिच्या मनात येऊन गेला, पण ५ महिने झाल्याने डॉ. त्याला तयार नव्हते आणि स्वप्नालीचा जन्म झाला. त्या वेळी ती अहमदाबादला आली होती. तिच्या नवऱ्याने तिच्या वडिलांची कंपनी सोडली आणि अहमदाबादला येऊन स्वतःच्या वडिलांचा धंदा तो पाहू लागला. दररोज दारु पिऊन घरी येणे, भांडणे, राडा, रजुला मारहाण हे नेहमीचेच होऊन गेले होते. ती या सगळ्याला कंटाळली होती. पण एक दिवस तो त्याच्या सेर्केटरीला घेऊन घरी आला. आणि हे नेहमीचेच होऊ लागले. त्यात रजुचा तोल गेला. काय करावे समजत नव्हते पण पोटात वाढणाऱ्या बाळासाठी जीव ही तुटत होता. कदाचीत हेच बाळ माझ्यासाठी सुगीचे दिवस घेऊन येईल. असे तिला वाटत होते आणि याची प्रचिती तिला येत होती. समीर घरी आल्याबरोबर स्वप्नाली त्याच्या बंगल्यात येई. त्याचा सगळा क्षीण ओसरे आणि तासभराच्या खेळण्याने, गप्पाने त्याच्या मनाला उभारी येई. एक दिवस स्वप्नालीनेच समीरला कैचीत पकडले.

''काका ? तुम्ही एकटेच, तुमच्याकडे लहान बाळ नाही का खेळायला ?

या प्रश्नाने समीरही चक्रावला, आपण हिच्या प्रश्नाचे उत्तर तरी काय देणार ते लहान निरागस मुल माझ्या काळजालाच हात घालते आहे. असे राहून राहून त्याला वाटत होते. त्याने स्वप्नालीला जवळ बोलाविले तिचे प्रेमाने मुके घेतले आणि म्हणाला...

''बाळा ! तुच माझी मुलगी आहेस होय की नाही सांग ! '' समीर.

क्षणभर स्वप्नाली गोंधळली आणि समीरच्या गळ्यात पडली. दोघेही सदगदीत झाली होती समीरच्या डोळ्यातून अश्रूंचे ओहळ वहात होते.–

''काका ! तुम्ही का रडताय ?''

थोडा वेळ मध्ये असाच गेला आणि

''मला माझे बाळ सापडले म्हणून !'' समीर.

पुन्हा दोघे एकमेकांच्या गळ्यात पडली. येवढ्यात रजु आली. हा प्रकार पाहून ती ही चमकली काय बोलावे समजेना. समीरने तिला बसायला सांगितले,

अजून त्यांची मिठी तशीच होती..

“स्वप्नाली!” रजु.

तरीही तिने समीरची मिठी सोडली नाही,

“मम्मी, काका खुप चांगले आहेत ते मला त्यांची मुलगी म्हणाले, आहे की नाही मज्जा!” स्वप्नाली.

रजुला काय बोलावे समजेना. ती पार हरकुन गेली होती.

“चला डिनरला येताय ना?

“हो !”

आणि ती तिच्या बंगल्यात स्वप्नालीबरोबर आली व नंतर १५/२० मिनिटांनी समीर तिच्या घरी आला. येताना त्याच्या मनात आज हरवलेले सापडले असे भाव तरळत होते. आजचा त्याचा मुड काही वेगळा होता.तिघेही जेवायला बसले.

“मम्मी! काका मला आपली मुलगी म्हणाले! आहे की नाही मज्जा ! काय काका! स्वप्नाली.

सारे वातावरण बदलले.

“बोला काका ! खरे की नाही ! बोला !

“हो ! म्हणालो खरे आहे ! आहेसच तु माझी मुलगी बाळा ! आहेसच”!

आणि मग जेवण आटोपले आणि समीर आपल्या बंगल्यात आला, तो जेव्हा हे बोलला तेव्हा तो रजुच्या चेहऱ्यावरचा आनंद आपल्या दोन्ही डोळ्यांनी टिपीत होता. घरी आल्यापासून त्याच्या घराचे घरपण पार बदलले होते, जसे काही रजुने याला होकार दिला होता. असेच त्याला वाटले. ती रात्र त्याला वेगळीच जाणवत होती. आणि रजु बद्दलचे त्याचे मन तिच्याकडे ओढले जात आहे असे जाणवले. त्यांच्या झोपेचे आज पार खोबरे झाले होते. उदयाचा दिवस मध्ये होता. एका दिवसात यू.एस.ए.ला जाण्याची सगळी तयारी करायची होती. कार्यक्रम फिक्स करायचा होता. प्रोजेक्ट बघायची अंतिम बोलणी या विझीटमध्ये होणार होती. त्याच्या सोबत साराभाई पण येणार होते. पुरे डील फायनल करुन ......... होणार होत्या. त्या दिवशी त्याला यायला खूप उशीर झाला. रात्री ११ वाजले. येताना समीरने सॅन्डवीच आणले होते. तो ते खाऊन झोपणार होता. त्याची गाडी त्याच्या बंगल्यात शिरताना त्याची नजर रजुच्या बंगल्याकडे गेली, अजून लाईट होती म्हणजे ती समीरची वाट पहात असेल असे

वाटले त्याला. आणि रजुचा आवाज आला....

"समीर ! जेवायला येतो ना मी पण जेवली नाही ! ये. मी वाट पहातेय!" रजु.

काय वेडी बाई आहे ही माझी वाट ११ वाजता ही ती पहात आहे. नाही म्हणावे तरी ठीक दिसत नव्हते.

"हां ! येतो." समीर.

तो तिच्या घरी गेला जेवण झाले आणि तिचा निरोप घेऊन तो घरी आला. आजचा प्रसंग काय सांगत होता. अनेक प्रश्न त्याच्या मनात उभे होते. पहिला रजु माझ्यासाठी न जेवता का थांबली ? कोणी थांबेल का? आणि एक वेगळ्याच भावनेने तो अगदी सद्‌गदीत झाला.

"मी उद्या सकाळी लवकर म्हणजे ७ वाजता निघणार आहे ८.३० चे फ्लाईट आहे. सोबत आमच्या कंपनीचे चेअरमन आहेत. १५ दिवसांची ही टुर आहे. तु सकाळी स्वप्नालीला लवकर उठव मी तिला भेटूनच निघेन म्हणतो !" समीर.

"हो !" रजु.

समीरने आपले सामान बांधून ठेवले होते त्यासाठी त्याने त्याच्या ड्रायवरला घरीच यायला सांगितले होते.

सकाळी समीर उठला. निघून तयार झाला आणि रजुच्या बंगल्यात आला. स्वप्नाली उठून तयार होती. घरात येताना त्याने स्वप्नालीला जवळ घेतली तिचे गालगुच्चे घेत पापा पण घेतला....

"बाळ ! पुढचे १५ दिवस मी येथे नसेन, तुझी आठवण येत राहिल. मी रोज तुला फोन करीन न विसरता. " समीर.

" ओके काका !"

"रजु ! अजुन अर्धा तास आहे मला निघायला तु स्वप्नालीला घेऊन एअरपोर्ट पर्यंत येणार का ? माझी गाडी तुम्हाला आणुन सोडेल !" समीर.

स्वप्नाली टुण कण उडी मारुन पळत बेडरुम मध्ये गेली आणि कपडे बदलून पुन: हॉलमध्ये आली. तिच्या सोबत निघणे भाग होते. तिचा नाईलाज होता.

मग तिघेही गाडीत बसले एअरपोर्ट येताच समीरने पुन: स्वप्नालीचा पापा घेतला आणि तो आत गेला. आणि सगळे प्रोसेड्युर पुरे करुन पुन: बाहेर आला. वेटींग रुममध्ये, येवढयात कॉल आला. आता निघणे भागच होते. समीरने

स्वप्नालीचा पापा घेतला आणि आपला हात रजुच्या खांद्यावर ठेऊन तिच्याशी काहीही न बोलता तो पुन: आत गेला. त्याच्या जाणाऱ्या पाठमोऱ्या छबीला ती पहात होती आणि सद्‌गदीत अंत:कारणाने ती घरी निघाली....

गाडीतून घरी परतानाच्या २० मिनिटाच्या प्रवासात ती समीरलाच आठवीत होती. कॉलेजचे सारे दिवस तिच्या डोळ्यापुढे तरळत होते... आणि आसवानी आपली वाट मोकळी करुन घेतली.

मग समीर यू.एस.ला गेल्यावर रोज रात्री स्वप्नालीला फोन करी. रजुशीही बोलणे होई

''रजु ! तू स्वप्नालीला सांभाळ, माझी अमानत मी तुझ्याकडे सोपवून आलो आहे येथे. तू तिची काळजी घे !'' समीर.

आता रजुच्या घरचे सारे वातावरणच बदलले होते. कोणीतरी जिवा भावाची व्यक्ती दुर गेली आहे या विचारानी तिची झोप पार उडाली होती. मात्र स्वप्नाली गाढ झोपली हीती, रजु बिछान्यावर बसुनच होती. सकाळ पर्यंत यू.एस.ला पोहोचल्यावर एअरपोर्ट वरुनच त्याने रजुला फोन केला आणि पोहोचल्याची वर्दी तीला दिली. प्रश्न असा पडतो की त्याने रजुला फोन करावा. काही तरी कारण असणारच. कि नाही. याला म्हणतात प्रेम, ओढ. धप्याची धप्याकडे हे मात्र खरे. सुखावली रजु, आणि अख्खीरात्र झालेल्या झोपमोडी तून कलंडली. आज तशी स्वप्नालीच्या शाळेला रजा होती. कसलीच घाई नव्हती. पण स्वप्नाली जागी झाली, तीने रजुला हलवुन  उटवीले. ''मम्मी काका पोहोचले असतील का ? त्यांचा फोन आला होता का ? मला म्हणाले होते पोहोचल्यावर फोन करीन म्हणून !'' स्वप्नाली

''आला होता थोड्या वेळा पुर्वी !''.

''मग ठीक !''

म्हणत ती बाथरुम कडे पळाली– म्हणजे स्वप्नालीच्यावर ही समीरने गारुड केले होते तर आणि रजु वरही. ती सुखावली आणि आपल्या नेहमीच्या कामाला लागली.

रोज रात्री समीर रजुला फोन करीत होता. खूप गप्पा व्हायच्या. स्वप्नाली हजार प्रश्न विचारून समीरला सारे विचारीत रहायची विमानाचा प्रवास. मला बसायचे आहे तुम्ही न्याल का विमानातून. आणि समीर तिला अस्वस्थ करीत असे. खुष होई आणि समीर तसा योग कधी येईल याचा विचार करीत असे.

खरे तर कामाचा ताण खूपच होता. सकाळपासून रात्री उशीरा पर्यंत मिटींग होत होत्या. क्षणाचीही ऊसंत नव्हती. रात्री त्यांचे डिनर फाईव स्टार हॉटेल, यु.एस. कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत व्हायचे, पण त्यातूनही  वेळ काढून समीर रजुला फोन करायचा.

एक दिवस स्वप्नाली फोनवर बोलत होती.

''काका ! तुम्ही मला कधी नेणार ?''

''नेणार ना, जरुर नेणार. पुढच्या वेळी, नक्की नेणार ! समीर.

''नक्की ना ? प्रॉमिस ना !''

होय माझी आई ! नक्की. तूझ्या आईलाही !

स्वप्नाली खुष झाली, आणि रजुला म्हणाली, ''मम्मी काका ! मला आई म्हणाले!'' स्वप्नाली.

आणि ती हसत सुटली सुसाट. आनंद झाला होता तिला. यू.एस.ला जाणार, म्हणून.

हा सगळा होकार रजुला स्वप्नवत होता. कारण चारी बाजुनी ती गांजली होती, पैसा होता. पण जगणे कशाला म्हणतात, आनंद म्हणजे काय ? याचा स्पर्शही गेल्या ७ वर्षात तिला अनुभवता आला नव्हता. एकाकी जीवन, थोडे फार स्वप्नालीमुळे सैल झाले होते. पण त्याला काही अर्थ नव्हता. पैशाने नाही घेता येत आनंदाची अनुभूती तिला घेता आली नव्हती. पण गेल्या महिनाभराच्या समीरच्या सहवासाने हरवलेले सुख तिला गवसले आहे असा भास होत होता. तिच्या चेहऱ्यावर त्याची छटा स्पष्ट दिसत होती. खुष होती ती.

समीर पुन्हा यायला निघणार होता २/३ दिवसानी त्याने रजुला फोन केला व स्वप्नालीला द्यायला सांगीतला.

''स्वप्नाली ! तुझ्यासाठी काय आणू सांग !''.

''काही नको ! तुम्ही मला यू.एस.ला  घेऊन चलणार ना !''. स्वप्नाली.

'' होय ! नक्की ! समीर.

या त्याच्या उत्तराने स्वप्नालीने टाळ्या वाजवून ही बातमी रजुला सांगितली.

हे स्वप्न कसे येणार वास्तवात असा प्रश्न सहाजिकच रजुला पडला होता. कसे शक्य आहे ? पण तिनेही हा विषय अधांतरी सोडून दिला होता. जी गोष्ट अशक्य आहे त्याच्या मागे वहाण्यात अर्थ नव्हता हे ती पूर्ण पणे जाणत होती. स्वप्नालीचे ठीक आहे ती उद्या विसरुन जाईल पण आपण या गोष्टींवर विचार

करणे चुकीचे आहे. असे तिला वाटणे सहाजीकच होते.

दररोज रात्री समीरचा फोन यायचा, आज झालेल्या कामा बद्दल बोलणे व्हायचे, खरेतर रजुला यात फारसे स्वारस्य वाटत नव्हते. पण स्वप्नाली मात्र खुप खुप बोलायची . समीरलाही तिचे ते मृदू बोल खुप आवडायचे. दिवसभराच्या कामाचा ताण कमी व्हायचा. आणि स्वप्नाली समीरच्या फोनने आनंदी व्हायची. रजुला भीती वाटायची की हा सारा भ्रमाचा भोपळा होऊ नये नाही तर स्वप्नाली दुखावेल. लहान मुल ते, अल्लड पणात मनाला लाऊन घेईल. याची भिती त्याला वाटत होती. हे 'गारुड' कोणी कोणावर केले ही गोष्ट मात्र तिघांच्या संवादातून उलगडत जात होती. येवढे मात्र खरे. स्वप्नालीला समीरचा लळा लागला होता आणि समीरलाही. पण या मध्ये कारणीभुत रजुच होती. या दोन धृवाला साधणारी. येवढे मात्र खरे होते. अजुनही समीरच्या मनातले रजु वरचे प्रेम तसुभरही कमी झाले नव्हते. म्हणूनच तर त्याने लग्नाचा विषय दुर ठेवला होता. आणि योगायोगाने ती दोघे आता जवळ आली होती. नियतीच्या मनात काय आहे हे सांगणे कठीण होते येवढे मात्र खरे. जेव्हा एखाद्या गोष्टी घडणाऱ्या असतात ना तेव्हा वातावरण निर्मीती, योगायोग, सारे नियतीच निर्माण करते माणसाना खेळवीत. आणि माणसे अलगत या सापळ्यात अडकतात.

पुढच्या रविवारी समीर येणार असा निरोप आला होता. आणि कां ? कोण जाणे रजुच्या मनाची परिस्थिती दोलायमान झाली होती. आपले कोणीतरी जीवलग येणार आहे याची हुर हुर तिला दोन दिवस लागली होती. या सापळ्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न ती करीत होती. पण अधिकाधिक ओढली जात होती, असे कां व्हावे. याचा अनेल वेळा ती विचार करीत होती. पण या कोड्याचे उत्तर तिला सापडत होते. स्वप्नाली मात्र खूष होती काका येणार म्हणून. बस् ! तिची येर झार आत बाहेर चालूच होती. काका कधी येतायत याची ती वाट पहात होती आणि बाजुच्या बंगल्यात गाडी आल्याचा आवाज स्वप्नाली आणि रजुनेही ऐकला दोघीनाही आनंद झाला. स्वप्नालीने तर टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला व बाहेरच्या कठड्याजवळ येऊन उभी राहिली. ड्रायव्हर सामान काढीत होता पण समीरने गाडीतून बाहेर येऊन प्रथम स्वप्नालीला हात दाखविला आणि मग रजुला.

'' मम्मी ! मी जाऊ का काकांकडे !'' स्वप्नाली.

''नको ! अग काका नुकतेच आले आहेत त्यांना रेस्ट करु दे. मग येतीलच

की तुला भेटायला म्हणत तिला थांबविले. पण समीर बंगल्यात जाण्याऐवजी रजुच्या घरी आला. त्याने स्वप्नालीचा गालगुच्या घेतला, तिला उचलुन घेतली आणि मग रजुला हात दाखविला.

" मी फ्रेश होतो आणि मगच येतो ! मी जेवायलाच येणार आहे. मम्माला सांग "! असे स्वप्नालीला सांगायला तो विसरला नाही.

आणि दारात उभ्या असलेल्या रजुला हाय करुन तो आपल्या बंगल्यात आला. त्याची टुर खूपच यशस्वी झाली होती आणि सगळे डील पूर्ण झाले होते फॅक्टरीचे ठिकाणही नक्की झाले. ३६ एकरचा मोठा प्लॉट यू.एस. सरकारने या फॅक्टरीसाठी दिला होता. त्याचा प्लॅनही तयार झाला होता. आज साराभाई ही अगदी खूष होते. या प्रोजेक्टसाठी नवी कंपनीचे फॉरमेशन करायचे नक्की झाले आणि त्याच चेअरमन म्हणून साराभाईनी समीरची वर्णी लावली. खूप बोलणी झाली त्यांची विमान प्रवासात. आणि पुर्ण प्लॅन तयार झाला. शिवाय समीरला साराभाई ग्रुपच्या डायरेक्टर बोर्डावर समीरची नेमणूक झाली यू.एस.मध्ये सगळे डील समीरने कंपनीच्या वतीने सह्या करुन फायनल केले.

आता पुढल्या १५ दिवसांनी समीरला यू.एस.ला जावे लागणार होते. कंपनीच्या इमारतीच्या फाऊंडेशनसाठी, त्यासाठीचे सगळे सोपस्कार त्याला पूर्ण करायचे होते तेही तातडीने.

गेली अनेक वर्षे समीर अमेरिकेत या ना त्या कारणासाठी जात होता, पण एकदाही मनासारखी अमेरिका बघता आली नव्हती. या वेळी मात्र फाऊंडेशनशिवाय काहीही काम नव्हते. १० दिवसाची टूर होती. त्यानी तात्पूरती एक बिल्डींग भाड्याने घेऊन त्यांचे कॉर्पोरेट ऑफीस चालु केले.त्यासाठीचा स्कील्ड स्टाफ त्याला अपॉईंट करायचा होता, त्यासाठी जागतिक लेवलचे निकश लावून हुशार मॅनेजरचा स्टाफ यू.एस. आणि भारतातून आणायचा होता. यासाठीची ॲड त्याने तयार करुन वेब-साईडवर, टि.व्ही.वर देण्याची व्यवस्था करायची होती हे काम १ दिवसाचे होते. मग उरलेले दिवस तो अमेरिका पाहण्यासाठी राखून ठेवले होते.

समीरला एकट्याने यू.एस. पहाण्यात तसा रस नव्हता. कोणाची तरी कंपनी हवी होती. जीवा भावाचे कोणी सोबतीला असेल तर प्रवास आनंददायक होतो हे तो जाणून होता. म्हणून त्याने स्वप्नाली आणि रजुला सोबत नेण्याच्या विचारात होता. पण इतक्या कमी वेळात त्यांचा व्हीजा, पासपोर्ट कसा होणार?

पण ही जबाबादारी साराभाईनी एका मोठ्या एजन्टला देऊन हे कामही मार्गी लावले.

त्या दिवशी संध्याकाळी समीरने रजुला या टूर बद्दल सांगीतले, तिने प्रथम नकार दिला पण स्वप्नालीच्या हट्टा पूढे तिचे काहीच चालले नाही. तिने होकार दिला. जेवण झाल्यावर हि बातमी स्वप्नालीला समजली आणि ती नाचू लागली. अख्खे घर तिने डोक्यावर घेतले होते. मग समीर आपल्या बंगल्यात आला. रजु यू.एस.ला यायला तयार झाली. समीरचा आनंद हृदयात मावत नव्हता. या सगळ्याचे श्रेय तो स्वप्नालीला देत होता. आणि म्हणून त्याने निघताना तिला उचलून घेतले आणि तिच्या गालाचे चुंबन घेतली. तिच्या आनंदाला घर अपुरे पडत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वा.पासपोर्टच्या माहीती साठी अेजंट आला त्याने सगळी माहिति घेतली. तो रविवार होता. तेव्हा स्वप्नाली घरीच होती. फोटोग्राफर सोबत आणला होता. त्याने फोटो काढले व ऑनलाईन ॲप्लीकेशन तयार करुन सबमीट केले. हे पासपोर्ट तातडीने करण्यची व्यवस्था करण्यात आली व ४ दिवसात पासपोर्ट आल्यावर व्हिझीटचे सगळे सोपस्कार पुर्ण झाले. कंपनीने तिघांची टिकीटे काढली आणि पुढे सर्व ठिकाणी हॉटेलही बुक झाली.

थंडीचे दिवस होते तिकडे म्हणून समीर रजु आणि स्वप्नालीला घेऊन मार्केटला गेला गरम कपडे व जरुर ते सामान खरेदी करुन पुर्ण तयारी झाली. आता दोन दिवसात प्रवासाला निघायचे होते.

रजु ही आनंदात होती. स्वप्नाली तर हवेतच होती. विमानाचा प्रवास ती पहिल्यांदाच करणार होती. मग काय विचारता, तिचा पाय जमीनीवर ठरतच नव्हता. आणि एकदाची यू.एस.ची टुर सुरु झाली. प्लेन लेट होते पण अर्धा तास दुबईला थांबणार होते. ते यू.एस.ला सकाळी ६ वाजता पोहोचले. अमेरिकन कंपनीने त्यांच्या टान्सपोर्टची व्यवस्था केली होती. इन्फन्टसा एअरवेजच्या विमानाने प्रवास छान झाला. विमानातही तिघांचा गप्पांचा फड रंगला. मजेर प्रवास झाला. प्रवासात खिडकी जवळ स्वप्नाली बसली होती, मधे रजु आणि शेजारी समीर. आज रजुचे सगळे Tension उतरले होते. पण एक गोष्ट राहून राहून तिला सतावीत होती. हॉटेलात व्यवस्था कशी असेल ? वेगवेगळे बेड असतील की एकच बेड तीघांसाठी असेल. ही शंका समीरलाही आली होती म्हणून त्याने एक्स्ट्रा बेडची व्यवस्था सगळ्या हॉटेलमध्ये केली होती. याची कल्पना रजुला

नव्हती. संध्याकाळ पर्यंत ती तशीच तणावात होती. गेली अनेक वर्षांनी समीर, रजु एकत्र आले होते. काही गैर प्रकार घडू नये यासाठी समीरही सावध होता. तो एक मर्यादा पुरुष होता. या टुरच्या निमीत्ताने आपण गैर फयदा घ्यायचा नाही हेच त्याने ठरविले होते. ती त्याची प्रेयसी होती म्हणून आता ती लग्न झालेली स्त्री होती हे समीरने मनावर कायम ठसवून घेतले होते. तसा तो रजुचे लग्न झाल्या पासुन कोणत्याही स्त्रीच्या संपर्कात येण्याचे टाळीत आला होता. तो एक सुशील, संस्कारी पुरुष होता हेच खरे.

पहिल्या दिवशी हॉटेलचे डिनर घेतल्यावर ते आपल्या हॉटेल रुमवर आले तो प्रशस्त सुट होता. दोन बेड होते. समीरने आपल्यासाठी एक एक्स्ट्रा बेड मागवीला हे पाहुन रजुचा जीव भांड्यात पडला. ती एक विवाहीत स्त्री होती. एका मुलीची आई होती. त्यांच्या प्रवासात समीरने कोणताही गैर प्रकार केला नव्हता. आपण एका विवाहीत स्त्रीबरोबर आहोत हे तो पक्के जाणून होता. शिवाय तो एक मर्यादा पुरुष होता. त्यामुळे रजुचे संपुर्ण टेन्शन दूर झाले होते. आता आपला हा प्रवास सुखाचा होईल यात शंका नाही. खरच समीर हा खुप चांगला मुलगा आहे याची अनुभुती रजुला भारतात असताना व नंतरही आली होती आणि तिच्या मनात प्रेमाचा अंकुर नव्याने फुलू लागला होता. ती हे जाणून होती त्या दोघांमधला दुवा तिची कन्या स्वप्नालीच होती हे ही ती जाणून होती.

पहिला समीरचा दिवस ऑफीसमध्ये गेला, पण दुसऱ्या दिवसापासून टुरला सुरुवात झाली. त्याचा प्लॅनही तयार होता. एका आलीशान गाडीने हा सगळा प्रवास होणार होता. स्वप्नाली खुष होती. संपूर्ण टुरमध्ये ती काकाचा हात सोडायला तयार नव्हती. त्याच्या जवळ तिला सुरक्षीतपणाची जाणीव होत होती.

प्रथम त्यांनी नायगारा बघण्याचा विचार करुन ते निघाले. त्यानंतर कॅनडा, मग न्युयॉर्क सिटी, मादाम तुसाट मुझीयम, यू.ए. पार्लमेंट, म्यूझीयम, स्टिलींग लायब्ररी, Empire & feile bla, Time squre, Washintorn D.C., Cherry blossom असा सगळा प्लॅन ठरला व त्या प्रमाणे रोज १-२ ठिकाणे पहात त्यानी अर्धी अमेरिका पार केली. अजून २ दिवस होते परत भारतात येण्यासाठी, तो दिवस पॅकींग (मार्केटींग) साठी ठेवला होता. आणि शेवटचा दिवस ऑफीसची कामे आटोपण्यात. पुन: एक महिन्याने यावे लागणार असा सगळा कामाचे शेड्युल तयार होते. खरेदीला त्यांनी मोठ मोठे मॉल, शॉपिंग सेंटरना

व्हिझीट दिली. रजु नाही नाही म्हणत असतानाही काही वेस्टर्न ड्रेसस आणि स्वप्नालीला कपडे घेतले. काही गेम्स् घेतले आणि ते पुनः हॉटेलला आले.

आज सकाळ पासून पेचेजींग साठी बाहेर पडल्यावर संध्याकाळ कधी झाली काहीच समजले नाही. सगळेच थकून गेले होते त्या रात्री हलका डिनर घेऊन ते झोपले.

समीरच्या सहवासात रजुला पुनः पहिल्या सारखे वातावरण झाले आहे हे जाणवले. समीरचा स्वभाव त्याचे करीअर, भविष्यातील प्लॅनिंग या बद्दल माहीती मिळाली आणि पहिल्या लग्नाला स्वतः होऊन तयार झाली होती ठोकरुन समीरचे प्रेम. हि चुक आता तिला समजली होती. तो एक मर्यादा पुरुष आहे याचीही प्रचिती तीला आली होती. रात्री पुनः त्यांच्या गप्पा रंगल्या सगळ्या जुन्या आठवणीना ऊत आला वातावरण बदलत गेले. रजुने आपली चुक कबुल केली. आणि ती अबोल झाली.

''रजु ! तु बोलत रहा, मला खुप बरे वाटते आहे. तु अबोल झालीस तर मी अस्वस्थ होईन. प्लीज''!.

रजुने रडायला सुरुवात केली. समीरने तिला सावरले. तिने त्याच्या खांद्यावर डोके ठेवले.

''सॉरी! जे झाले ते विसरुन जा, दबावाला बळी पडले मी वडिलांच्या, लाथाडले तुझे निस्सीम प्रेम आणि तुलाही. खुप दुःख दिले मी तुला, समीर क्षमा कर मला!''

आणि बराच वेळ ते याच अवस्थेत होते. अनेक वर्षानंतरचा तिचा स्पर्श त्याच्या मनाला उभारी देऊन गेला. समीरने तिला झोपायला जाण्यास सांगीतले. रजुने स्वप्नालीला मिठीत घेऊन, ती झोपी गेली.

सकाळी लवकर उठून समीर आपल्या कॉर्पोरेट ऑफीसला गेला आणि संध्याकाळीच परत आला. दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजताचे फ्लाईट होते. सामानाची आवरा आवर त्यानी केली आणि झोपी गेला.

सकाळी सगळीच लवकर उठली अंघोळी झाल्या आणि निघून सर्वजण न्यू यॉर्क एअरपोर्टवर हजर झाले. फ्लाईटबरोबर वेळेवर निघाले. आजही स्वप्नालीने खिडकी पकडली होती आणि मधल्या सीटवर रजु आणि बाजुच्या सीटवर समीर होता. गप्पांच्या ओघात झोप केव्हा लागली समीरला समजलेच नाही आणि रजुही तशीच येताना फ्लाईट दुबई मार्गे आले व छत्रपती शिवाजी

टर्मिनलला उतरले. तेथून दुसऱ्या विमानाने ते अहमदाबादला आले. रात्र खुप झाली होती म्हणून समीर रजुच्याच घरी दुसऱ्या बेडरुममध्ये झोपला व सकाळी आपल्या बंगल्यात आला.

त्यांची टुर छान झाली होती. कपंनीचेही काम झाले होते. स्वप्नाली खुष होती.

तो रविवार होता. समीर कॉफी पिऊन आपल्या बंगल्यात आला, शॉफरने सामान गाडीतून उतरुन त्याच्या बंगल्यात ठेवले होते. आज कोठे जायचे नव्हते, जेट लॅक होता म्हणून दुपार पर्यंत समीर झोपलेलाच होता. जाग आली तेव्हा तो पुन्हा टूरच्या आठवणीत रमला. त्याने मनोमन आभार मानले ते स्वप्नालीचे. तिच्यामुळेच ती दोघे अगदी जवळ आली हे मात्र खरे.

येथे आल्यापासून समीरला जराही फुरसत नव्हती. तो रात्री उशीरा यायचा. दिवसभर मिटींग, दुपारी काहीतरी सॅन्डवीच वगैरे व्हायचे आणि संध्याकाळी कमालीची भुक लागलेली असायची. हॉटेल मधून रात्री अकरा-साडे अकरा कोण पार्सल आणणार म्हणून तो सरळ घरी येई. घरी बिस्कीट वगैरे असत. त्या पहिल्या दिवशीही रजु त्याची वाट पहात उपाशीच होती, पण गाडी बंगल्यात आली आणि ती बाहेर गेली. आणि त्याला हाक मारली.

''समीर! जेवायला ये ! मीही अजुन उपाशीच आहे. बरोबर जेऊ !'' रजु.

समीरला आश्चर्य वाटले, हि अजून कां जेवायची थांबली? आणि तो बंगल्यात गेला आणि फ्रेश होऊन बाहेर येतो तर, रजु दारात उभी. तिच्या हातात जेवणाचा डब्बा होता. ती आत आली तो डब्बा डायनींग टेबलवर ठेवला. आणि प्लेटस् आणायला किचन मध्ये गेली, तिने दोन प्लेटस्, वाट्या आणि चमचे आणले होते, दोन प्लेटस् मध्ये तिने जेवण वाढले.

'' ये! झाला का फ्रेश?''

''हो ! आलोच !''

म्हणून समीर हॉल मध्ये आला तर डायनिंग टेबलवर ताटे तयार होती.

''चला आपण जेऊन घेऊया !'' रजु

''स्वप्नाली कुठे आहे !

''घरी आहे झोपली आहे !''

''अशी तिला एकटीला कधी सोडू नको,'' शिवाय बाहेरुन दरवाजा बंद करणे ही धोक्याचे असते. शिवाय आपल्या बंगल्याना वॉच मन पण नाही तेव्हा

तिला एकटे सोडायचे नाही !'' समीर.

''हो ! आजच तुझ्याकडे आले, कारण मला माहिती होते तू काहीही न खाता झोपशील म्हणून !''

''बरं !'' समीर.

आणि दोघांनी जेऊन घेतले आज रजुने जेवणाचा खास बेत केला होता. आज संकष्टी असल्याने 'मोदक उकडीचे' तिने बनवले होते. तिला माहीत होते की समीरला हे खूप आवडतात. अनेकदा तो आईच्या हातच्या मोदकाची आठवण सांगत असे.

''छान ! खुप छान आवडले मला. माझी आई संकष्टी चतुर्थीला नेहमी उकडीचे मोदक बनवत असे ! आजही छान जमले आहे तुला ! गुड !'' समीर.

''थँक्यू !'' रजु.

आणि जेवण संपल्यावर ती किचनमध्ये सगळी भांडी घेऊन गेली. साफ करुन ठेवली, आणि ती निघाली.

''अग ! ही दोन भांडी मी घासली असती हॉस्टेल मधे ही कामे आळी पाळीने करावी लागत, मला सवय आहे त्याची ''! समीर.

''अरे ! पण मी असताना ? ठीक आहे ! उद्या नाष्टा करुनच ऑफीसला जा ! निघताना येऊन जा, की इकडेच आणु !'' रजु.

''नको ! मी येईन ! मला स्वप्नालीलाही भेटायचे आहे ! नंतर ती शाळेत जाईल, परत संध्याकाळ पर्यंत भेटणार नाही !'' समीर.

''ठीक !''

आज कामाचा प्रचंड ताण होता. फॉरेन एक्सचेंजपासून सगळी तयारी करायची होती. Dy Gov. RBI याना भेटायचे होते. शिवाय त्यांचे Bankers-Bank of Baroda, Union Bank यांच्याही गाठी घ्यायच्या आहेत. शिवाय नव्या कंपनीच्या शेअर्स बद्दल पब्लीक नोटीस काढायची होती. त्यासाठी कालच त्यानी एक 'बोकिल' या ब्रोकर ला संध्याकाळी भेटायला बोलावले होते. नव्याने इशु येत आहे. त्यासाठी वेगळे बँक अकाऊंट उघडायचे होते हे सगळे वेळेत होणे जरुरीचे होते . त्यांचे ऑफीस रात्री अकरा-अकरा वाजेपर्यंत चालू होते पण एकदाचे सगळे मार्गी लागले.

समीरवर तर स्वप्नालीने गारुडच केले होते. दोघांनाही एकमेकांशिवाय क्षणभरही करमत नव्हते. रजुच्या घरी स्वप्नालीचेच सतत बोलणे चालू होते.

समीर काका बद्दल. आणि याचा आनंद रजुलाही होत होताच कारण एकाकीपणाच्या दडपणातून त्या दोघीही बाहेर आल्या होत्या. गेली ५ वर्षे याच बंगल्याच्या चार भिंती याच त्याना सोबत करीत होत्या. याचे वैशम्य रजुला वाटत होते पण नियतीच्या सोंगट्या कशा सकारात्मकतेच्या दिशेने अशा पडल्या की सारे वातावरणच बदलून गेले होते. स्वप्नाली तर संध्याकळी समीरची येण्याची वाट पहात असायची. मग तो आल्याबरोबर स्वप्नाली समीरकडे. गप्पांचा फड रंगायचा, समीर तिला वेगवेगळ्या गमती जमतीनी मोहून टाकायचा! वेळ कासा जायचा हे त्याना कळत नसे.

एक दिवस तर कहरच झाला. समीरकडे जेवण झाल्यावर स्वप्नाली रजु बरोबर घरी जायला तयार होईना.

''नाही येत मी ! मी काकांकडेच झोपते, हवे तर तू ये ! मी नाही येणार !'' स्वप्नाली.

या तिच्या बोलण्याने रजु ही अबोल झाली. काय बोलावे समजेना. आपण असे करणे ठीक नाही. म्हणून तिने स्वप्नालीचा हात धरुन तिला ओढत घेऊन जाऊ लागली, पण तिने अंग टाकून दिले. समीर ही आला तेथे. त्याने स्वप्नालीला समजाविले पण ती काही ऐकायला तयार नव्हती आणि रजु ही तिला घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करत होती.

शेवटी समीर म्हणाला .

''रजु ! राहू दे आजचा दिवस तिला येथे झोपू दे ! काही काळजी करु नको ! मी तिची काळजी घेईन !'' समीर.

आणि त्याने तिला बेडरुममध्ये नेले रजुचा नाईलाज झाला आणि ती निघून गेली आपल्या बंगल्यात. गेली खरी पण अख्खी रात्र ती पलंगावर बसून होती. तिची झोप पार उडाली होती. स्वप्नाली इतकी समीरच्या आहारी जाईल असे तिलाही वाटले नव्हते. आणि दुसरे मन सांगत होते ती एकाकीपणातून बाहेर आली तेही बरे झाले. कोणीतरी वडिलांची माया देतो आहे. त्याचा सहवास तिला आवडतो आहे याचाही आनंद तिला होता. पण आज ती आपल्या जवळ नाही या गोष्टीने तिची झोप उडाली होती. आजवर तिने स्वप्नालीला एकटे कधी सोडले नव्हते ही पहिली वेळ होती. त्यामुळे तिला एकाकी वाटू लागले होते. दोन वेळा तिने समीरच्या बंगल्याचा कानोसा घेतला ती रडत तर नसेल, मी नाही म्हणून. पण सगळे काही सामसुम होते. ती ही आता एकाकी पणाच्या

दडपणातून बाहेर आली होती. सकाळ केव्हा झाली हे तिला समजले नाही. सकाळीच तिने समीरच्या बंगल्याची बेल वाजवली. समीर नुकताच उठला होता ती तशीच बेडरुम मधे गेली तर स्वप्नाली गाठ झोपेत होती.

"पण तिला शाळेत जायचे आहे, सगळी तयारी व्हायला हवी ! समीर मी जाते तिला पाठवून दे !" रजू.

आणि ती आपल्या बंगल्यात आली ८ वाजले होते. ९ ला तिच्या शाळेची गाडी येते. ततुपुर्वी ती तयार व्हायला हवी. स्वप्नालीच्या आंघोळीसाठी पाणी काढून तिने स्वप्नालीला हाक मारली. आणि तिही परत आपल्या बंगल्यात आली. खुप आनंदात होती.

"स्वप्नाली ! तू काकाना त्रास नाहीना दिलास!"

"अगदी नाही '! त्यानी मला खुप गोष्टी सांगीतल्या, मला झोप कधी लागली समजलेच नाही. रात्री झोपली ती आता उठली ! मम्मी, वेळ झाला आहे भराभर तयार व्हायला हवे आहे. चल !" स्वप्नाली.

आणि ती बाथरुममधे गेली. रजुने तिचे दप्तर भरले. टीफीन तयार केला स्वप्नालीला कपडे घातले आणि गाडीची वाट पहात होती. आज तिने टिफीन साठी आणि समीर साठी पण नाष्टा तयार केला. कामाच्या गडबडीत गाडी जाईल म्हणून ती ने प्रथम स्वप्नालीला सोडले आणि मग ती नाष्टा घेऊन समीरकडे आली. समीर निघण्यासाठी तयार होत होता. आज बोर्डाची मिटींग होती, त्याला त्याच्या नव्या कंपनी बद्दल कमिटी मेम्बरस अवगत करायचे होते. म्हणून पूर्ण तयारीनीशी तो तयार झाला होता. रजुला उशीर झाला म्हणून त्याने कॉफी आणि बिस्कीटे खाल्ली होती. पण रजु आल्यावर दोघांनी नाष्टा घेतला. पुनः रजुने दोघांसाठी कॉफी केली. समीर निघणार होता पण रजुमुळे त्याचा पाय बाहेर निघत नव्हता.

"तुला त्रास दिला नाही ना स्वप्नाने ?"

" नाही नाही ! गोष्टी सांगता सांगता मलाही झोप आली आणि तिला ही ! काही त्रास नाही दिला उलट ती खूप खुशीत होती. तुझी आठवणही नाही काढली तिने !" समीर.

या शेवटच्या वाक्याने तिच्या काळजात धस् झाले ! आता मात्र रजुच्या मनाची घालमेल झाली होती. तिने अनेक वेळा डोळे मिटले आणि सारा भुतकाळ डोळ्यासमोर उभा राहिला. आणि एक वेगळीच भिती तिच्या मनात

रास करु लागली होती. आपण आपला काळजाचा तुकडा तर हरवून बसलो नाही ना ! आता तर ती अधिकच अस्वस्थ झाली होती डोळ्यात आसु येण्यापुर्वी तिने तेथुन निघून आपल्या बंगल्यात ती आली आणि पलंगावर अंग टाकले. आपल्या आसवांना मोकळीक करुन दिली, त्यात तिचा डोळा लागला. ती उठली तेव्हा दरवाज्यावर स्वप्नाली बेल वाजवित होती. हे दोन-तीन तास आपण कोठे आहोत याचा तिला विसर पडला होता.

स्वप्नाली येताच तिने तिला कडकडून मिठी मारली आणि कितीतरी वेळ ती तिच्या मिठीत होती. स्वप्नालीला हे सगळे नवेच वाटले तीने रजुचे आसवानी भरलेले डोळे पुसले. आणि पुन: मिठीत समावली. मम्मी का रडते आहे ? याचा प्रश्न तिला पडला होता, पण त्या बालमनाला मम्मीच्या ह्रदयात काय चालले आहे. आज रजु जास्तच सदगदीत झाली होती. सगळा भुतकाळ दु:खात गेला. लग्नानंतरचा गेल्या ७ वर्षाचा काळ त्यासाठी ती स्वत:लाच दोष देत होती यासाठी ना ती होती ना नशीब कोणही जबाबदार नव्हते पण ती स्वत:च् समीरच्या संर्पकात आल्या पासून तिच्या दिनचर्येत, वागण्यात विचारात खूप फरक पडला होता. दु:खाची झापडे तिने केव्हाच फेकून दिली होती. आता तिचे तिघांचे ते कुटूंब झाले होते. पण अजूनही तिच्या मनाचा ना समीरच्या मनाचा अंदाज लागत होता. दिवस जात होते. रजुमुळे त्याच्या ही जगण्याला अर्थ आला होता. तो त्या दोघींच्या सहवासात खुष होता. पण स्वत:ला दुर ठेवत होता. कोणतीही गोष्ट कोणाच्या मना विरुद्ध वा जबरदस्तीने आपली करुन घेणे त्याला पसंत नव्हते. त्याने जर रजुला विचारले असते लग्नाबद्दल तर तिने नक्कीच होकार दिला असता पण हे ठीक नाही हे त्याने जाणले आणि मनात असूनही त्याने मौन पाळले. तो ही आता तिशीकडे झुकला होता. आता लग्न करावे. आता तो आर्थिक दृष्टीनेही सक्षम झाला होता. त्याच्या व्यवसायिक करीयरला सुंदर सुरुवात झाली होती. भविष्य उज्वल होते. त्याचे नाव जागतिक स्थरावर घेतले जात होते एक यशस्वी उद्योगपती म्हणून. पण जीवनात काय लिहिले आहे याचा अंदाज येत नव्हता. त्याला कोणताही अताताईपणा करायचा नव्हता. आपले प्रेम रजुवर आहे. ते शुद्ध आहे. वासनायुक्त नाही हे तो जाणत होता. आता तर ती सहवासात आल्याने समीर आनंदात होता. पण आधाशी नव्हता. तो एक मर्यादा पुरुष होता.

रजुचीही अवस्था काही वेगळी नव्हती. आपण समीरचे प्रेम लाथाडले.

त्याचे चटके तिने खाल्ले होते आणि अजुनही त्याचा शेवट नव्हता. समीरने लग्न केले नाही ते आपल्यावरच्या निस्सीम प्रेम मुळेच. याचीही तिला खंत होती. आयुष्यभर तो मला विसरणार नाही आणि त्याच्या प्रपंच्यातही तो सुखी होईल असे तिला वाटत नव्हते. कदाचीत तो मला स्वीकारील, प्रपंचाची घडीही बसेल असे वाटत होते. पण त्या वयातल्या लग्नाची मजा नाही. तो सांभाळून घेईल मला पण माझ्या मनातील अपराध्याची भावना काही कमी होणार नाही. ही जीवनाची दुरुस्ती असेल. सुखी संसाराच्या व्याख्येत बसू शकते का? शिवाय मी एका मुलीची आई आहे. आता ती १० वर्षाची होऊन गेली आहे तिला सगळे कळू लागले आहे. मला ही आता स्वत:ला संयमी रहायला हवे. वहावत जाणे ठीक होणार नाही. हे ती जाणत होती. आमचे संबंध मित्रत्वाचे रहायला हवेत. बस्. तिला घरी काही काम नव्हते. स्वप्नाली मोठी झाली होती, आता ती ९वीत होती. तिची अभ्यासातील काहीही कमी नव्हते. ती स्वत:ची काळजी स्वत: घेऊ शकत होती. येवढी शहाणी आणि जबाबदार होती. आणि समीरशी तिचे सख्य वडील आणि मुलगी असेच होते. त्याच्या शिवाय तिला करमत नव्हते. ती त्याला भेटली नाही असा दिवस जात नव्हता.

पण रजु मात्र रिकामीच होती, येवढी इंजीनिअर पण नवऱ्याच्या विम्याच्या मिळालेल्या रकमेवरच अजून दिवस काढीत होती. स्वप्नालीला तिला मोठे करणे हीच एक मोठी जबाबदारी तिची होती. बँकेतली रक्कम तिच होती आणि दिवसेंदिवस कमी होत होती, खर्च वाढत होता. हे सारे समीरला समजले स्वप्नाली कडून त्याने यावर उपाय शोधला होता.

''रजु ! माझी तुला एक विनंती आहे, आता स्वप्नाली मोठी झाली आहे. ती स्वत:ची काळजी घेत आहे. तू येवढी शिकलेली केमिकल इंजिनीअर, तु एखादा जॉब का करीत नाहीस ?.''

''अरे बाबा आज काल नोकरीत कोठे सुरक्षितता आहे. मी विधवा. लोकांच्या नजरा धोकेबाज, कसा लागणार टिकाव माझा? त्यापेक्षा आहे त्यातच गुजराण मी करीत राहिन.

तुझ्या मिस्टरांचा बिझनेस होताना, आणि प्रॉपर्टीही बरीच होती !'' समीर.

''हो ! होती पण माझा सासरा आणि दिरानी ती लाटली. त्याच्या धंद्यात झालेल्या प्रचंड नुकसानी पासून स्वत:ला वाचविण्यासाठी. एक एक करुन सारे विकले. अजूनही त्याना स्थिरता नाही. अजून काही आहे कां? याचा शोध घेत

आहेत. माझ्या नवऱ्याने माझे नॉमीनेशन कोठेच केले नाही. फक्त इन्सुरन्स पॉलिसीवर होते. म्हणून नाही तर एक मुल पदरात घेऊन मी रस्त्यावर आले असते. आता त्यांची नजर या बंगल्यावर आहे असे त्यांच्या एका नातेवाईकाने मला गेल्या महीन्यात सांगीतले, त्यांच्यावर बँकेची मोठी कर्ज आहे. बँका त्या प्रापर्टीज् अटॅच करीत आहेत. या बंगल्यातही माझे नॉमीनेशन नाही. मला भिती वाटते हे संकट कधीही येऊ शकते!'' रजु.

हे ऐकून समीर तर हललाच. त्याला खुप वाईट वाटले. मी असताना ती रस्त्यावर कशी येईल? हे ही त्याने ठरवले होते. तिला आणि तिच्या मुलीला सांभाळणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे. तेव्हा वेळ येईल तेव्हा पाहू! अगोदर तिच्या नोकरीची व्यवस्था करायला हवी. कोणावर विसंबून न रहाता तिने स्वतःच्या पायावर उभे रहावे हा एकमेव उपाय आहे. कोणचे तरी अश्रित रहाणे तिच्या स्वभिमानी मनाला पटणारे नाही. शिवाय तिच्या मुलीची जबाबादारी आहे. तिचे शिक्षण, लग्न, रहायचे घर हे सगळे ती सांभाळू शकते तर ती नोकरी करीत असेल तर. त्याला वाटले केव्हातरी आपण तिला विचारायला हवे. भले तिला आवडो न आवडो.

एक दिवस रविवारी त्याच्या बंगल्यात ती तिघे जेवत होती. तिच्या वरील गोष्टींचा विषय समीरने मुद्दाम छेडला.

''रजु ! तु एक स्कॉलर इंजिनिअर, तू एखादा जॉब का करीत नाहीस. जर तुझी तयारी असेल तर मी आमच्या कंपनीच्या प्लॅनिंग डिपार्टमेंटमध्ये तुला जॉब देतो ! मला दोन दिवसात सांग ! तुझाही वेळ जाईल, चांगला पगार मिळेल आणि स्वप्नालीच्या भविष्याची व्यवस्था करता येईल. तेथे तू सुरक्षित असशील याची मी खात्री देतो!'' समीर.

''मी विचार करुन सांगते ! मला तुझे म्हणने पटतेय ! पण अजून तशी वेळ आली नाही. स्वप्नालीला विचारायला हवे !'' रजु.

''ठीक आहे !''

''कारण पुढच्या आठवडयात आम्ही ॲड दिल्यामुळे अर्ज येत आहेत. २५ जागा आहेत तेव्हा तू नक्की कळव !'' समीर.

'' हो !''

आणि मध्ये आठच दिवस गेले. रजुच्या दिराने बँकेला दिलेल्या माहीती नुसार बँकेने तिच्या नवऱ्याची ही मालमत्ता अटॅच करण्यासाठी नोटीस बजावली

! आणि रजु हादरली.

रजुची सगळी हकिकत ऐकल्यावर या प्रॉपर्टीवरही अटॅचमेंट येणार हे समीर जाणत होता. कारण रजुचा नवरा त्यांच्या फर्ममधे भागीदार होता. तिचा दिर फायनानसिंग आणि मनी लॅडींगचा धंदा करीत होता हे समीरला नंतर कळले. एकदाची रजु संकटात होती. यावर काहीतरी उपाय शोधायला हवा म्हणून समीरने आपल्या कंपनीच्या सॉलीसीटरला ही केस हॅन्डेड करायला सांगीतली त्यात १) या प्रॉपर्टीची खरेदी रजुच्या स्वतःच्या उत्पन्नात केली कां ? २) ही प्रॉपर्टी बॅंकेला मॉरगेज आहे कां ? ३) या प्रॉपर्टी वर नॉमीनेशन कोणाचे आहे ?

खरे तर यातले काहीही सिरीयस नव्हते. केस तशी कॉम्प्लीनकेटेड नव्हती. पण या प्रॉपर्टीसाठी बॅंकेचे लोन मात्र रजुचा नवरा, सासरे यानी घेतले होते, म्हणजे ही एक अडचणच होती. या प्रॉपर्टीत रजु नॉमिनी नव्हती. ती एकच अडचण नव्हती नाहीतर बॅंकची रक्कम देऊन ही प्रॉपर्टी सोडवता आली असती वा रजुने दुसरे लोन घेतले असते.

मामला कोर्टात गेला. पण काहीही उपयोग झाला नाही, बॅंकेच्या बाजुने निकाल लागला आणि आता ह्या प्रॉपर्टीचा लिलाव होणार हे नक्की झाले, कारण लोनचे हप्ते गेली ६ वर्षात कोणीही भरले नव्हते. बॅंक ऑफ बरोदा ही समीरच्या कंपनीची बॅंक. त्यामुळे चेअरमन, एम.डी. सह सगळे अधिकारी संपर्कात होते. ती लिलावाची नोटीस येण्यापूर्वीच समीरने ती बॅलेन्स रक्कम बॅंकेला व्याजासह देऊन प्रॉपर्टी आपल्या ताब्यात घेतली. अजुनही रजु व तिची त्याच बंगल्यात रहात होती.

या व्यवहारात खरेतर समीरचा फायदाच झाला. नाहीतर लीलाव झाला असता. तर उर्वरीत रक्कम तीच्या सासऱ्याला मिळाली असती. लीलाव झाला पण तो फार्स होता. समीर व्यतिरीक्त कोणीही पुढे आला नाही. आणि हा व्यवहार झाला. एकतर रजु मराठी, या गुजराथी कुटुंबात तिला तशी किंमत नव्हती तेव्हा हा खोडसाळ पणा तिच्या दिर आणि सासऱ्याने केला होता. त्या फर्ममध्ये तिच्या नवऱ्याचे भांडवलही त्यानी खाल्ले. पण शेवटी ती फर्म बॅंकरप्ट झाली आणि लिलावात निघाली. रजुला एक रु. ही मिळला नाही.

त्याच दिवशी रात्री रजु आणि स्वप्नाली समीरकडे आली. पण येताना तिने जेवणाचा टिफीन आणलेला नव्हता.

''समीर ! आज आमच्याकडे जेवायला चल ! मला खूप बोलायचे आहे

तुझ्याजवळ. तुझे उपकाराचे ऋण कसे फेडावेत हेच कळत नाही. आम्हा दोघींना रस्त्यावर येण्यापासून तु वाचविलेस !''

''नाही मी काहीही केलेले नाही ! स्वार्था पोटी तर नाहीच नाही. एक मैत्री निभावली ! बस ! रजु तुझे पुर्व जन्मीचे काहीतरी ऋण होते ते फेडले मी. आणि अजून असेल तर ते ही फेडेन तू चिंता नको करु ! मी फारसे काही नाही केले ! रजु माझाही आज जेवणाचा मुड नाही'' समीर.

रजु आणि स्वप्नाली आपल्या घरी परतल्या. स्वप्नालीने जेवण घेतले पण रजु मात्र उपाशीच झोपायला गेली. आज तिला बराच वेळ झोप लागली नाही. ११ वा. ती बाहेर आली समीरच्या बंगल्याचा लाईट तशाच होत्या. येवढ्यात तो जेऊन १० पुर्वीच झोपतो जेव्हा तो घरी लवकर येतो. आज सगळ्या लाईट ऑन होत्या म्हणजे तो झोपला नाही. आज जेवलाही नाही. रजुला या मुळे खुपच टेन्शन आले. काय करावे समजेना. तिने समीरला फोन केला.

''अजून झोपला नाही ?''

''नाही !''

'' कां? रागावलास कां माझ्यावर. मीही जेवले नाही. मी सकाळी तूला भेटते !'' रजु.

सकाळी समीर ऑफीसला जाण्यापुर्वी रजु त्याच्या बंगल्यात गेली. तो शनिवार होता. हल्ली आठवड्याचे सगळे दिवस ऑफीस चालू होते कारण कामाचा उरक करणे होते पुनः पुढच्या आठवड्यात समीर यू.एस.ला जाणार होता म्हणून.

''समीर ! मी नोकरी स्वीकारायला तयार आहे. मी माझा अर्ज आताच पाठवते ! रजु.

''ठीक आहे तु एक काम कर उद्या माझ्या बरोबर ऑफीसला चल. एक जुजबी मुलाखात घेऊन तुला नोकरीची ऑफर देतो विसरु नको ! पण स्वप्नाची व्यवस्था काय करणार ?''

मी तिच्याकडे चावी दिली आहे ती स्वत: घर उघडेल. तिची चिंता नको ! रुजु.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वा. ती समीर बरोबर कंपनीत गेली. आज रविवार होता. पण स्वप्नालीचा क्लास होता. म्हणून ती शाळेत गेली होती. ऑफीसला पोहताच तिचा अर्ज तिने हेड ऑफीस इनचार्जकडे दिला. एक

असिस्टंट मॅनेजमेंट घेत होता, जो समीरकडे चेअरमन बरोबर आला होता. रजुला पहाताच तो उभा राहिला. मॅडम बसा ! मी सरांकडे आलो तेव्हा तुम्ही आमचे छान आदरातिथ्य केलेयत. आज इकडे कशा काय ?.

"मी इन्टरव्हूला आले आहे !" .

"कसे शक्य आहे !"

"मला जॉब हवाय !"

"ओके दिला ! तुम्ही तुमचे नेमणुकीचे पत्र कलेक्ट करा !" मॅनेजर.

रजु बाहेर आली, तिला आनंद झाला. तिने पत्र घेतले आणि समीरच्या केबीनमध्ये आली. त्यावेळी एक मिटींग चालू होती. ती आल्याचे समजताच त्याने मिटींग सोडली आणि बाहेर आला आणि सेक्रेटरीला सांगून तिला घरी सोडण्यासाठी गाडी देण्यास सांगितली. ती घरी आली. आज सारेच काही स्वप्नवत वाटत होते. समीरचे मोठेपण तिने पाहीले. त्याची कॅबीन पाहिली आणि तिला त्याच्याबद्दल खुप आदर, प्रेम वाटले. तो आपला मित्र आहे म्हणून नाही तर त्याच्या यशस्वी करियरबद्दल .

तिने घरी येताच ही बातमी स्वप्नालीला दिली आणि तिचे पत्र तिला वाचायला दिले. खरेतर अजून रजुनेही ते पूर्ण वाचले नव्हते. ती धुंदीतच घरी आली.

"अभिनंदन! "स्वप्नाली.

"मम्मी पगार किती आहे वाचलास कां ?

"नाही! "

"एक लाख रुपये !" स्वप्नाली.

ही सगळी समीरची मेहेरबानी होती. हेच तिला जाणवले. असो आता उद्या कामाला जाणे आहे. पण कसे जाणार ? समीर बरोबर जाणे योग्य होईल कां? तो चेअरमन मी एक स्टाफ, इतराना असुया वाटायला नको. त्या पेक्षा आपण रिक्षानेच जाऊया. पण समीरला काय वाटेल ? एक दिवस ठीक पण दररोज जाणे गैरसमज पसरवणारे ठरु नये.

सकाळी तिच्या घरी ड्रायवर आला. "तुम्हाला साहेबांनी तयार व्हायला सांगीतले आहे !" ड्रायवर

"ओके !" ती.

तिने निघताना तिच्यासाठी आणि समीरसाठी टिफीन घेतला होता. खरेतर

समीरचा ठिकाणा नसतो. जेवणाची वेळ नक्की नसते. कोणीना कोणी सोबत असते. माझे ठीक आहे. पण समीरचे काय ? त्याला टिफीन कसा देऊ.

"गप्प का ?"

"काही नाही !"

"तरी पण !"

अरे मी येताना टिफीन आणला आहे पण ?

"पण काय ? दे माझ्यकडे मी कॅबीन मधे खाईन, तु चिंता करु नको ! तु कोठे जेवणार ? तु आज माझ्या कॅबीनमध्ये ये सोबतच दुपारचे जेवण घेऊ !" समीर.

रजुचे सकाळपासुनचे टेन्शन संपले होते. पण लोकांना काय वाटेल? स्टाफ, सेक्रेटरी काय म्हणतील, मी कोण, माझे नांव वेगळे ? हे काही ठीक नाही. त्या पेक्षा उद्यापासून वेगळा टिफीन देईन तेच योग्य होईल असे तिने ठरवले.

तिची नेमणूक कंपनीच्या प्लॅनिंग डिपार्टमेंटमध्ये केली होती. काम नवीन होते पण सगळा स्टाफ चांगला होता. त्यांनी खूप मदत केली. आणि कामही समजले. कारखान्याच्या प्रॉडक्शन संदर्भात काही नोटस् तिने दिलेल्या वरिष्ठांना आवडल्या. त्यांनी तिचे कौतुक केले. आता कामाचे टेन्शन संपले होते.

समीर अधून मधून यू.एस. जात असे वर्ष कधी गेले. तिलाा समजले नाही तिचा प्रोबेशन पिरियड संपला आणि तिला कन्फर्मेशन लेटर दिले. आज तिचा आनंद मनात मावत नव्हता. पण समीरच्या मेहरबानीचे सारे फळ आहे येवढे मात्र खरे हे ती ही जाणून होती. कंपनीमधे ती समीर पासून तसे अंतर ठेऊनच होती. उगाच गैर समज नको म्हणून.

संध्याकाळी ते मात्र सोबतच येत. आणि जेवणही सोबतच होई. आता रजुचे जीवन सेटल झाले होते. आर्थिक तंगी संपली होती. स्वप्नालीचे १० वीचे वर्ष होते. आता तिने ही छान करावे असे रजुला वाटत होते. प्रथम डिप्लोमा आणि मग डिग्री कारण कॉलेज घरासमोरच होते. शिवाय प्रवासाचा प्रश्न नव्हता.

समीरच्या यू.एस.व्हिझीट होतच होत्या. तो जेव्हा येथे असे तेव्हा सोबत जेवण होई असा सगळा परिपाठ चालू होता.

या सगळ्या रुटीन मधे ३ वर्षे केव्हा गेली हे समजले नाही. स्वप्नालीचा डिप्लोमा संपला डिग्रीला ॲडमेशन घेतले. सारे काही सुरळीत चालले होते. आणि येवढयात समीरला कायम यू.एस.मध्ये पाठवावे म्हणजे तेथील सारे

कामकाज सुरळीत चालेल. प्रॉडक्शन चालू झाले होते ते युनिट प्रॉफीटमधे होते. याचा चेअरमन समीर होता. आता निदान ६ माहिन्यासाठी समीरने यू.एस.ला जावे अशी सुचना मिळाल्यावर मात्र समीर कमालीचा नाराज झाला. रजु पासुन दुर जाणे ही कल्पनाच त्याला आवडली नाही. पण करणार काय? नाईलाज होता.

तो घरी आला रात्री जेवताना त्याने रजुला ही बातमी दिली. आज कोणालाही जेवण गेले नाही. स्वप्नाली तर कमालीची नाराज झाली हा सहा महिन्याचा वियोग वाढू ही शकतो भरवसा नाही, हे समीरही समजला होता. रजु पासुन दुर जाणे त्याला खुप क्लेशकारक वाटत होते. तोही कमालीचा अस्वस्थ होता. दुसऱ्या दिवशी त्याने ऑफीसला जाण्याचे टाळले. सहाजिक रजुही गेली नाही.

आज दिवसभर रजु समीरच्या घरीच होती, स्वप्नाली कॉलेजला. तिने आज जेवण हॉटेल मधून मागविले. दोघांचाही मुड ठीक नव्हता.

''रजु ! माझी यू.एस.ला ६ महिन्यासाठी जायची इच्छाच नाही ! का जाणे ते मला कायमच तिकडे ठेवतील. माझा एकट्याचा जीव येथे तुमच्याजवळ घुटमळत राहिल. काय करावे कळत नाही.'' समीर.

त्याला अस्वस्थ पाहून रजुही सदगदीत झाली. तिलाही समीरचा वियोग नको होता. त्याला रडु कोसळेल पण रजुने त्याला सावरले आणि सोप्यावर दोघेही एकमेकांना सांभाळीत बराच वेळ बसली. किती वेळ गेला समजला नाही. पण दाराची बेल पार्सलवाल्याने वाजवल्याने तिचा नाईलाज झाला आणि ती उठली. रजुने जेवण वाढले, दोघे जेवायला बसली. येवढ्यात स्वप्नाली आली. त्या दोघांचे पडलेले चेहरे पाहून ती ही चक्रावली. तिघं डायनिंग टेबलवर बसली.

''मम्मी ! मलाही वाढ.!''

आणि रजुने तिला जेवण वाढले. त्या दोघांच्या पुढ्यात जेवण तसेच बघून ती ही चक्रावली.

''का? जेवत नाही तुम्ही?''

कोणीही काहीच बोलाली नाही. स्वप्नालीसाठी दोघांनी घास तोंडात घातला. जेऊन स्वप्नाली आपल्या घरी गेली पण, रजु अजून समीर कडेच होती.

'' बरे वाटत नाही का ?''

" नाही ! ठीक आहे ! थोडे टेन्शन आले. खरेतर तुम्हा दोघींना येथे सोडून जाणे मला रास्त वाटत नाही म्हणून !" समीर.

पुन: मागचाच प्रकार ! रजुने समीरला जवळ घेतले, त्याला समजाविले.

"हे पहा! हे केव्हातरी होणारच होते! कारण माझ्या दु:खी जीवनाची झळ तुला केव्हातरी लागणारच हे मी जाणून होते. हे पहा. आपण एक दुसऱ्यासाठीच एकत्र आलो ! एकत्र राहू ! हे मात्र विसरु नकोस!" रजु,

याचा अर्थ काय ? आम्ही दोघांनी लग्न करावे असे तर हिच्या मनात नाही ना? पण कोणी काहीच बोलले नाही. दोघेही अबोलच होती आणि एकदम–

" रजु ! आपण लग्न करुया कां? आणि तो तिच्या प्रतिक्रियेची वाट पहात होता .

" का नाही! तुझी इच्छा असेल तर अन्यथा आपण आहोत असे दोस्त म्हणून राहू !" रजु.

आणि ती दोघे एकमेकांच्या मिठीत विसावली. आता दोघांचे ही मनावरचे दडपण आता कमी झाले होते. पण प्रश्न होता तो स्वप्नालीचा, तिला काय वाटेल याचा आता ती लहान नव्हती, समंजस होती सगळे काही जाणत होती तिची काय प्रतिक्रीया असेल या संदर्भात याचा विचार ते करीत होते.

दुसऱ्या दिवशी एकदम नॉर्मल होऊन समीर रजु ऑफीसला गेले. त्यांनी ठरविले की संध्याकाळी सगळ्या प्रश्नातून मार्ग काढू. स्वप्नालीचे म्हणणे काय आहे तेही ऐकूण घेऊन व ताबडतोब रजिस्टर पद्धतीने लग्न उरकून घेऊ.

रात्रीचे जेवण रजुकडेच झाले. तिनेच स्वप्नालीकडे हा विषय मांडला, थोडा विचार करुन तिनेही आपला होकार कळविला आणि तिने समीरला मिठीच मारली. "थँक यू काका" माझ्याही मनात लहानपणापासून होते. मध्ये बराच वेळ गेला पण शेवट छान झाला !" स्वप्नाली.

जेवण झाले समीर आपल्या घरी गेला. दुसऱ्या दिवशी ऑफीसला न जाता ते मॅरेक ब्युरोमध्ये जाऊन रजिस्टर केले व डेट घेतली एक महिन्याची.

एक महिन्याचा वेळ त्यांना खुपच मोठा वर्षाचा वाटत होता, पण कायद्याचा नियम तो नियम. आता ते त्या दिवसाची वाट पहात होते. सारे काही सुरळीत चालले होते. घरचे वातावरण छान होते. पूढे जाणारा एक एक दिवस त्याना महिन्याचा वाटत होता. पण सारे काही ठीक चालले होते. हनीमुनसाठी यू.एस.ला जायचे हे ही समीरने ठरवले होते. त्यासाठीची सगळी तयारी झाली

होती. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी निघायचे हे नक्की झाले होते. स्वप्नालीची परिक्षा सुरु होती ती पुर्ण करुन तिघेही यू.एस.जायचे नक्की झाले.

पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. लग्नाच्या तारखे पुर्वी आठवडाभर अगोदर रजुच्या पोटात थोडे थोडे दुखत होते. आणि दुसऱ्या दिवशी अधिकच दुखू लागले. काय झाले आहे हे समीरलाही समजेना. लग्नाचे ठरल्यापासून रजु समीरच्याच घरात रहात होती आणि स्वप्नालीही. सकाळी ५ वाजता दुखण्याने अधीकच जोर पकडला आणि समीरने तिला अहमदाबादच्या हॉस्पीटलमध्ये नेऊन ॲडमीट केले. सगळ्या टेस्ट दोन तासात झाल्या आणि तिच्या पोटात कॅन्सर झाला आहे असे निदान डॉ. नी केले. शिवाय आता तातडीने ऑपरेशम करावे लागणार होते. अडचण होती ती निगेटीव्ह बल्डची. पण जेव्हा चेक केले. समीर आणि स्वप्नाली यांचे ही ब्लड निगेटीव्ह निघाले. त्यांनी समीरचे ब्लड घेलते पण स्वप्नालीचे नाही कारण तीचे वय १८ च्या आत होते. त्यांच्या कंपनीमधून बरेच लोक आले आणि ५ बॉटल लागणाऱ्या रक्ताची पुर्तता झाली. डॉ. वर्मा या निष्णात डॉक्टरांनी ऑपरेशन केले. तेव्हा समजले पोटाच्या सगळ्या भागात कॅन्सर पसरला आहे ही लास्ट स्टेक आहे. समीरवर आभाळ कोसळले होते. त्यात स्वप्नालीची अवस्था खूपच वाईट झाली. तिने मनाला लावून घेतले. तिला चक्कर आली समीरने तिला सावरले.

रजुच्या या आजाराने समीरचा हिरमोड झाला. सगळी स्वप्ने चक्काचुर झाली. नियती आपल्याशी असा कां खेळ खेळतेय असा राहून राहून त्याला प्रश्न पडत होता. सुरवातीला गरीबीने त्रस्त. नशीब स्कॉलरशिपवर शिक्षण झाले. रजुचे प्रेम मिळाले. पण तेही नियतीने लुटले. त्यानंतरचा ६/७ वर्षाचा काळ त्याचा एकाकी पणात गेला. रजु सापडली हा ही नियतीचाच खेळ. गेली दोन अडीच वर्षे आनंदात गेली. लग्नाचा मांडव घातला आणि आता कोसळू लागला होता. लग्नाची तारीख जवळ येत होती आणि डॉ.नी तिच्या ऑपरेशनचा घाट घातला. अर्थात तो जरुर होता. रजु प्रचंड वेदनानी त्रस्त होती. ऑपरेशन शिवाय पर्याय नव्हता. आणि ऑपरेशन झाल्यावर समजले सगळ्या पोटाच्या भागात कॅन्सर पसरला आहे. म्हणजे आता रिकवरीला वेळ लागणार. पण वेदना थांबल्या होत्या. सारे काही ठीक होते. समीर दिवस रात्र हॉस्पीटल मधेच होता. स्वप्नालीला त्याने घरी पाठविले. २ दिवसात परिक्षा होती. अभ्यास व्हायला हवा होता. तिचे आता सहावे सेमीस्टर चालू होते. पण तिचे तरी लक्ष अभ्यासात

कसे लागणार ? तिचे सारे लक्ष आईकडेच घोटाळत होते.

समीरने आपली टूर पुढे ढकलली. खरेतर टूर आणि हनीमुन रजु बरोबर साजरा करावा असा त्याचा विचार होता. पण सारे अघटीत झाले होते.

पण एकाएकी चमत्कारच झाला म्हणायचा रजुची तब्बेत झपाट्याने सुधारत होती. तिचे ऑपरेशनचे टाके ओले होते पण धास्ती नव्हती. लग्नाच्या रजिस्टरची तारीख जवळ येत होती आणि रजुच्या मनाने वेगळाच खेळ खेळायला सुरवात केली होती. काहीही करुन हे लग्न व्हायला हवे. ठरल्या तारखेला रजिस्टर व्हावे, ती तारीख पुढे जाऊ नये असे तिला वाटत होते. पण समीरला घाई नव्हती. रजु या आजारातून बरी व्हावी मगच लग्नाचा विचार करावा असे त्याच्या मनाने पक्के केले होते. मॅरेज रजिस्टर ऑफीसमध्ये जाऊन दुसरी तारीख उद्या जाऊन घ्यावी असे त्याने नक्की केले होते .

पण रजुने समीरला जवळ बोलावले, ''माझी इच्छा आहे ठरलेल्या तारखेलाच लग्न व्हावे, हवे तर रजिस्ट्रारला हॉस्पिटल ला बोलव. मला डिस्चार्ज मिळाला तर आपण सगळेच जाऊ अन्यथा या हॉस्पीटल मधेच विवाह सोहळा ऊरकुन घेऊ.'' रजु.

समीर दिग्मुड झाला. तिच्या या सांगण्याने क्षणभर तो गडबडलाच काय बोलावे समजेना. हा काय वेडाच्चार तिचा ? आशावादी असावे माणसाने, पण आताताई असू नये. क्षणभर आपण काय करावे याच विचारात तो हरवून गेला. हॉस्पीटल मध्ये लग्न. हा चक्क वेडाचार होता. पण आता जरी ''मी बरी होत आहे तरी कॅन्सरमुळे भरोसा नाही. पून: योग येईल न येईल. नियती आमच्या जीवाशी खेळते आहे. मरण येणार असेल तर यावेच... हि तिची इच्छा होती, बरी होऊन संसाराची घडी मनासारखी बसवावी अशी तीची इच्छा होती, पण ज्या पद्धतीने हा ऊन-पावसाचा खेळ सुरु होता तो तिला चैन पडू देत नव्हता.

रजुच्या या हट्टाने आपण काय करावे, या द्विधा मनस्थितीत समीर होता. 'टु बी ऑर नॉट टु बी' अशा दोलायमान कात्रीत तो अडकला होता. त्याचे विचार चक्र काम करेना से झाले. स्वप्नालीची परिक्षा आजच संपली होती आणि दुपारनंतर ती हॉस्पीटलमध्येच होती. त्याने स्वप्नालीला रजुच्या तब्येतीची पुर्ण कल्पना दिली. आणि तो ऑफीसला आला.

प्रथम तो चेअरमनला भेटला. सगळी कथा त्यांना सांगितली 'या ऊन पावसाची' तेही सदगदीत झाले थोडा वेळ कोणीच बोलले नाही.

''तुम्ही असे करा ! रजिस्ट्रार ऑफीसर माझ्या ओळखीचे आहेत, ठरलेल्या तारखेला आणि ठरल्या वेळी या लग्नासाठी त्यांना तयार करा. तसा माझा निरोप त्यांना द्या. मी हॉस्पीटलच्या ट्रस्टींना सांगतो. मी ही त्या हॉस्पीटलचा ट्रस्टी आहे. हे लग्न ठरल्यावेळीच हॉस्पीटलच्या रुम मध्येच संपन्न व्हावे असे त्यानी सांगीतले.

सारे काही छान जुळून आले होते. हॉस्पीटलचा तिचा रुम सजवण्यात आला होता. डॉ.कोठारीना अश्रू आवरेनात. हे सारे अघटीत घडत आहे. हा नक्की नियतीचा खेळच आहे. एक महीनाही ती पेशंट काढील की नाही याची खात्री डॉ. कोठारीना नव्हती. पण समीरच्या समाधानासाठी आशेची पेरणी ते करीत होते.

आता रजुला पेन होत नव्हते असे नाही पण कमी. हॉस्पीटल मधल्या नर्सेसनी तिला तयार केले. साडी नेसवली. नवरी तयार झाली. समीर ही घरी जाऊन तयार होऊन आला स्वप्नालीही. ती तर अधिकच भावुक झाली होती. समीर माझ्यावर मुलीसारखे प्रेम करणारे माझे बाबा होणार ही कल्पनाच तिला भावली होती आपल्या जीवनातील वडीलांची पोकळी समीरनेच भरुन काढली होती. आपल्या मुलीसारखी तो तिची काळजी घेत होता नव्हे ती आपलीच मुलगी आहे. हे त्याने मनोमन ठरविले होतेच.

आणि ठरल्यावेळी रजिस्टार आले विटनेस म्हणून साराभाई आणि डॉ.कोठारी यांनी सह्या केल्या. हार घालण्याचे सोपस्कर पूर्ण झाले. आणि समीरने रजुचे चुंबन घेलते. आणि आम्ही एक झालो आहोत हे उपस्थितांना दाखवून दिले. आज रजु खूप आनंदात होती. माझ्या इच्छेनुसार समीरशी लग्न झाले आता पुढे काहीही होवो. तिच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता. त्याच दिवशी रजिस्ट्रार ऑफीसरने लग्न रजिस्ट्रर झाल्याचे सर्टिफिकेट आणून दिले. रजुने ते हृदयाशी कवटाळले. आपण नियतीला हरवले आहे. असे तिला वाटले. आता पुढे काहीही होऊ.

संध्याकाळी समीर आणि स्वप्नाली तिच्या जवळ बसून होते. डॉ.कोठारीनी तिची संपूर्ण तपासणी केली. त्याना आशादाई अशी एकही साईन वाटत नव्हती आणि रजु मला डीस्चार्ज द्या असे वारंवार सांगत होती! पण डॉ.कोठारी तयार नव्हते ते म्हणाले, ''मि.समीर अजून आठवडाभर तरी तिने येथे रहावे असे मला वाटते, तुम्ही मॅडमना समजवा, असे ते समीरना सांगत होते. पण रजु ऐकायला

तयार नव्हती ''तुम्ही मला माझ्या घरी जाऊ द्या, मागे माझे काहीही होऊ दे !''

शेवटी तिचा हट्ट म्हणून अगेंस्ट मेडीकल ॲडवाईस समीरने डिस्चार्ज घेतला आणि ते घरी आले. समीरने तिची व्यवस्था त्याच्या घरात खालच्या रुममध्ये केली आणि त्याच हॉस्पीटलची नर्स २४ तास तिच्या सुश्रृतेसाठी ठेवली. आज रजुची प्रकृती स्थिर होती. ती खुप वेळ समीरशी बोलत होती. स्वप्नालीही सोबत होती. का कोण जाणे, पण आता तिचे चित्त काही स्वीकारणार नव्हते. तिला काहीतरी समीरला सांगायचे होते. पण मन दोलायमान होते. त्या रात्री तिची प्रकृती थोडी अस्वस्थ झाली. समीर स्वप्नाली सोबत होतीच. आणि रजु उठली, तिने समीर आणि स्वप्नालीला पलंगावर बसायला सांगितले. तिने दोघांचे हात हातात घेतले आपण काय बोलावे हे रजुला समजेना.... मग एकदम तिने डोळे बंद केले. त्या दोघांचे हात तिच्या हातातच होते....

''समीर ! मी स्वप्नालीला माझी अनामत हवे तर 'म्हण' म्हणून सोपवित आहे, मी असेन नसेन तिचे वडील म्हणून तिचा सांभाळ कर ?'' रजु.

''आता ती तूझी मुलगी आहे! माझे सारे काही तुझेच आहे, मीही ! मला पुढे सगळा अंधार दिसतो आहे.! माझी तुझ्याशी लग्न करण्याची इच्छा पुर्ण झाली !'' रजु. आणि तिने मान टाकली.

आता सगळा 'उन पावसाचा खेळ' संपला होता. समीर स्वप्नाली दु:खात बुडाली. एक आयुष्याचे पर्व संपले होते.!

पुढे १५ दिवस समीर ऑफीसकडे फिरकलाच नाही; साराभाई दोन वेळा येऊन गेले. पण काहीच बोलले नाहीत. समीर दु:खात आहे हे ते जाणत होते. कोणी कोणासाठी थांबत नाही हे त्यानी समीरला सांगीतले आणि एक दिवस सकाळी येऊन समीरला घेऊन ऑफीसला गेले.

''समीर ! या नव्या कंपनीचे रोपटे तुम्ही लावले आहे तो वाढवणे तुमचे कर्तव्य बनते. माझी सत्तरी पार झाली आहे त्यासह या कंपनीचा डोलारा मी तुमच्या खांद्यावर ठेवित आहे. भारतातला आणि परदेशातला कारभार तुम्ही पहा, यशस्वी व्हा येवढेच मी सांगतो ? तुम्हाला या अवस्थेतून बाहेर यायचे आहे. जग कोणासाठी थांबत नाही. आठवडाभरात तुम्हाला यू.एस.ला जायचे आहे. सोबत स्वप्नालीला घेऊन जा!'' साराभाई.

समीरने मनाची तयारी केली, त्यानंतरचे ४ दिवस तो सतत ऑफीसला जात होता. सगळी तयारी झाली. स्वप्नालीचा पासपोर्ट रजिस्टर करुन घेतला. आता

ती १८ वर्षाची झाली होती.

यू.एस.ला निघताना रजुच्या सगळ्या आठवणी घेऊन यू.एस.ला प्रयाण केले. स्वप्नाली ही तिची अनामत सोबत घेऊन एक बाप म्हणून, अगदी जड अंतःकरणाने !

०—०—०

# तोडगा

उदय बाल वयातच पोरका झाला; जेव्हा त्याला काही समजतही नव्हते 'एका बसच्या' अपघातात आई-बाबा दोघेही गेली; आणि त्याला आधार दिला तो त्याच्या काका-काकूंनी. त्याचे काका पोलीस मधे होते. सतत बदली, नवा बसेरा, नवी शाळा, नवे गांव, नवे मित्र पण तो मुंबईला शिक्षणासाठी आला आणि एकटा पडला. हुशार होता तो व्ही.जे.टी.आय.मध्ये त्याने बी.ई. ला प्रवेश घेतला. त्याचा सगळा खर्च काका करीत. स्कॉलरशिपमुळे त्यांचा भार उदयने कमी केला. शिवाय ज्या इमारतीत त्याने आणि आणखी तीन विद्यार्थ्यांनी खोली भाड्याने घेतली होती. तेथे त्याला खूप शिकवण्यास मिळाल्या आणि शेवटच्या वर्षाची फी आणि हॉस्टेलची फी त्याने स्वतः भरली. त्याच वर्षी तो बी.ई. झाला. आणि नोकरीच्या शोधात लागला. त्याच्या बरोबरचे विद्यार्थी आपआपल्या घरी परतले आणि उदय आता एकटाच होता. रहायला दुसरा आधार नव्हता म्हणून तिच खोली त्याने मुदत वाढवून घेतली. शिकवण्या चालूच होत्या. आर्थिक चणचण फारशी नव्हती. पण ६ महिने झाले तरी नोकरीचा पत्ता नव्हता. अर्ज पाठवी, मुलाखती होत पण हवी तशी नोकरी मिळत नव्हती. शेवटी टी.सी.एस.मध्ये त्याला ज्यूनिअर मॅनेजर म्हणून नोकरी मिळाली.

तो एकटा असताना काका-काकू त्याच्याकडे मुंबईला येत. आई वडिलांची उब त्यानी उदयला दिली. येवढ्या कठीण परीस्थितीतही त्याला वडिलांच्या प्रेमाची कमी जाणवली नाही. पण कोरोना आला आणि त्या महामारीत काका-काकू एका पाठोपाठ गेले. दुखाःचा डोंगर कोसळला उदय वर. आता तो पोरका झाला होता. त्यांच्याशिवाय त्याचे कोणीही नातेवाईक नव्हते. आता त्याला खूपच एकाकी वाटत होते. रात्र रात्र काका-काकूची आठवण त्याला येई, भडभडून येई, त्याने आईवडिलांना पाहिले नव्हते, शिवाय चांगले समजेपर्यंत हे आपले काका-काकी आहेत हे ही त्याला माहीती नव्हते. तो त्यांना आई बाबाच म्हणायचा. आई वडिलांची सगळी कसर त्यांच्या सहवासात उदयला लहानपणात भरून निघाली. आता त्याला प्रचंड पोकळी, त्याला त्याच्या आयुष्यात जाणवू लागली होती. त्यामुळे तो अस्वस्थ होई. दिवसभर घरीच ऑनलाईन काम चाले. पण जेव्हा जेव्हा तो मोकळा असे घर

खायला उठे त्याला. यात सहा-आठ महिने निघून गेले. उदयने काका काकुचे दिवस नाशिकला जाऊन केले. खूप दान धर्म केला त्यांच्या नावाने. त्यांनी स्वत:ला मुल होऊ दिले नाही कां? तर उदयची हेळसांड होऊ नये म्हणून. हे त्याला आता समजून चूकले होते.

तोवर तो पुढच्या वर्ष भरात तो सावरला आणि  तोवर तो त्याच भाड्याच्या घरात रहात होता. खूप स्वप्ने उदयने त्याच्या मनात रंगवली होती. आता वयाची २६ वर्ष पूर्ण झाली. आता आपले स्वत:चे घर असावे ? निदान २ आर.के.चे असे त्याला वाटू लागले. १ आर.के.मध्ये प्रायव्हसी नव्हती. पण मना जोगते घर सापडत नव्हते. मोठ्या बिल्डरकडे त्याने याबाबत चाचपणी केली. पण बजेट काही जमेना आणि नाईलाजाने त्याने १ रुम किचनची छोटीशी चांगल्या सोसायटीत जागा विकत घेतली. तसा त्याचा पगार होता ६०,०००/- तेव्हा लोनही मिळाले आणि बोरीवलीतील सिद्धार्थ नगर मध्ये त्याने घर घेतले. कोरोना काही सरला नव्हता एका मागून एक लाटा येत होत्या. उसंत जराही नव्हती. सगळीकडे भितीचे वातावरण होते. त्यात बाहेर जाता येत नव्हते. त्याने पोळी-भाजी सेंटर मधून पार्सल आणून खायची व्यवस्था केली होती. ते त्यांच्या सोसायटीतच होते तेव्हा घरपोच डिलीव्हरी होई. पण त्याला आता त्या एकाकीपणाचा कंटाळा आला होता. आपण तरूण आहोत. चांगली कायम नोकरी आहे. आपण लग्नाचा विचार कां करू नये ? असा विचार त्याच्या मनाला चाटून गेला. हळू हळू या विचाराने उदयला घेरले. या मुंबईत त्याचे कोणीही नातेवाईक नव्हते. आपल्यासाठी कोण मदतीचा हात देणार ? बरे हे त्याचे स्थळ चांगले होते. 'गोरा गोमटा, सुदृढ प्रकृतीचा, शिकलेला इंजिनियर मुलगा कोणालाही आवडेल असा होता उदय.

त्याने आपल्या ऑफीस मधल्या सहकाऱ्यांना याबाबत सांगीतले. त्याचा स्वभाव सगळ्यांना माहित होता. असा पापभिरू मुलगा ज्या मुलीच्या नशिबी येईल तिचे कल्याणच होईल. असे सागळ्यांना वाटले. पूर्वी त्याने अनेक सॉफ्टवेअर कंपनीत मुलाखती दिल्या होत्या.  आपला बायो-डेटा दिला होता. एक दिवस संध्याकाळी त्याला 'निलम' या मुलीचा कंपनी मधून फोन आला. तिने तिची ओळख सांगीतली. कि 'मी जेव्हा या कंपनीत मुलाखतीला आले तेव्हा आपणही आला होता. माझी निवड झाली आणि मी तेथे कॉम्प्यूटर ऑपरेटर म्हणून नोकरी करीत आहे. खूप वेळ बोलली ती. उदयला ही तिचे

सालस बोलणे आवडले.

''हॅलो ! आपले लग्न झाले का ?'' निलम

''नाही !'' उदय

''माझे हि नाही !'' मी योग्य मुलाच्या शोधात आहे, आपण भेटू शकतो कां ? जमल्यास उद्याच्या रविवारी !'' निलम

तिने व्हॉटस–अप व्हिडीओ कॉल केला होता, त्यात तिला त्याने पाहिले, छान होती ती, निटनेटकी, कुरळे केस, भेदक नजर, शरीराच्या हालचाली सुरेख, हसरा चेहरा. उदयला आश्चर्य वाटले आणि ती रात्र त्याने स्वप्न रंजनात घालवली. असे काही घडले याची जराही कल्पना उदयला नव्हती. तो दिवस शनिवार होता. आणि निलमने उदया म्हणजे रविवारी भेटूया का? म्हणून विच्यारले. हा भोळा सांब उत्साहाच्या भरात हो म्हणाला. त्यावर त्याचा स्वतःचाच विश्वास बसत नव्हता. तरूणपण वहावत कसे जाते याची अनुभूती उदयाला आली. ''काय हरकत आहे तिला भेटायला ! जमले तर ठीक नाही पाहू दुसरी. पण आज सुरुवात छान झाली होती. पाहुया !'' म्हणून स्वप्नांची रांगोळी काढीत उदय झोपला.

सकाळी लवकर उठला. भेटीची वेळ सकाळी १०.३० ची ठरली होती. दादरला 'नवरंग' हॉटेल मध्ये. उदय ने आपली सगळी कामे आटोपली आणि ओलाने दादरला आला. नवरंग हॉटेलात तो १० मिनिटे अगोदरच पोहचला होता. तेथे एका एका टेबलावर ३–४ माणसे बसली होती. त्यात मुलगी, मुलगा व त्यांचे नातेवाईक म्हणजे आई वडील. म्हणजे येथे लग्नाळू लोक येऊन लग्ने जमवतात तर. हे चटकन त्याच्या ध्यानात आले. त्याने कॉफी मागवली व तोच टेबल बुक केला आणि निलमची वाट पहात बसला.

त्याची कॉफी संपली आणि ती येताना दिसली. उदय हरपला. तिने हात जोडले, तिच्या सोबत कोणीतरी तरूण स्त्री होती, पण सोबत आई वा वडील नव्हते. उदयने स्वतःला सावरले. आणि तिने पुनः प्रसन्नता चेहऱ्यावर आणीत स्मित हास्य केले. ती ही हसली. ती म्हणजे निलम.

त्या स्थानापन्न झाल्या. उदयने विच्यारले

''काय घेणार आपण ?'' उदय

''कॉफी ! बस ! अजून काही नको !'' अंजू

''हि माझी मोठी बहिण अंजू!''

“ओके ओके !”

उदयने सगळी सुत्रे आपल्या हातात घेतली, वेटरला ऑर्डर दिली. आणि ..

“बोला !” उदय

“काय बोलणार ? आम्हाला आपले स्थळ पसंत आहे !” अंजू

त्यावेळी निलम गप्पच होती. उदयला प्रश्न पडला ... ती कां बोलत नाही.

“हो ! आम्हाला आपले स्थळ पसंत आहे!” निलम

“अहो! पण मला तुमच्या आवडी-निवडी, जाणून घ्यायच्या आहेत, काही छंद, खेळ, वाचन इ.”! उदय

“ते सगळे आहेच हो! पण आम्हालाही तुमच्या बद्दल काही गोष्टी जाणून घ्यायच्या आहेत ? अंजू

उदयला प्रश्न पडला निलम काहीच बोलत नाही. तिची बहीणच तिचा रीमोट कंट्रोल आहे की काय? तसे असेल तर हे स्थळ नाकारायला हवे! अशी गप्प रहाणारी माणसे बेरकी असतात. आतल्या गाठीची असतात. यांचे अंतरंग नाही ध्यानात येत चटकन. यांच्या अबोलपणात बरेच काही लपलेले असते. उदयचे लक्ष फक्त निलमकडेच होते. पण आता त्याने अंजूला निरखून पाहिले, ती आणि निलम दिसायला छान होत्या. तिचे लग्न झाले असेल कां? असा विचार त्याला चाटून गेला. आणि तिच्या बद्दल जाणून घेण्याची उदयची इच्छा झाली, कारण उद्या माझ्या बायकोची बहीण ही असणार, लग्नानंतर.

“अंजूताई !” उदय.

“ना! ना! नुसते अंजू म्हणा, चालेल !” अंजू

“नाही तसे नाही ! नाही तरी तुम्ही निलमच्या जेष्ठ भगिनी आहात. तेव्हा मी म्हटले !” उदय

“बोला !” अंजू

“तुमचे लग्न झाले आहे कां? ” उदय

“हो !” अंजू

“पण गळ्यात मंगळसुत्र दिसत नाही, काही सौभाग्य वाण दिसत नाहीत. म्हणून विचारले!” उदय

“त्याची काय गरज! ’ अंजू.

“ती कशी ! आपण मराठ मोळी माणसे. लग्नानंतर मंगळसुत्र, हिरव्या बांगड्या घालतो ना म्हणून विचारले ! ” उदय.

''मला नाही आवडत !'' अंजू

तिचे हे उत्तर ऐकुन उदय जरा साशंक झाला. म्हणजे यांच्यावर काय संस्कार झाले असावेत. हिच्या नवऱ्याला हे आवडत असेल कां? मला बाबा नाही आवडणार. आपली बायको सालंकृत असावी अशी माझी धारणा आहे. येवढ्यात ....

''तुम्ही कोठे रहाता ! केवढा मोठा प्लॅट आहे तुमचा ! घरी कोण कोण असते ! आई वडील कोठे असतात.! तुमचा पगार सांगा !'' अंजु. हे ऐकल्यावर उदय थोडा बावरला ,

''सांगतो ! पण प्रथम तुम्ही सांगा आपण कोठे रहात. घरी कोण कोण असते, कारण तुमचे आई वडील आले नाहीत ते !'' उदय

''त्याची काय गरज!'' अंजू

''कां ?''

''तुम्ही असे करा तुमचा बायो-डाटा द्या ! मी उद्या माझा व्हॉटस-अपवर पाठविण !'' उदय

उदयची निरवा निरवीची भाषा ऐकून दोघीही बावरल्याच.

''अहो ! तसे नाही !'' निलम

निलमने प्रथमच तोंड उघडले होते. नाहीतर आल्यापासून तिची बहीणच निलमची वकीली करीत होती. त्यावरून ती बेरकी आहे ! मनात एक, मुखात दूसरेच ! असा संशय उदयच्या मनात येऊन गेला, थोडावेळ कोण काहीच बोलले नाही.

''आपण निघूया !'' उदय

''अहो येवढी घाई कां ?'' निलम

''माझ्या ताईचे मनावर घेऊ नका !'' निलम. आपण सगळ्या शंकांचे निरसन करू या ! निलम

उदयला खरे तर निघायचे होते.

''तुमची जन्म पत्रिका आणली आहे कां ?'' उदय

''नाही ! त्याची काय गरज !'' अंजू

''हवी ! मी बघितल्याशिवाय पुढे जाणार नाही! उदय

''अहो पण आमच्याकडे नाही ! मग काय करणार ?'' अंजू.

''मी आणि ताई आईकडे रहातो, ती एकटीच असते. गिरगावातल्या

चाळीत ! आमचे वडील गेल्याला १० वर्षे झाली. त्यानंतर ताईचे लग्न झाले. तिला एक मुलगी आहे ! तिचा डायवर्स पेटीशन अजून पेंडींग आहे. ती नोकरी करीत नाही !'' निलम.

एका झटक्यात अंजूची पत्रिका व घरचा बायो-डेटा तिने समोर ठेवला.

''आपण आता निघुया !'' निलम

''पुन्हा कधी भेटायचे '' ? निलम

''कशाला ! उदय.

''कां भेटू नये का ? आपली ओळख होईल, स्वभाव कळेल. येऊ आम्ही तुमच्या घरी, कारण ज्याच्याशी लग्न करायचे, त्याचे घर पहायला नको कां ?'' निलम

म्हणजे यांनी माझे लग्न ठरवले तर असे उदयला वाटले. हि पहिलीच वेळ होती उदयची. कोणा मुलीबरोबर बोलायची. खरेतर यांना आपण टाळायला हवे. असे वाटून त्याने वेटरला बोलावले. बिलाचे पैसे दिले.

''निघू या !'' उदय

''मग पुनः मी कधी भेटू !'' निलम

''मी कळवीन !'' उदय

बसल्या बसल्या उदयने ओला बुक केली व हॉटेलमधून बाहेर पडताच ती पकडून तो निघून गेला. मागे न पहात.

दादर ते बोरीवली हा पाऊण तासाचा प्रवास ट्रॅफीक असेल तर १०.२० मिनीटे अधिक. तो विसावला. गेल्या गेल्या १ तास त्याच्या डोक्याला खूप खार मिळाला होता... त्यात त्याचा डोळा कधी लागला कळलेच नाही पण टॅक्सी चालू होती. आपल्या इच्छीत स्थळी पोहोचायला. अंधेरी सोडल्यावर त्याला जाग आली. हॉटेलमधे पोहचल्यापासून बाहेर पडे पर्यंतच्या. निलम शेवटी बोलली, पण अंजूच्या बोलण्याचा विचार तो करीत होता. हे प्रकरण जरा विचित्र आहे हे त्याला तेव्हाच समजले होते. पुनः यांची भेट नकोच असेहि मनोमन त्याने ठरवले व येताना एक नवा मोबाईल आणि सिमकार्ड घेऊनच तो घरी परतला. पण थोडावेळ घराजवळ थांबून त्याने पोळी-भाजी घेऊन घर गाठले. तसा जेवणात त्याला रस वाटत नव्हता. मन सुन्न झाले होते . हे लग्न प्रकरण किती अवघड आहे, त्यात घरचे कोणीच नाही. याची कमी त्याला वाटत होती. वडीलधारी माणसे अशावेळी खूप उपयोगी पडतात. त्यांच्या

अनुभवाच्या शिदोरीमुळे.

त्या रात्री त्याला जराही झोप लागली नाही. निलमचा पत्ता तिने दिला नव्हता आणि सध्यातरी त्याची गरज नव्हती. बायो-डेटा येईल तेव्हा सगळे समजेल अशी त्याने आपली समजूत करून घेतली. आणि आपले एकट्याचे जीवन सुरू केले.

दोन दिवसानी पुनः तिचा फोन आला. आपण भेटूया कां? उदयला वाटले काय हरकत आहे भेटून घेऊ. आपण थोडेच तिचे प्रपोझल स्वीकारले आहे ? आणि दुसऱ्या दिवशी त्यांची भेट झाली. दादरलाच.

प्रथम उदयने फारसे स्वारस्य दाखवले नाही. पण नीलम एकटीच आली होती. तीची बहिण सोबत नव्हती. खरेतर उदयला ती आवडली होती, पण पहिल्या भेटीच्या वेळच्या संभाषणातून त्या प्रकरणाला अनेक फाटे फुटले आणि मनोमन त्याने या प्रकरणातून बाहेर पडूया असे ठरवले होते. पण निदान तिला एकटीला भेटायला काय हरकत आहे. असेही त्याचे मन सांगत होते.

निलम नियोजीत स्थळी अगोदरच पोहोचली होती. तो बुधवार होता. उदय आपल्या ऑफीसमधून काम अधिक असल्याने उशीरा निघाला व अर्धा तास उशीरा पोहोचला.

''सॉरी! मला कामाचा लोड जास्त असल्याने वेळेवर पोहोचता आहे नाही. त्यात ट्राफीक ! उदय.

'' ओके, इटस ऑल राइट! तुम्ही माझ्या प्रपोझल बद्दल काय ठरवले आहे?'' निलम.

''नाही! अजून कोणत्याही निर्णयाला मी आलो नाही ! थोडा वेळ मिळाल्यास बरे होईल. मी कळवीन, शिवाय तुम्ही तुमचा बायो-डेटा, पत्रिका पाठवा, मग मी आठवडाभरात कळवतो. त्यावेळी माझा होकार असेल तर आपण हे मॅटर पुढे घेऊन जाऊ ! उदय.

''तुम्ही तुमचा बायो-डेटा मला पाठवा. पण प्रथम मला तुमचे घर पहायचे आहे ! केवढे मोठे आहे.'' निलम

''छोटेच आहे ! पण मला तो महाल वाटतो. कारण माझ्या सगळ्या गरजा त्यात पूर्ण होतात. शिवाय, मोक्याची जागा, जवळ स्टेशन, हायवे जवळ आहे म्हणून ! '' उदय.

''पण तुम्ही तुमच्या बायो-डेटामध्ये पत्ता कळवा !'' निलम

''ओके ! तुम्हीही !'' उदय.

मग कॉफी घेऊन ती दोघे निघून गेली दोन दिशेला. पुन: कधी भेटायचे हे न ठरवता.

आठवडाभरात त्यांचा बायो-डेटा काही आला नाही. पण ना खुशीने कां होईना उदय ने आपला बायो-डेटा पाठवला पत्रिकेसह.

पुन: १५ दिवस मध्ये गेले. तेव्हा तिच्या बहिणीने फोन केला कि निलमची पत्रिका नाही. उदय काहीच बोलला नाही. त्यावर त्याने फोन ठेऊन दिला, कारण, ती पत्रिका असावी कारण त्यांना ती द्यायची नसेल. काहीतरी लोचा असणार, म्हणून. पण त्या बद्दलचा विचार उदयने झटकून टाकला.

नुकताच पौष महिना सुरू झाला होता. म्हणजे या महिन्यात काही बोलणी होणार नाहीत असेच ग्रहीत धरून उदय चालला होता. पण एका सकाळी, तो रविवार होता. अंजू निलमला घेऊन आली.

''तुम्ही काय ठरवले आहे ? '' अंजू.

''काही नाही. या महिन्यात काहीही हालचाली, विचार -विनिमय करायचा नाही. असे माझी काकी सांगायची तेव्हा त्या गोष्टीला फूलस्टॉप !'' उदय.

थोडावेळ कोणी काहीच बोलले नाही.

''हे तुमचे घर फारच लहान आहे हो.'' अंजू

''पण माझ्यासाठी योग्य आहे. इन मीन दोन माणसांना हे पुरेशे आहे !'' उदय.

''आणि आम्ही आलो तर?'' अंजू.

''तुम्ही हॉलमधे. झोपायचे !'' उदय

''का म्हणून ?''

हा तिचा गळे पडू पणा उदयला जराही आवडला नाही.

''ठीक! तुम्ही निघा मला बाहेर जायचे आहे ! तुम्ही फोन न करता आलात!'' उदय.

आणि त्या दोघी निघून गेल्या. उदय तयार होऊन त्यांच्या पाठोपाठ खाली उतरला आणि आपली स्कूटर घेऊन निघून गेला. त्याचे सगळे ऑफीसमधले सहकारी आज भेटणार होते अंधेरीला. तो थोडा उशीरा पोहचला खरा. पण मी थोडा उशीरा येतो असे त्याने मित्रांना कळविले होते.

ओशीवऱ्याच्या सी-इल हॉटेलमध्ये आज त्यांना धमाल करायची होती.

थोडी बिअर पिऊन. त्यांनी आज खेकड्याचा रस्सा प्यायचा असा बेत केला होता.

''काय उदय ! कोणी भेटायला आले होते काय? सकाळी सकाळी !'' मित्र शाम.

''हो ! साला ! त्यांनी खूप वेळ खाल्ला, माझा भेजा आज, त्यात हा महिना पौष हे त्यांना पटेनाच ! बस बसले घोडे दामटवित. त्यात बुजूर्ग कोणी नाही. त्या दोघीच पुढे पुढे करीत होत्या. मला ते पटले नाही म्हणून अक्षरशः मी त्यांना हाकलल्या ! अरे माझे घर लहान की मोठे ? यातच त्या गुंतल्या. साला ! सुटका करून घेता घेता दम छाक झाली. त्यांचे  बोलणे मला नाही आवडले ! उदय.

''मग सोडून दे हा नाद ! '' शाम

''नाही रे ! पोरगी बरी आहे. एका एकी नाही तोडता येत. पण भविष्य काळ काही चांगला वाटत नाही. येवढे माझे अंतरमन सांगते आहे. तरी मी का स्वतःला रोखू शकत नाही. काही ध्यानात येत नाही रे !'' उदय.

त्यानंतर जेवण झाले आणि ते पांगले.

पौष महिना संपला आणि एका रविवारी उदयच्या घरी निलम, अंजू, आई व अंजुची मुलगी आले. दरवाज्यावरची बेल वाजली. त्यावेळी उदय आपले कपडे धुत होता... आणि दरवाज्या उघडण्यासाठी हात पुसीत चड्डी बनियान वर आला. त्या हसल्या, पण उदय सगळे काम आटोपून १५ मिनिटांनी बाहेर आला. खरेतर आजही न सांगता त्या आल्या होत्या. उदयला नटसम्राट नाटकाला जायचे होते. ११ चा शो होता. पार्ल्याच्या रंगायतनमध्ये. पण आता या आल्यावर प्रश्न पडला फसलो आपण ......

''तुम्ही काय घेणार ?'' उदय.

त्याने मॅंगोलाची ४ ग्लास आणून टी-पॉयवर ठेवली.

''बोला ! '' उदय

''आम्ही म्हणतो की लग्न नोंदण पद्धतीने करावे ! म्हणजे खर्च नाही. तुम्ही त्यांचे दागिने करुन निलमवर घाला !'' अंजू.

पुनः अंजूची तबकडी वाजली आणि उदयची सटकलीच, पण त्याने स्वतःला सावरले.

''सध्या कोरोना आहे ! शक्यतो गर्दी टाळावी, आणि लवकर लग्न उरकून घ्यावे असे मला वाटते !'' निलम.

"इतकी का घाई ?" उदय

"निलमला घाई आहे म्हणून "! आई, आणि निलमही लाजली.

"सध्या इअर इन्डींग आहे ! मला रजा घेता येणार नाही ! एक दिवसही "! उदय

"पण आपण रजिस्ट्रारकडे नोंदणी तरी करु या ... महिनाभराची डेट देतील तेव्हा त्या कामाला कां लागू नये ? अंजू.

"ठीक आहे मी कळवतो !" उदय

हा गळे पडूपणा उदयला जराही पसंत पडला नाही. लग्न हा जीवनाचा महत्वाचा टप्पा, विचार करून ठरवायला हवा. उदयला जराही घाई नव्हती. पण समोरची पार्टी जोर करतेय तर पाहू. असे उदयने ठरवले.

तेवढ्यात त्या तिघांनी सगळे घर नजरे खालून घातले.

"अहो ! हे ब्रम्हचाऱ्याचे घर आहे. त्यात काय पहायचे ?" उदय.

"अस्सचं ! अहो आमची मुलगी या घरात येणार तिच्या सुख सोईसाठी ते बघणे जरूर आहे. फारच लहान आहे हे. एक पाहुणा आला तरी गर्दी होईल !" आई.

"मग काय करावे।" उदय

"मोठी जागा लवकरात लवकर बघा!" अंजू

"अहो ते मला शक्य नाही हवे तर हे लग्न होणे नाही असे समजा !" उदय.

अहो! आम्हाला तसे म्हणायचे नव्हते !"अंजू

"ठीक आहे आपण या ! मी कळवतो तुम्हाला.

या बायकांच्या विचारधारेतून त्यांना श्रीमंत घबाडवाला मुलगा हवा असावा. आपल्या सारख्या मध्यमवर्गीयाला हे जमणे नाही आणि त्याने मनातून सगळे विचार पुसून टाकले. पुनः महीनाभर त्याने त्यांना फोन केला नाही. बर बायो-डाटा फक्त नोकेरीचा, शिक्षणाचा. घरचा पत्ता गिरगांव ? उदय चक्रावला येवढ्या मोठ्या गिरगावात या कोठे रहातात? पत्रिका नव्हती तेव्हा तपासण्याचा प्रश्नच नव्हता. आणि हे प्रकरण पुढे रेटावे असे उदयचे अंतरमन सांगत नव्हते. पण कां कोण जाणे. की पुढे सगळे भोगच त्याला पुढे पुढे रेटित होते. आणि उदयचे मनही. सुन्न मनाने, त्यालाही प्रश्न पडे. अरे माझे मन १००% निलम कडे ओढले जात नाही तरी मी त्यांच्या मोहाला कां बळी पडत आहे ? त्याचे काहीच उत्तर त्याला सापडत नव्हते.

पुढे महिनाभर उदयने काहीच हालचाल केली नाही, पण निलमचा फोन मात्र दिवसा गणीत खणखणायचा. कधी भेटूया, कधी भेटूया आणि उदय काहीच उत्तर देत नव्हता. तिला वाटू लागले उदय कोणा दूसऱ्या पोरीच्या प्रेमात तर पडला नाही ना. हे दुभते पाखरु गमवायला तिचे मन तयार नव्हते, एक दोन वेळा त्यांच्या भेटी झाल्या पण वांझोट्या, ना स्पर्श, ना काही, कां कोण जाणे, उदयला तिला स्पर्श करावा असे वाटेना, ना ओढ वाटायची. पण जेव्हा भेटी झाल्या तेव्हा मात्र धक् धक् झाले तेवढेच. प्रेम काय असते याचा उगम काळजाच्या कपारीत होईना. हे असे वांझोटे फिरण्या पेक्षा हिला टाळावे असेच त्याला वाटत होते.

मॅरेज रजिस्ट्रारची तारीख १ महिन्याची म्हणजे १२ फेब्रुवारीची. त्या ऑफीसरने कळवली पण उदयला वाटे थोडे २/३ महिने पुढे गेले तर बरे, पण निलम पेक्षा अंजूलाच घाई जास्त होती. निलमच्या लग्नाची उदयच्या भेटीत तिनेच लगट केली असे ही उदयला वाटले. तिचा उत्साह दांडगा, निलमपेक्षा अंजूलाच यात स्वारस्य अधिक होते. निलम जवळ उदयने अंजू बद्दल खोदून खोदून विचारणा केली. पण तिनेही हातचे राखून थातुर मातुर उत्तर दिले. तेव्हा उदयला समजले की ती तिच्या नवऱ्या बरोबर रहात नाही. तिने त्याला सोडचिठ्ठी दिली आहे. पण डिवर्स पिटीशन अजून पेंडीग आहे. ती नोकरी करते कां ? या बाबत विचारले असता 'नाही' असे उत्तर आले. मग ती करते काय? काही नाही. तिच्या खूप ॲक्टीव्हीटीज असतात. ती दिवसभर बाहेरच असते. संध्याकाळी घरी येते. पूढे ती म्हणाली बाबा! ती नोटात खेळत असते! पण घरात एक पैसा देत नाही. ती काय करते, काय नाही याबाबत निलमला माहीती नव्हते.

या गोष्टीने उदयचे विचार चक्र जोरात फिरायला लागले आणि उगाच तो अंजू बद्दल विचार करू लागला. त्यात 'नोटात खेळते' या उच्चाराने तर तो समजला हिचे कॅरेक्टर काही ठीक नसावे. ती उनाड असावी. हजार धंदे करत असावी, म्हणूनच नवऱ्याने तिला मोडीत काढले असावे. या विचारांनी त्याच्या मनात घर केले आणि अशा कुटुंबाशी संबंध नकोत या निष्कर्षापर्यंत तो आला.

पुढे एक आठवडा गेला असेल. त्याच्या टि.सी.एस. कंपनीने एक प्रोजेक्ट लॉन्च केले. त्याची व्यवस्था लावण्याचे काम उदय कडे होते. तेव्हा रोज ताजमहल हॉटेलमध्ये त्याचे जाणे होई. हे प्रोजेक्ट स्वतः रतन टाटा यांच्या

शुभहस्ते लॉन्च होणार होते. म्हणून उदय त्याच्या तयारीसाठी येत होता. त्यावेळी दोन वेळा त्याला अंजू दिसली बाहेर पडताना आणि एक वेळा गेट-वे जवळ. वर त्याला प्रश्न पडला हि दिवसा येथे कशी? काय कामासाठी आली असेल ? त्याला माहीती होते अशा बाया या मोठ्या हॉटेलात धंद्या साठी येतात आणि त्याच्या मनात पाल चूकचूकली. पण नक्की आखाडा काही बांधता येत नव्हता. ती 'नोटात खेळते' या निमलच्या सांगण्याला यातून पुष्ठी मिळत होती. असा अंदाज उदयने बांधला. आणि तो अस्वस्थ झाला होता. ते प्रोजेक्ट लाँच झाले. मग उदयचे ताजमहालला जाणे काही झाले नाही. आणि अंजू पुन्हा दिसली नाही.

जस जशी लग्नाच्या नोंदणीची तारीख जवळ येऊ लागली तशी उदयची अस्वस्थता अधिकच वाढली. मागे फिरावे असे वाटे, पण आता ते शक्य नव्हते. तारीख तोंडावर आली होती. आणि आलेल्या तारखेला लग्नाचा बार उडाला. नवरा-नवरी आणि दोन विटनेस यांच्या उपस्थितीत पाचवी व्यक्ती फक्त अंजूची मुलगी आणि निलमची आई. बस.

तीन वाजता लग्न लागले, डॉक्युमेंटवर सह्या झाल्या आणि बाहेर येऊनच ती सगळी दोन टॅक्सीने उदयच्या घरी आले. उद्या सत्यनारायण घालायचे ठरले, पण या घाई घाईत हनीमुनला कोठे जावे वगैरे ठरवायचे बाकीच राहीले. मधल्या काळात निलम बरोबर बोलणे फारसे झाले नाही. तेव्हा पुढे बघू असे ठरवून उदयने दुसऱ्या दिवशी सत्यनारायण उरकला. आता त्याच्या घरात उदय, निलम, अंजू, तिची मुलगी आणि आई येवढेच होते. सत्यनारायणानंतर दुसरा दिवस उजाडला. पण अंजू आणि मंडळी काही घरी जायला तयार नव्हती. असे उदयला जाणवले.

''आम्ही मुंबादेवी, महालक्ष्मी दर्शन करून येतो !'' उदय.

''हां ! जावा ना आम्ही थांबतो घरीच ! अंजू.

खरेतर उदयला निलमचे हे नातेवाईक आपले म्हणून वाटत नव्हते. हा त्रयस्तपणा गेले दोन दिवस त्याला जाणवत होता. आता आपल्या संसारात म्हणजे राजा-राणीच्या हं, कोणाची अडचण असावी असे उदयला वाटत नव्हते. पण हाय, ही मंडळी ठाण मांडूनच होती. खूप वैतागला होता उदय पण चेहऱ्यावर काहीही भाव दाखवीत नव्हता.

संध्याकाळचे ५ वाजले होत, त्यावेळी नुकताच उदय कामातून मोकळा

झाला होता. तरीही सारे काही अस्ताव्यस्त पडले होते. कपबोर्डही उघडे होते. त्याने तर ते उघडले नव्हते मग उघडे कसे ? असाही प्रश्न त्याला पडला. तो जरी एकटा सडाफटींग होता तरी घर कसे नीट नेटके असायचे. आता नव्या नवरीला हे कसे जमेल अशी समजूत करून त्याने घेतली. आणि काही सामान आणण्यासाठी मार्केटमध्ये निघाला.

"मी एका तासात येतो. तो पर्यंत तुम्ही थांबा ! उदय, असे सांगून तो निघणार येवढ्यात...

"म्हणजे आम्ही जायचे कां ?" अंजू

"हो तूम्ही निघा तुमच्या घरी! निलम थांबेल ! उदय.

"कां नाही थांबायचे आम्ही ?" अंजू

"अहो घर लहान आहे ! नाहीतर तुम्हाला हॉल मध्ये झोपवे लागेल! उदय.

"असे कां ? " अंजू.

"आज आमचे लग्न झाले आहे. आजचा दिवस पहिला दिवस. हा राजा राणीचा संसार जरा रंगुदेना. आम्ही बेडरुममध्ये झोपू मी आणि निलम. तूम्ही हवेतर बाहेर हॉलमध्ये झोपा ! उदय.

"आम्हाला सवय नाही !" अंजू

"मग तुमचे तूम्ही पहा!" थांबायचे तर थांबा नाहीतर आपले घर गाठा !" उदय.

किती राग आला अंजुला, अशी वागणूक मिळेल याची अपेक्षा नव्हती.

"मग आम्ही दोघे हॉलमधे झोपायचे कां ? "उदय.

"इतकी काय घाई आहे !" अंजू. पण निलम काहीच बोलली नाही.

उदय पार लाल झाला, पण स्वत:ला सावरीत त्याने उगाच संघर्ष नको म्हणून बाहेर जायचे ठरवले. आणि तो निघून गेला.

"निलम तू येतेस कां माझ्याबरोबर ! म्हणजे काही हवे नको ते, आपण घेऊन येऊ, तुझ्या गरजेचे ! उदय.

"नको ! तुम्ही जा "! निलम

याचीच वाट अंजू पहात होती, तिने उदय घरातून बाहेर जाताच, त्याच्या कपाटातले पैसे निलमसाठी घेतलेले दागीने आणि इतर किमती वस्तु एका गोणत्यात भरल्या. ओला मागवली आणि त्या तिघीही घरातून बाहेर पडल्या. पण निघताना टाळे लाऊन जायला विसरल्या नाहीत.

तासाभराने तो परत आला, तर घराला टाळे. या कुठे गेल्या ? शिवाय त्याचा मोबाईलही घाई घाईत तो विसरून गेला. निलम वा अंजूचा नंबर पाठ नव्हता. मग फोन तरी कोणाला करणार? उदय चक्रावून गेला. १ तास वाट पाहून त्याने टाळेवाल्याला फोन केला टाळे उघडले. तर घराचा अवतार बघून हा काय बनाव आहे, हे उदयने जाणले. त्याने त्याच्या मित्राला बोलावले, शेजाऱ्यांना बोलावले, पोलिसाना फोन केला. आणि पोलीस आल्यावर घरातल्या न सापडणाऱ्या गोष्टींचा पंचनामा केला.

बऱ्याच गोष्टी चोरीला गेल्या होत्या, कपबोर्ड सताड उघडे होते. तिजोरीही उघडी होती. आणि सारे कपडे सामान जमीनीवर अस्ताव्यस्त पडले होते. त्याने आपल्या नशीबाला दोष दिला. आपण या मुलीची, त्यांच्या घराची नीट चौकशी केली नाही. हे त्याचे चुकलेच. घाई नडली आता कोणाला दोष देणार ?

सारे घर आवरता आवरता ५ वाजले. त्याला भूक लागली होती, म्हणून त्याने पोळी भाजी स्टॉलवरून मागवली. पण रात्रभर तो जागा होता.

मोठा मुर्खपणा म्हणजे त्याने त्यांचा गिरगावचा पत्ताही घेतला नव्हता. याचीच त्याला काळजी पडली. पोलीसांनी विचारले त्याने माहित नाही सांगताच साळगावकर इन्स्पेक्टरने उदयचे कपडेच उतरले. ''तूम्ही शिकलेली पोरे इतकी वेडी कशी. शिवाय बायको पळाली. उदयने त्यांच्या समोर मानवर केली नाही. तो स्वत: खजील झाला. काय करू या हेच कळत नव्हते त्याला. कपाळाला हात लाऊन तो बसला होता. ती रात्र त्याला भयाण वाटत होती. न झोपता सकाळी उठून त्याने आपली नित्याची कामे उरकली. आणि आज ऑफीसला जायचे नाही असे म्हणून त्याने ऑफीसला फोन केला.

त्याला आता तातडीची गोष्ट म्हणजे निलमचे गिरगावचे घर शोधणे ही पहिली गरज होती.त्याासाठी त्याला तिच्या ऑफीसला जायचे होते. उदयने आपला पुऱ्या दिवसाचा चार्ट ठरवला. आणि घरातून बाहेर पडला. मोटार सायकलने तो निघाला. प्रथम निलमच्या बांद्राच्या ऑफीसला गेला तर ती रजेवर होती. तिच्या घरच्या पत्त्याबद्दल विचारले तर तिच्या ऑफीसने सांगीतले की तिच्या सांगण्यामुळे आम्ही देऊ शकत नाही. तो नाराज झाला. तेथून तो विवाह नोंदणी कार्यालयात गेला. तेथे तिचा फॉर्म पाहिला. त्यावर 'गिरगाव', पण चाळीचे नाव व वाडीचे नाव नव्हते. उदयने तो 'डाटा' पोलीसांना दिला. त्यांनी सांगीतले ''आम्ही चौकशी करतो.''

पण उदय खूपच दुखावला होता. तो  स्वस्थ बसू शकत नव्हता. दोन दिवस गेले, आणि तिसऱ्या दिवशी त्याच्यावर बॉम्ब पडावा अशी घटना घडली. निलमने त्याला घटस्फोटाची नोटीस पाठवली होती. उदय उडालाच, साला काय लग्न, काय हे घटस्फोटाचे लचांड, आता पुढे अनेक अडचणी येणार हे तो गृहीत धरून चालला होता. आपले हे भोग आहेत हे त्याने जाणले आणि मनाची तयारी करून दुसऱ्या दिवशी ऑफीसला गेला.

हा सगळा घोळ घातला असणार अंजूने. या मागे काय उद्देश असावा देव जाणे. पण सध्यातरी या प्रकरणाचे चटके उदयलाच बसणार होते. या प्रकरणात निलमचा सहभाग किती ? खरेतर ते वासरू. दुसऱ्याच्या अकलेने चालणारे हे उदयने ताडले होते. उदयने घटस्फोटाची अनेक प्रकरणे नातेवाईकांत, ऑफीसमधे पाहिली होती. आणि त्याचे भोग दोघांनाही भोगावे लागतात. तारूण्याची १०/१२ वर्षे फुकट जातात दोघांचीही. यामागे अंजूच आहे हे तो जाणून होता, ती पार बेरकी होती, हे त्याने तिच्या चार, पाच भेटीत जाणले होते. हे बेणे पोहोचलेले आहे. आणि निलमचा त्यात बळी जात आहे हे ही त्याने ताडले होते. पण आता मामला पार पुढे गेला होता. मागे वळणे कठीण होते. त्यात उदयचा स्वभाव भिडस्त, आक्रस्थाळी नव्हता. शांत स्वभावाच्या, पापभिरू उदयच्या मनाला हा धक्का सहन करणे कठीण होते. असे काही होईल असे उदयला वाटले नव्हते. पण भोग कोणाला चुकलेयत ? खरेतर निलम त्याला एकटी तीन वेळा भेटली, तिच्या मनात असा डाव नसावा, पण ती कच्ची निघाली आणि फसली.  ती अंजूच्या ट्रॅपमधे. त्या वेडीच्या ध्यानात हा अंजुचा डाव कसा आला नाही ? हेच उदयला समजत नव्हते. ठीक आहे, पण या प्रकरणाने उदयच्या जीवनाला वेगळे वळण लागले. येवढे खरे. असे म्हणतात आगीतुन गेल्या शिवाय चांगले दिवस नाही पहाता येत माणसाला आणि या भोगाच्या मंडपातून जावे लागते, हे नाही चूकवता येत.

उदयला निलमच्या घरचा पत्ता सापडला होता. आता हे लोक येथेच रहातात कि आणि वेगळया ठिकाणी याचा शोध उदयला घ्यायचा होता. शनिवारी उदयचे ऑफीस बंद असे, त्याने त्याच दिवशी गिरगाव गाठले. झावबाच्या वाडीत ती चाळ होती. पण कोणाला विचारावे, या विचाराने तो त्या वाडीच्या बाहेरच्या बस स्टॉपवर १५/२० मिनिटे बसून होता. पावणे दहा झाले होते. लोकांची ये जा चालू होती. आणि येवढ्यात एक सुकन्या त्या गल्लीतून

बाहेर आली. उदय तसा खूप देखणा हुशार होता. नेहमी ठीक ठाक रहायचा. ती मुलगी येऊन बस स्टॉपवर थांवली. सुंदर निटस बांधा साडीतली ती मुलगी उदयलाही आवडली, आपण हिला या चाळीबद्दल विचारले तर चालेल ना ! असा विचार करून, त्याने ठरवले तिला विच्चारावे.

''हो ! ताई ही चाळ याच वाडीत नाही, आपण त्याबद्दल काही सांगू शकाल कां ? उदय.

''कां नाही ! ही चाळ आमच्याच कंपाऊंडमधे आहे, कोण हवे आहे तुम्हाला ?'' ती कन्या.

''ताई मी उदय देशपांडे ! मला देशमुख कुटुंबीयांना भेटायचे आहे ! उदय.

''नका भेटू ! अहो ते घरच बदनाम आहे !'' ती कन्या.

या तिच्या बोलण्याने त्या घराची इमेज काय आहे हे समजले उदयला. आणि त्याची बोलतीच बंद झाली. क्षणभर काय बोलावे समजेना त्याला. तो त्या कन्येकडे पहातच राहिला......

''ताई तुमचे नांव काय ?''

''रंजना !''

''आपण येथेच रहाता का ?''

''हो ! अगदी बालपणापासून !''

''तुम्ही निलमला ओळखता का ?''

''हो ती तर माझी वर्ग मैत्रीण होती !''

''तुम्ही असे कां विच्यारता !''

त्यानंतर उदय म्हणाला.....

''ताई मला उशीर होतोय नरीमन पॉईटला जायचे आहे! आपल्याला कोठे जायचे आहे ? उदय.

''नरीमन पॉइंटला !'' ती मुलगी

''मग छान, मी टॅक्सीने जात आहे ! तुम्हाला तुमच्या ऑफीसकडे सोडून मी निघून जाईन. शिवाय आपल्याला प्रवासात बोलताही येईल !'' उदय.

दोघे टॅक्सी पकडतात.

''ताई तुमचे नांव ?''

''रंजना !''

''मी हे सारे विचारत आहे याचे कारण सांगतो तुम्हाला ! दोन दिवसापूर्वी

निलम सोबत माझे लग्न झाले. पण त्याच दिवशी माझे घर लुटून ती, तिची बहीण न सांगता निघून गेली. माझ्याकडे त्यांचा पत्ता नव्हता. मी वणवण भटकून तो मिळवला. हे निलमच्या बहीणीचे कारस्थान आहे. अहो आश्चर्य म्हणजे काल तिने मला घटस्फोटाची नोटीस दिली ! मी एक सरळ माणूस. माझे घरचे कोणी नाही. आणि फसवलो गेलोय !'' उदय.

''अहो त्या निकमच्या बहिणीचे प्रकरण भयानक आहे. तो तिचा नवरा याच जागेत रहायचे पण ह्या बयेचे हजार धंदे. बाहेर ख्याली. मग कंटाळून नवऱ्याने सोडली. आणि तो दुबईला गेला. तिचेही डिर्वोस पेटीशन अजून पेंडींग आहे !'' रंजना.

''बरे झाले तुम्ही हे सांगितलेत म्हणजे आता माझे तरूणपणही या सडवणार तर ! '' उदय.

''बहुतेक तेच होणार, अहो १०/१२ वर्षे निकाल लागत नाही. तारखावर तारखा पडतात ! उपयोग शुन्य ! '' रंजना.

''हे तुम्ही कसे जाणता ?'' उदय.

''मी वकील आहे, सेशन कोर्टात आणि शिवाय कॉर्पोरेटची वकीलीही करते !'' रंजना

''कृपया ! मला तुमचा मोबाईल नंबर, ऑफीसचा पत्ता द्या ! मी अजून या प्रकरणात कोणाही वकीलाची नेमणूक केली नाही ! पण एक चांगली गोष्ट केली मी, जेव्हा त्यांनी माझे घर लुटले. मी पोलिसात तक्रार केली. पंचनामा केला आहे. पण आता पत्ता सापडलाय मी तो पोलीसांना देईन ! मग ते याबाबत चौकशी करतील.!'' उदय

''हे चांगले केलेत ! पण ही दोन्ही प्रकरणे वेगळी, चोरी आणि घटस्फोट!'' रंजना.

''ओके मी दोन दिवसात तुम्हाला भेटतो, मग यावर विचार करू आणि पुढे तुमच्या सल्ल्याने !'' उदय.

''ओके आणि तिने तिचे व्हिजीटींग-कार्ड उदयला दिले.

कोर्टात केस सुरू झाली, गेल्या १।। वर्षात फक्त तारखावर तारखा पडत होत्या. पण एकदाही केस उभी राहीली नव्हती, आणि केव्हा उभी राहिल याचाही पत्ता नव्हता. आपले आयुष्य या प्रकणामुळे वाया जातेय याचेच दुःख उदयला होते. त्याने आपल्या मनातले हे दुःख रंजनाला बोलून दाखवले तेव्हा

त्याच्या डोळयातून अश्रूंच्या धारा लागल्या. असे काय पाप मी केले, हे भोग माझ्या वाट्याला यावेत. बालवयात आई-बाप गमावले आणि मोठा आधार होता तो. काका-काकी कोरोनाच्या महामारीत गमावले, नाहीतर त्यांच्या जागृत स्वभावाने असे संकट आले नसते. आता मी एकटा पडलो आहे. रंजनाने त्याला धीर दिला.

"नाही ! मी तुमच्या बरोबर शेवटपर्यंत आणि जरूर पडल्यास जीवन भर! तुम्हाला जगाने ओळखले नाही पण मी ओळखले आहे ! तुम्ही जराही चिंता करू नका ! तुम्ही एकटे नाही. याचा विश्वास असु द्या!" रंजना.

आणि तिने उदयच्या पाठीवर हात फिरवीत त्याला आस्वस्थ केले. आता या केसमध्ये आपण नवी खेळी खेळू या. आपण तिला डिवोर्स द्यायचा नाही. या धोकेबाजांना सडवायचे १०/१२ वर्षे म्हणजे कळेल फसविण्याची किंम्मत.

"म्हणजे ! " उदय

"आता निलम परत येणार नाही असा डाव खेळायचा. आपला ऐवज, जागेचे पेपर्स सारे काही मिळवायचे. सोपे आहे सारे. तुम्ही आता निश्चिंत असा. आणि यापूढे डोळयात पाणी आणायचे नाही ! काय ? " रंजना.

"होय ! तुझी साथ असेल तर मी लढेन, अन्यायाशी ! मागे हटणार नाही. चांगली नोकरी आहे. त्यात तुझी साथ आहे. मग या श्रीमंतीवर मी सगळा डोलारा पेलायला तयार आहे!" उदय.

"मग काय, माझी कायम साथ तुम्हाला असेल." रंजना.

आता या दिड-पावणे दोन वर्षाच्या काळात उदय-रंजना यांच्या भेटी होत होत्या. त्या दोघांनी एकमेकांना पूर्णपणे ओळखले होते. रंजनाही अविवाहीत होती आणि त्यामुळे काही म्हणा, थोडे फार आकर्षण होणे ही काही नवी गोष्ट नव्हती आणि तसाच आकार आता या प्रकरणाने घेतला होता.

त्या दिवशी कोर्ट संपल्यावर पहिल्यांदाच उदय म्हणाला....

"रंजना आपण दोघेही आज ताजमहल मध्ये जेवण घेऊ, चालेल कां तुम्हाला ?" उदय.

"हो कां नाही !" रंजना.

"मग चला तर! " उदय.

म्हणून त्यांनी टॅक्सी पकडली आणि ताजमहल समोर आले. दिवसाचे २।।/३ वाजले असतील टॅक्सीचे बिल पेड करून उदय आणि रंजना बाहेर

पडली. तर समोरून अंजू ला त्यांनी पाहिले. पण तिने मात्र या दोघांना पाहिले नाही. त्यांना आश्चर्य वाटले, पण यातले सत्य रंजनालाही माहिती होते आणि उदयला. तिला काऊंटरकडे पाहू ते रेस्टॉरन्ट मध्ये गेले.

"रंजू ! तू पाहीलेस ना अंजूला !" उदय

"हो ! ती तर नेहमीच येथे ! जेव्हा गिऱ्हाईक असते तेव्हा तिला कॉल जातो !" रंजना.

उदयने कपाळाला हात लावला, म्हणजे पूर्वी रंजना बोलली ते खरे आहे. त्याने त्यावर अधिक विचार न करता तो विचार झटकला आणि.....

"काय घेणार आपण ?"

"जे तूला आवडेल ते घेऊ ! तू व्हेज की नॉन व्हेजिटेरीयन आहेस ! म्हणजे त्याप्रमाणे मागवू!" उदय.

" व्हेज !"

"ओके ! येथे मी व्हेजिटेरियन टि.सी.एस.च्या कामाला येतो, तेव्हा आम्ही स्टाप मेंबर्स येथेच जेवण घेतो !" उदय.

"ठीक ! मी ही व्हेजिटेरियन आहे !" उदय

असे म्हणत उदयने ताजमहालची फेमस "ताज थाळी " मागवली. टी.सी.एस.च्या स्टाफसाठी तिच्या बीलात २०% सुट होते.

जेवण झाले रंजनाला खूप आवडले टेस्टी आणि विवीध पदार्थांची मांडणी रंजनाला खूप आवडली. मग ते दोघे बाहेर पडले.

"मी तुला तुझ्या घरी सोडतो, आणि मग घरी जाईन बोरीवलीला !" उदय.

"चालेल !" रंजना

ते टॅक्सीने घरी आले

"तुम्ही घरी येणार का माझ्या ?"

"आवडेल मला ! पण आज नको !" उदय

"नाही ! मग आताच चला. माझ्या आईला भेटा. आम्ही दोघीच असतो घरी ! " रंजना

त्या दोघांनी घरात प्रवेश केला तेव्हा आई सोफ्यावर बसली होती. उदयने पूढे होऊन तिचा पदस्पर्श केला. आणि तिनेही खूप खूप आशिर्वाद दिले त्याला. आणि आपल्या बाजूला बसवून, खूप, खूप बोलली ती, तिला उदय आवडला होता.

"तुझे लग्न झाले आहे कां ?" आई

या प्रश्नाने उदय गडबडला. त्याने एक नजर रंजनाकडे टाकली आणि हाताने 'नाही' असे सांग अशी खूण केली.

"नाही !" उदय

उदयलाही रंजनाने केलेल्या खूणेचा बोध हळू हळू होऊ लागला, आणि रंजनाच्या मनातल्या चांदण्याचा प्रकाश त्यांच्या अंगाअंगावर अंथरला आहे असे जाणवले. मग कॉफी घेऊन उदय आपल्या घरी गेला. पण त्या दिवशी त्याची अवस्था अगदी वेगळीच झाली होती आणि रंजनाच्या विचाराने आज झोपेचे खोबरे झाले.

उदय घरी आला तेव्हा त्याच्या लेटर बॉक्स मधे एक लखोटा पडला होता. तो फॅमिली कोर्टा कडून आला होता. निलमने अजून काही नव्या मागण्या केल्या होत्या ! त्यात उदयचे घर मला मिळावे असे म्हटले होते. म्हणजे हि माझ्या मुळावरच उठली आहे. या जाणीवेने उदय चक्रावला त्याने रंजनाला हे सांगीतले.

"काळजी नको ! अशा तक्रारी होतातच. हा मामला लवकर मिटू नये यासाठीच हा खेळ तिने खेळला होता. पण तुम्ही चिंता करू नका ! मी बघून घेते, तुम्ही निश्चीत रहा. असे काही होणार नाही. उलट आपणच तिला आता पूर्णपणे जेर बंद करू. त्यांत तुमची बाजू सेफ आहे. तुमचा त्या बयेशी शरीर संबंध आला नाही. किंवा तुम्ही काही गैरवर्तन केले नाही. नाहीतर पहिल्याच पीटीशन मध्ये ते आले असते. नंतरच्या तक्रारीत ते करता येत नाही. म्हणजे तुमची बाजू सशक्त आहे ! घाबरू नका. मी सारे त्यांच्या गळ्यात अडकवून तिची धिंड काढीन !" रंजना

तिच्या बोलण्याने उदयला हायसे वाटले देवानेच अशी मैत्रीण मला दिली, त्याचे आभार किती मानावेत सांग. तू आहेस माझ्या सोबत म्हणून खरे सांगु जगण्यात रस वाटतोय मला. मागे दोन वेळा आपण आत्महत्या करावी असा विचारही स्पर्शून गेला मनाला. एकाकी वाटत होते. मनावर प्रचंड ताण होता. आपले तारूण्य नासुन जाणार, त्याला धीर द्यायला कोणी नाही अशी एकाकी अवस्था झाली होती हे उदयने रंजनाला सांगितले. तिने त्याला धिर देत म्हटले......

"आता तू चिंता सोड, मी आयुष्य भर तुला साथ देईन, हे प्रकरण धसास

लाऊ आणि वेळ लागत असेल तर काहीतरी **'तोडगा'** काढू, माझ्या मनात त्याचा विचार चालू आहे, मग सांगेन तुला, तू भोळा सांब आहेस ! आपण जगाबरोबर जायला हवे तरच तग धरू शकतो या जगात !'' रंजना.

''तोडगा ?'' उदय.

''नंतर सांगेन, आधी हे प्रकरण धसास लावू ती चोरीची केस मीच चालवीन, सगळा दस्त ऐवज मिळवुया आणि कमीत कमी पांच वर्षास खडी फोडायला पाठवू त्या बहिणीला मग डिवोर्स पिटीशन आपोआप मार्गी लागेल...!'' रंजना.

''उपकार तुझे ! तु गेले १।। वर्ष हे प्रकरण हाताळत आहेस फि चे काहीच बोलली नाहीस ! मला सांग मी चेक देईन !'' उदय.

''अरे बाबा ! हा घरचा मामला आहे ! यात 'फि चा' प्रश्न येतो कोठे !'' रंजना.

''घरचा ? '' उदय

''आता तुझी माझी मैत्री जमली आहे, मी जरी वकील असले तरी त्या पलिकडे आपले संबंध आहेत कि नाही !'' रंजना.

''हो ! मला ही आता तुझ्या आधारामुळे सुरक्षित वाटते आहे! नाहीतर मी हा धक्का सहन केला नसता ! अगदी मना पासुन बोलतो !'' उदय.

आणि एक रविवारी रंजना चक्क उदयच्या घरी आली, तेव्हा ११ वाजले होते, उदय जेवण करीत होता. शिवाय भाजी पोळी केंद्रावरून त्याने चपाती-भाजी मागविली होती. रंजना अशी अचानक आणि तीही प्रथमच आल्याने उदय गडबडला. अनपेक्षीतपणे तिचे येणे, जरी त्याला सुखावह वाटत असले तरी... उदयची धडधड सुरू झाली होती.

''या ! राणी सरकार ! आपले स्वागत असो ! '' उदय

''राणी सरकार ? '' रंजना

''हो का नाही ! जसा राजा आपल्या प्रजेची काळजी घेतो, तशा तुम्ही माझी काळजी घेत आहात म्हणून म्हटले ! '' उदय

''गेल्या दोन वर्षात आपली मैत्रीही मैत्रीच्या पलीकडे गेली आहे ! माझ्या मनात तुमच्याबद्दल प्रेम उत्पन्न होणे सहजिकच आहे! मला तुमच्या डोळ्यात तेच दिसते आहे. माणसाला हे कळते, पण बोलु शकत नाही ! काळजाच्या कप्प्यात ती भावना घर करून बसते अबोल होऊन. नाही वाटत ? '' रंजना.

''हो ! खरे आहे हे ! कधी कधी तुझ्या आठवणीने रात्र रात्र जागून काढतो मी. पण तुम्ही नजरे समोरून जात नाही, असे हल्ली होऊन बसलेय !'' उदय.

आता दोघांमधल्या प्रेमाची कोंडी फुटली होती. तिला गुलाबी रंगाचे कोंब येऊ लागले होते. आज उदयच्या घरातील वातावरण आल्हाददायक झाले होते. पण तरीही अनेक प्रश्न मनात रेंगाळत होतेच की.

घरी येताच रंजनाने उदयच्या किचनचा ताबा घेतला आणि छान पैकी पुलाव बनवला. चपात्या बनवण्याचा प्रश्नच नव्हता. कारण ब्रम्हचाऱ्याचे घर पीठ ना काही. तरीही आजचा बेत छान जमला. दुपारी दोघांनीही जेवण घेतले. मग गप्पांचा फड जमला. आज रंजनाही खूप आनंदी होती. गेले कित्तेक दिवस ती उदयचाच विचार करीत होती. मनातली खळखळ आज तिने मोकळी केली होती. आणि अगदी हलके हलके वाटत होते. उदयच्या मनातही आता अनेक स्वप्नांनी रंगीत चित्रे चितारायला सुरूवात केली होती. संध्याकाळी ५ पर्यंत रंजना तेथे होती. प्रेम मनाला शरिराला किती उत्साही बनवते याचा अनुभव उदय घेत होता, आणि रंजनाही तोच अनुभव घेत होती.

निघताना रंजना उदयला म्हणाली...

''उदय ! मला माझ्या आईला तुझे घर दाखवायचे आहे, तिला पुढच्या रविवारी मी घेऊन यायचे म्हणते.'' रंजना

''जरूर ! नुसत्या येऊन जाऊ नका , येथेच रहा, मला कौटूंबिक स्वास्थ मिळेल ! मला एकटेपणाचा कंटाळा आला आहे. खरचं मी अंतःकरणा पासून बोलतो आहे. याची ! मी वाट पाहतोय, चांगल्या आठ दिवस रहायला तयारीने, आणि कायम राहिलात तरी माझी ना नाही !.'' उदय

साऱ्या सोंगट्या आपल्या मनाप्रमाणे पडत आहेत, असे वाटून रंजनाही आनंदात होती...

रंजना निघून गेली, आणि उदयच्या विच्यार चक्राचे जहाज कल्पना विलासात घरटे घालू लागले होते. आज सगळ्या अडसरांची कोंडी फुटली होते. उदय आज खूष होता. उदयच्या मनातले पतंग आकाशाला स्पर्श करून वेगळी अनुभूती देत होते. उदयचा पाय जमिनीवर ठरत नव्हता. कोर्टाना १५ दिवसांची रजा होती, सध्या कोणतीही डेट केसला दिली नव्हती. आणि रंजना रविवारी येणार. तो एक एक दिवस त्याला महिन्यासारखा वाटत होता. शनिवारी रजा होती. उदयने जरूरीचे सगळे सामान घरी आणले, मसाला, हळदी पासून मिठा

पर्यंत आणि घराला घरपण आले.

रविवारी रंजना आईला घेऊन आली. कितीतरी वर्षांनी तिने घर सोडले होते. एक तर ७० वर्षांचे वय, अधू डोळे, पायाच्या दुखण्याने तिने बाहेर जाणे बंद केले होते. पण लेकीच्या आग्रहास्तव ती तयार झाली. ट्रेनने न येत त्या ओलाने उदयच्या घरी आल्या.

उदयने त्यांचे स्वागत केले. त्याने रंजनाच्या आईचा चरण स्पर्श केला खूप खूप आशिर्वाद दिले तिने आणि आनंद व्यक्त केला. रंजनाने किचन मधे येऊन उदयला जेवणाला मदत केली. उदयने त्यांना कॉफी करून दिली. रंजना किचन मध्ये होती तेव्हा. रंजनाच्या आईने त्याला बोलावले. त्याच्या कुटुंबाची, नातेवाईकांची चौकशी केली. त्याची नोकरी, शिक्षण याबाबत विचारले. बराच वेळ दोघांत खूप चर्चा चालू होती. आईला खूप आनंद झाला त्याला भेटून. रंजनाने त्याच्या जवळ काही विशेष म्हणजे प्रेम, लग्न या संदर्भात सांगीतले कां? असाही प्रश्न उदयला पडला. पण त्याने तो झटकून टाकला. दुपारी जेवण झाले त्या दोघी घरी निघणार तर उदयने त्यांना निदान एक दिवस तरी येथे रहा, असा आग्रह केला, नाईलाजाने त्या थांबल्या, रात्रीच्या जेवणाला रंजनाने छान बेत केला होता. कित्येक वर्षात तो इतके रुचकर आणि प्रेमाने बनवलेले जेवण जेवत होता. चांगलाच हात मारला त्याने.

दुसऱ्या दिवशी सोमवारी तिघेही ओलाने निघाले. आईला घरी सोडून उदय आणि रंजना आपल्या ऑफीसला गेले .

आजचा त्यांचा प्रवास छान झाला. आई खूष होती. यामुळे उदयही आनंदी होता. आईला गिरगावला सोडल्यावर दोघेही नरीमन पॉईन्टला गेले जाताना रस्त्यात उदयच्या मनातला 'तोडगा' जो 'रंजना' म्हणाली होती... म्हणजे काय ? ज्यामुळे सगळ्या गोष्टी सुरळीत होतील. तोडगा म्हणजे नक्की काय ? रंजनाला काय म्हणायचे होते, या विचारांची खळखळ उदयच्या मनात चालू होती. त्याने उत्सुकतेने रंजनाला पून: तोच प्रश्न केला .....

''रंजना ! तुम्ही 'तोडगा' म्हणाला होतात तो तोडगा म्हणजे काय हो ! तुम्हाला काय अभिप्रेत आहे 'तोडगा' म्हणजे ?'' उदय

रंजना त्याच्या या प्रश्नाने हसली.

''अहो ! तोडगा म्हणजे तुमच्या एकाकीपणाला घालवण्यासाठीचा उपाय!'' रंजना.

''तो कसा काय ?'' उदय.

त्याचे उत्तर आता रंजनाला देता आले नाही पण ती उदयला बिलगली त्याच्या खांद्यावर आपले डोके ठेवली आणि तशीच होती नरीमन पॉईंट येई पर्यंत.

''हां ! हाच तो तोडगा ! आता आले ध्यानात !'' रंजना.

आणि उदयही सुखावला... त्याने रंजनाचे हात हातात घेतले...

''आता समजले !'' उदय.

आणि तो म्हणाला.... ''माझ्याही मनात तेच आहे !'' उदय.

रंजना आपल्या ऑफीसला निघून गेली आणि उदय आपल्या टी.सी.एस.ला.

आता त्या दोघांतले धुसर वातावरण स्पष्ट झाले होते आणि रंजनाचे उदयच्या घरी येणेही वाढले होते. ती आल्यावर त्याचाही दिवस मस्त जायचा. खूप खूशीत पण त्या डिर्वोसचा मामला लवकर मिटायला हवा होता. येवढेच तो कसा काय सॉलव्ह होणार या चिंतेने उदय हल्ली उदास असायचा.

एका रविवारी रंजना सकाळी लवकर आली आणि तेही उदयने बोलावले खास कामासाठी म्हणून. आणि मग ते दादरच्या रूप संगम साडी सेंटर मधें आले. त्या स्टोअरचे मालक रोहित भाई हे उदयच्या काकांचे मित्र. पण बऱ्याच वर्षांनी उदय आल्याने त्यानाही आनंद झाला.

''काय उदयराव ? या ताई तुमच्या वूड बी काय ? म्हणजे होणाऱ्या पत्नी !'' रोहित.

आणि उदयही त्या उत्साहाच्या भरात 'होय' म्हणून गेला. रंजना लाजली हे सांगण्याची गरज नाही!

''रंजना ! हे आमचे दुकान आहे असे समज! आणि तुझ्यासाठी तुझ्या आवडीचे साड्या, ड्रेस मटेरीयल काढ ! '' उदय.

उदय बरोबर रोहितही उभा होता साड्यांचे सिलेक्शन होई पर्यंत. रंजनाने दोनच साड्या निवडल्या

''उदय ! या ताईना एक साडी तू घेतली म्हणून पैसे काऊंटरला द्यायचे आणि दुसरी साडी माझ्याकडून गिफ्ट !'' रोहित.

पुनः ओला ने ते दोघे अंधेरीला उदयच्या घरी आले. येताना बाहेर जेवूनच आले. रंजनाची पसंती चांगली. याची जाणीव उदयला झाली.

"आता या साड्यांचे काय करायचे मी तर कोर्टात पँट शर्टच घालते !" रंजना.

"माझ्याकडे येताना नेसायची !" उदय.

"तुम्हाला आवडेल साडी नेसलेले ?"

"हो ! तू कधीही नेसलीस तरी आवडेल, कारण तू मला आवडतेस ! म्हणून !" उदय.

"काहीतरीच काय ? आणि रंजना लाजली.

आता त्या दोघांमधला परकेपणा पार दूर झाला होता. ती दोघे अधिक जवळ आली होती. उदयच्या मनस्थितीची तिला जाणीव होती. उदयला सावरण्यासाठी आधार हवा होता त्यात रंजनाला उदय आवडला होता. सरळ स्वभावाचा, पारदर्शक व्यवहार असलेला, संयमी. तिचे प्रेम त्याच्यावर होते. आणि त्याच्याही मनात ती भरली होती. आता त्याला रंजना आणि निलम यांच्यातला फरक समजला होता, आणि रंजनाच आपल्याला कशी योग्य आहे हे ही त्यात परमेश्वरानेच अडचणीत त्याची भेट रंजनाबरोबर झाली होती. हा योगा योग होताच.

आता दोघेही एकमेकांकडे ओढ घेत होती. पण मध्ये निलमचा खोडा होता. तो दूर होणे अगत्याचे होते. त्याला किती वर्षे लागतील याचा पत्ता नव्हता. याच साठी सगळे अडले होते. पण रंजना खूपच सकारत्मक होती, या बाबत ती मार्ग शोधीत होती आणि तिला सापडला, पण तो गळी उतरवणे कठीण होते तो म्हणजे, लिव इन पध्दतीचा हा १/२ वर्षासाठी, आणि मग सगळे काही निवारल्यावर नोंदणी पध्दतीने विवाह उरकणे हाच एक मार्ग तिला दिसत होता. या बाबतच्या कायदेशीर बाबीचा ती अभ्यास करीत होती. तिलाही आता विवाहात अडकण्याची घाई झाली होती. उदयलाही पण, एक विवाह झाल्यावर दुसरा करता येत नाही. ही कायद्याची अडचण होतीच.

उदयने निलमला एक नोटीस पाठविली. मला विवाह करायचा आहे. तुलाही करावे असे वाटत असेल. आता तुझे माझे जमणे थोडे लांबू शकते पण अशक्य नाही. नोटीस गेली.

आणि दोन दिवसांनी तिने पाच लाखाची नवी डीमांड टाकली. उदय हबकला. त्याने रंजनाला हे सांगितले. ती म्हणाली हा लुटारूपणा आहे. घाबरायचे नाही. मी आहे ना तुमच्या सोबत.. माझ्यावर सोपवा.

तरीही या घटनेचे प्रचंड टेंशन उदयला आले होते.

रंजनाने आपल्या पत्रात तिला कळवले. पाच पैशेही मिळणार नाहीत माझ्या अशीला कडून.

उलट रंजनाने चोरीच्या केसवरच नेट लावला आणि हे प्रकरण धासास लावण्याचे ठरवीले. तिच्या कंपनीतील सिनिअर यांच्या सोबत पोलीसांनाच जबाबदार धरून, त्यानी त्यांना कैचीत पकडले, कारण इतकी वर्षे होऊन आणि चोरीचा एफआयआर फाईल करूनही पोलीस गप्प कां?

रंजनाने पोलीसानांच पत्र लिहिले आणि त्याची कॉपी मुंबई पोलिस कमिशनर आणि डी.आय.जी आणि लॉ मिनिस्टरला पाठवली, आणि गजब झाले. चार दिवसात चक्रे फिरली, निलम सापडली, पण अंजू गायब. निलमला बेल मिळाला नाही. तिची कसून चौकशी पोलीस करीत होते. त्यांनी निलम आणि अंजू यांना जबाबदार धरले आणि एफआयआर फाईल केला १५ दिवसात अंधेरी कोर्टात केस उभी राहिली.

या प्रकरणात अंजूला अरेस्ट वॉरंट काढले गेले. तिचा शोध सुरू झाला. तिला ताजमहल मधेच पकडले आणि आठवडाभरात केस फाईल झाली पहिल्या एफआयआर सोबत.

त्याच दिवशी तिच्या घराची झडती घेण्यात आली. केस उभी राहिली. रंजनाने ती केस उत्तम रीतीने चालवली. त्यांनी चोरलेले दस्ताऐवज व पैसे उदयला परत केले आणि २/३ हियरींग नंतर त्या दोघींना सजा झाली. खरी गुन्हेगार अंजू होती, तिला ७ वर्षांची सजा तर तिच्या दबावाखाली या प्रकरणात सहाय्य करणारी निलम हिला ५ वर्षांची सक्त मजुरीची सजा झाली.

केस आपल्या बाजूने झाली याचा आनंद उदयच्या मनात मावेना. त्याने तर कोर्टात तिला मिठी मारली. तिही सुखावली. आता दोघांच्या लग्नाचा मार्ग मोकळा झाला.

फॅमीली कोर्टात दुसऱ्या दिवशी रंजनाने या संबंधीचे पेपर्स फाईल केले. आणि कोर्टाने ही केस फाईल केली. निकाल उदयच्या बाजूने दिला. दोन्ही घरात आनंदी आनंद झाला. रंजनाने आपले प्रेम उदयवर आहे आणि आम्ही लग्न करणार आहोत हे आईला सांगितले. तिलाही आनंद झाला. आणि भरभरून आशिर्वाद त्यांना दिले.

पुढच्या मुहूर्तावर उदय-रंजना यांचे रितसर लग्न झाले. आणि दोघेही

सिमल्याला हनीमुनसाठी रवाना झाले.

प्रवासात न राहून उदयने रंजनाला 'तोडगा' असे तु काय म्हणत होतीस, ते काय? असा प्रश्न विचारला.

आता त्याचा उपयोग नाही. कारण सगळे फासे आपल्या बाजूने पडले. आणि तोडगाची वेळ आली नाही... पण तरीही उदयच्या मनात हे नको रहायला म्हणून ती म्हणाली...'लिव्ह इन' म्हणजे आपण दोघे नवरा बायको सारखे रहावे हा विचार माझ्या मनात होता. समजले कां? आणि उदयने तिला घट्ट मिठीत घेतले आणि तिचे दिर्घ चुंबन घेतले !

०–०–०

# चिखल

प्रेम असावे निर्मळ आणि अमृता सारखे पवित्र, कधी नसावे ते आंधळे, नाहीतर शेवटी आपल्यालाच ते ग्रासेल. हे कळत नाही हो वेड्या झालेल्या माणसांना, प्रेमाच्या नशेच्या आहारी गेल्यावर. आणि शेवटी विष होते त्याचे, नी त्रिकोण, चौकोन होऊन राख करते अनेकांच्या प्रपंचाची.

या साऱ्याचे पडसाद उमटायला बराच वेळ जातो, दुष्परीणाम दिसायला लागतात. हे स्लो-पॉयझन असते हो, संबंधाना नासवणारे माणसाला जाळणारे.

तरूणपण तसे वेडे असते, फुलपाखरासारखे फांद्या बदलीत एका फांदीवर स्थिर होते, कधी त्याची भूक भागत नाही त्या मकरंदाने आणि मग मकरंदाचेच विष होते. मागे फिरता येत नाही. पूढे सरकणे बंद होते, अंधकार असतो नजरे समोर. नजर बंद करणारा. आणि मग त्या अग्नीत पश्चतापाच्या तोच भस्म होतो.

हे की ते इथपर्यंत ठीक, निर्णय करता येतो, आणि माणूस सरळ मार्गी होतो. नाही पडत बळी अमीशाला. मन स्थिर होते नी टाळते वेड्या मनाला आवरीत त्याचे पंख. पण जेव्हा असे होत नाही तेव्हा ?

नंदूचे लग्न झाले देवा ब्राम्हणांच्या साक्षीने आणि प्रपंचाची घडी बसली, फुलला तो, पारीजातकासारखा. तो मुंबईला, ती गावाला, मन सारखे धाव घेई गावाला पण, ते शक्य होईना उठल्या बसल्या, या बकाल मुंबईत तेव्हा झोपडे घेणेही परवडेना आणि मग लागलेली भूक काही केल्या भागवता येईना. आणि पावलाना पाय फुटले. नजर झाली भिरभिरती नी नजर पोहचत नव्हती तो पर्यंत ती क्षितीजेही ओलांडू लागली आणि तिथेच वनवासाला सुरुवात झाली त्याच्या प्रपंच्याला.

संकटे येण्याआधी सावध करतात माणसाला पण जर माणूस बेसावधपणाच्या नशेत असेल ना तर ती सावध करण्याची प्रक्रिया निष्फळ होते आणि भरकटते आयुष्य त्या माणसाचे. मग तो, मामला प्रेमाचा असो वा कोणत्याही कामाचा. ती धोक्याची घंटा माणसाला जाणवतेही, पण तो बेदरकारपणे झुगारून देतो. काय होणार ? असे म्हणत. आणि अनेक वेळा पश्चातापाची वेळ येते.

नंदू आपल्या नोकरीत स्थिर झाला होता. तो गावाला वेळच्या वेळी पैसे पाठवी. बायको आणि त्याच्या मुलीसाठी. नऊ वर्षे होऊन गेली होती त्याच्या

लग्नाला. पण मुंबईत घर घेणे दु:रापास्त झाले होते नी दिवसेंदिवस नंदूची अस्वस्थता वाढत होती. पण हे चित्र त्याच वर्षी थोडे अवघड झाले. केमीकलच्या प्रदुर्भवाचा ठपका ठेऊन ठाण्यातून ती कंपनी शिफ्ट करावी लागली. आणि पार दूर डोंबिवलीला कंपनीने नवे प्लॅन्ट सुरू केले, नंदूला मशीन चालू आणि बंद करणे या शिवाय काहीही येत नव्हते. तेव्हा इतर कोणता जॉब शोधणे मुश्कील झाले होते. पण डोंबिवलीलाच जाणे क्रमप्राप्त होते. परळला स्लो गाडी पकडून २ तासाचा सकाळी आणि परतीचा प्रवास त्याला करावा लागत होता. दम छाक व्हायची त्याची.

आपली बायको आज शिकलेली असती आणि छोटी मोठी नोकरी करत असती तर आधार झाला असता आणि दोघांच्या पगारात एक छोटेसे घर घेता आले असते. याच विचाराने नंदूला ग्रासले होते. आपली बायको अनाडी आहे, बीन कामाची आहे, हिच भावना त्याच्या मनात घर करून होती. तोही काहीं फारसा शिकलेला नव्हता पण नशीब बलवत्तर आणि म्हणून ही नोकरी लागली. हेल्पर म्हणून व मग पूढे तो ऑपरेटर झाला. त्यात फारशे कौशल्य नव्हते. वा नवे काही शिकण्यासारखे नव्हते. आता जूनी कंपनी डोंबिवलीला गेल्यावर पगारही कमी झाला. हवेतर रहा नाहीतर गाषा गुंडाळा. असा फतवा कंपनीने काढला. नंदूला काही पर्याय नव्हता. ना घर ना दार. खर्च मात्र वाढू लागला आणि कमी पगारात भागवणे त्याला कठीण झाले. जाण्या-येण्याचा खर्च वाढला. खाणावळ वाढली एका गाववाल्याच्या घरात तो पोट भाडेकरू होता तेथेही भाडे वाढले. पगार कमी पडू लागला आणि कधी कधी एखाद्या महिन्यात गावाला पैसे पाठवणे जमत नव्हते. ती बायको मग पत्रावर पत्र पाठवायची. अन्नधान्य होते कारण कोणाच्या तरी मदतीने ती थोडी फार शेती करायची. घरात पुरेल एवढे ती पिकवायची पण पोरगीचे वय वाढत होते. शाळेचा खर्च, कपड्याचा खर्च, दुधाचा वाढत्या खर्चाने ती मेटाकुटीला आली होती. पण दिवसे दिवस नंदूची बेदरकारी वाढत होती.

लग्न, प्रपंच करणे, या सोप्या गोष्टी नाहीत हो निस्तरायला. त्याचे ओझे पेलायला सशक्त मानसिकता, कर्तव्य कठोरपणा आणि कुटुंबावर प्रेम असायला हवे. येणारी संकटे खांद्यावर झेलण्याची ताकत शरीरात आणि मनात हवी तरच तो संसार भले गरीबीतला असो, अर्ध पोटी राहूनही माणसाला पेलवता येतो. पण जेव्हा त्याच्या बद्दल अनास्था निर्माण होते तेव्हा मात्र कोलमडून पडतो तो.

माणसाने आपला प्रपंच आकारताना खिशाला परवडेल, असेच जीवन स्वीकारावे लागते. हवेत बंगले बांधून प्रपंच रेटता येत नाही. त्याला खरेतर वास्तवाची जोड मिळायला हवी. शिवाय मनाची स्थिरता त्यात महत्वाची. आत्मसंतुष्टता हा प्रपंच्याचा कणा असतो. नाहीतर व्हायचे तेच झाले.

नंदूचे आपल्या प्रपंचातून मन उडाले. त्याने घरी पैसे पाठविणे बंद केले. सहा महिन्यात पैसे आले नाहीत.  ती ही कंटाळली आणि मुलीला घेऊन तिने मुंबई गाठली आणि मोठा वाद झाला दोघात. त्याने तिला घरात घ्यायलाच नकार दिला. बिचारी तिच्या कोणा गाववाल्याच्या आसऱ्याला गेली. मग मात्र नंदूशी तिचा संपर्क सुटला. ति कोणा कोणाच्या घरी धुणी भांडी करीत आपले दिवस कंठीत होती. तिचे नांव अंकीता. अंकीताला तरी कोण किती दिवस आपल्या घरात आधार देणार ? अनेक अडचणी तिच्या पूढे येत होत्या.

तो काळ असा होता की मुंबई नगरीत गावागावातले लोक एका खोलीत रहात ८/१० जण. खाणावळीत जेवत आणि त्या एका खोलीत झोपत. ते बहुतेक मिलमध्ये काम करीत होते. पण मिलला ग्रहण लागले आणि अंकीताच्या जीवनाला. तिची मुलगी रंजना आता बारा वर्षाची झाली होती. तिच्या वाढत्या वयाचे ओझे तिला आता पेलणे कठीण झाले होते. त्या खोलीतले गाववाले मुंबई सोडून गावाला जाऊ लागले आणि अंकीताला तेथे रहाणे सुरक्षीत वाटेना. आता एकाध दुसरा गाववाला येथे तग धरून होता. कोठेतरी दुकानात काम करून आपली गुजराण करीत होता. तीची मुलगी मुनीसीपालटीच्या शाळेत सहवीला शिकत होती. तिचे हे वर्ष पूरे होई पर्यंत येथे रहावे आणि मग पहावा नवा बसेरा असा विचार अंकीताने केला होता.

येवढ्यात तिला बातमी मिळाली तिच्या मुळ गावातून एका गाववाल्या कडून की नंदू डोंबिवलीला केमिकल कंपनीत कामाला आहे. तिने एकदा त्याला भेटावे आणि मुलीला त्याच्या हवाली करावे, मग एकटीचे होईल ते होईल. आणि एक दिवशी ती सकाळी डोंबिवलीला गेली. सोबत मुलीला रंजनाला तिने घेतले होते. ही त्याची मुलगी आहे. त्याने मला नाकारले तरी तो आपल्या मुलीला स्वकारील ही आशा तिला होती. त्याच विचारने अंकीताने डोंबिवलीला नंदूची कंपनी गाठली. दूपारच्या लांच टाईम मधेच त्याची गाठ पडेल असे कंपनीच्या सिक्युरीटीने सांगीतले. म्हणून ती गेटवरच थांबून राहिली होती. जाताना घेऊन गेलेली भाकरी त्या दोघींनी खाल्ली.

गेटवरून नंदुला निरोप मिळाला. त्याने ताडले हे लचांड कशाला आले येथे परत. तिने गाव सोडल्याला तीन वर्षे होऊन गेली होती. तोही तिला विसरला होता. आणि नव्या पाखराच्या शोधात होता. त्याला दुभती म्हैस हवी होती. अंकीता सारखी भाकड जबाबदारी त्याला नको होती. आता गेटवर गेल्यावर काय वाढून ठेवले आहे याची त्याला कल्पना नव्हती. पण तिला भेटणे जरूर होते. नाहीतर ती कंपनीच्या मॅनेजरला वा मालकाला ती भेटेल आणि आपली नोकरीही धोक्यात येऊ शकते हे त्याने ताडले. आणि लंच आटोपल्यावर तो गेटवर आला. तिला पाहून त्याच्या मस्तकाची शिर तट्‌तटा उडायला लागली पण सोबत आपली मुलगी आहे हे पाहून त्या बापाचे हृदयही द्रवले. ती समोर येताच.

''ही आपली पोरगी आपल्या ताब्यात घ्या,  मला मोकळी करा. म्हणजे माझी जबाबदारी संपली. मी जमेल तसे पाहीन माझे. मला मोकळी करा!'' अंकीता.

पण पोरगी काही तिला सोडायला तयार नव्हती. ती तिला चिटकून बसली होती.

''आई ! मला तू बापाकडे सोडून कां, तूही चल, मी एकटी नाही जाणार !'' रंजना.

आणि अधिकच तिला बिलगली. मोठा बखेडा आता होणार, शिवाय कंपनीत बभ्रा. नंदूने हे ताडले. आता ही बला काही करून शिताफीने टाळली पाहिजे हे त्याने ताडले. आणि कसे तरी करून हिच्या पासून सुटका करून घेतली पाहीजे. असे ठरवून नंदुने अर्धा दिवसाची रजा घेतली आणि तो डोंबिवली स्टेशनला आला. तेव्हा अंकीता, रंजना सोबत होत्या.

कर्जत कडून येणारी गाडी आली ती प्लॉटफार्म नं १ वर, तेव्हा रंजनाचा हात नंदूने धरला होता, मात्र तिकीटे लोअर परेल पर्यंतची तिघांचीही काढली होती.  या वेळी नंदूच्या सुपीक डोक्यात काहीतरी वेगळेच शिजत होते. अंकीता पासून थोडे अंतर ठेवूनच तो प्लॉटफार्मवर उभा होता. ना बोलणे. गाडी येताच नंदू रंजनाला घेऊन गाडीत चढला. पण बाकड्यावर दूर बसलेली अंकीता गाडीच्या दरवाज्या पर्यंत येण्या पूर्वीच गाडी सुटली. खरेतर गाडी ठाण्या पर्यंतच होती. 'मग ती यार्डात गेली' पण नंदुने रंजनला घेऊन पलीकडच्या प्लॉटफार्म वर येणारी तेज गाडी पकडली आणि तो गेला. त्याच प्लॉटफार्मवर अंकीताची गाडी

आली होती.

त्या डब्ब्यात अंकिता चढली खरी? पण घाबरी गुबरी झाली होती. डब्यात साडे तीन वाजता तुरळक गर्दी होती. ती अंग चोरुन एका बाकड्यावर बसली . पण ठाणा येताच खाली उतरली. ठाण्या पर्यंत ती गाडी तेज होती. पुढे कसे जावे हे तिला कळेना. ठाण्याच्या १ नंबर प्लॉटफार्म वरून सगळ्या स्लो गाड्या सुटत होत्या. पण हे तिला माहिती नव्हते बराच वेळ त्या फलाटावर ती बाकड्यावर बसून होती. घशाला कोरड पडली होती 'तिने बाजूच्या स्टॉलवर जाऊन पाणी मागितले. ती प्याली व पूनः त्याच बाकड्यावर येऊन बसली. ते बाकडे खाली होते. ती बसली पण तिला ग्लानी आली होती. तिने सकाळ पासून काहीही खाल्ले नव्हते– तिच्या मुली सोबत एक चपाती तेवढीच. ती किती वेळ तेथे होती हे तिलाच कळले नाही. त्यावेळी ५ वाजले होते, आता त्या फलाटावर गर्दी होऊ लागली होती लोक ऑफीस, कॉलेज यातून आपल्या घराकडे मुंबईला जात होते.

त्याच बाकड्यावर बसायला 'कुंदा' आली. ती आपला बी.एड चा कोर्स पूर्ण करण्यासाठी तीने ठाण्याच्या गोखले कॉलेजमध्ये अ‍ॅडमीशन घेतले होते. आणि गेले वर्षभर आठवड्यातून दुपारी १ ते ५ पर्यंत लेक्चर्स चालू असत. आता तिचे जादा लेक्चर होते परीक्षेपुर्वी म्हणून ती आली होती. आणि आता घरी जाण्यासाठी ती ठाणा स्टेशनवर गाडी पकडणार होती. स्लो ट्रेनला वेळ होता कारण लागोपाठ चार फास्ट ट्रेन त्या प्लॉटफार्मवरून गेल्या म्हणून ती त्या बाकड्यावर बसण्यास आली.

''ओ ! बाई उठा, हि काय झोपेची वेळ आहे ?'' कुंदा.

अंकीता धडपडत उठली आणि त्या बाकड्यावर सावरून बसली.

''थोडी ग्लानी आली होती, म्हणू पडले होते !'' अंकीता.

थोडा वेळ मधे असाच गेला.

''आता किती वाजले ?'' अंकिता,

''पांच पंचविस ! '' कुंदा.

मला गाडी पकडून लोअर परेलला जायचे आहे ! किती वाजता गाडी आहे! अंकिता.

''आता गाडी येईलच !'' कुंदा.

''तुम्ही या गाडीने जाणार आहात कां? अंकिता.

''हो! मी ही लोअर परेललाच उतरणार आहे! कुंदा.

''मग बरे झाले ! सोबत झाली मी एकटीने प्रवास कधी केला नव्हता! आजच आले.... आणि फसले ! हे तिकीट कुठपर्यंत आहे? अंकीता.

अंकीताने आपल्या जवळचे तिकीट कुंदाला दाखविले ते लोअर परळ पर्यंतच होते. कुंदाने ते तिकीट तिच्या कडे दिले.

''हे जपून ठेवा !'' कुंदा.

येवढ्यात गाडी आली. आणि त्या दोघी त्या गाडीत लेडीज डब्यात चढल्या.

'' तूम्ही कोणत्या बिल्डींग मधे रहाता! '' अंकीता

''सन्मेळ गल्लीतल्या 'अजगर' मेंशनमधे!'' कुंदा

''मीही त्याच इमारतीत चवथ्या मजल्यावर रहाते !'' अंकीता.

''कोण कोण असता ? कुंदा

आणि अंकीताने आपली सगळी हकिकत कुंदाला सांगितली. कुंदालाही तिची किव आली.

''तुम्ही काय काम करता ?'' कुंदा.

''त्या आणि बाजूच्या इमारतीत ५ जणांकडे जेवण आणि धुण्या भांड्यांचे काम करतो ! ''अंकीता

येवढ्यात दादर स्टेशन आले– त्या दोघी खाली उतरल्या आणि दादरच्या २ नं. प्लॉटफार्मवर आल्या. अंकिताच्या हातात काही सामान नव्हते, तिचे एक छोटे से पाकीट तिने ब्लाऊझ मधें ठेवले होते. त्यानंतर दोनच स्टेशने. आता गाडी लोअर परेलला. प्लॉटफार्म नं. २ वर आली. त्या दोघीही उतरल्या. अणि स्टेशन मधून बाहेर पडून बाहेर आल्या. जवळच्या भाजीच्या दुकानात कुंदाने भाजी घेतली आणि त्या दोघी चालू लागल्या आपल्या इमारतीकडे. त्या वेळी लिप्ट हा प्रकार नव्हता जीनेही वेगवेगळ्या बाजूने असत. कुंदा पहिल्या माळ्यावर गेली आणि अंकिता पाचव्या मजल्यावर.

घरी येईपर्यंत अंकिताने आपल्या भावना कोंडून धरल्या होत्या पण घरी येताच बांध फूटला. खूप रडली ती आपल्या मुलीच्या आठवणीने. पण आता तिची जबाबदारी तिचा बाप स्वकारणार याच विच्यारारने तिला हायसे वाटले. त्या दिवशी बहुतेक गाववाले गावाला गेले. आता ती घरी एकटीच होती. आता पुढे काय, एकटीने काय होईल ते होईल' या विचाराने तिच्या मनात थोडी

भितीही वाटली. पण आता मुलीची काळजी नव्हती. ती आता निश्चिंत झाली होती. आता मोलमजूरी करून 'लोकांची जेवणे, भांडी घासून ती कसेतरी दिवस कंठींत होती. ती आता तिशीत होती. म्हणजे तरूणच. काळी सावळी पण दिसायला तशी नाकी डोळी ठीक होती. ती आता जगाच्या डोहातल्या खोल पाण्यात उरतली होती आपल्या हिंमतीवर, तिला आता कशाचीच भिती वाटत नव्हती. येईल त्या संकटाला तोंड द्यायला तयार होती.

पण त्याच दिवशी संध्याकाळी त्या चाळीचा मालक आला. ''ओ बाई इथल्या भाडोत्र्यानी ही जागा मला परत केली आहे. तुम्ही उद्या ही जागा खाली करा. दुसरे गिऱ्हाईक येथे रहायला येईल!'' मालक

''अहो पण मी कोठे जाऊ? मला जवळचा कोणी नातेवाईक नाही. तुम्ही मला आठवडाभराचा वेळ द्या. मी काहीतरी व्यवस्था करते. ही जागा मीच घेतली असती भाड्याने. पण त्यासाठीची पागडी मला परवडणार नाही ! तरी आठवड्याचा वेळ द्या !'' अंकिता.

''ठिक आहे मी तुला एका आठवड्याची वेळ देतो, पूढच्या रविवारी जागा खाली करून द्यायची ! नाहीतर सगळे सामान घराबाहेर काढीन काय समजले ना?'' मालक.

हे एक नवे संकट येऊन उभे राहिले होते. दातावर मारायला पैसा नव्हता. महिना संपल्याशिवाय धुनी-भांड्याचेही पैसे येण्यासारखे नव्हते. हे आयुष्य जगण्याची वाटच मुळी वाकडी तिकडी जात आहे. ती कोठे घेऊन जाणार याची तिला चिंता होती. पण दुसऱ्या क्षणात तिने ती झुगारून दिली, आणि शेगडीवर खिचडी ठेवली. रटारटा विस्तव पेटत होता आणि तिच्या मनातली आगही. नवरा शेळपट निघाला त्याच्या गणतीत आपण नाही हे तिला समजले होते. खूप शिव्या शाप त्याला दिले पण आपल्या पोरीला आता सांभाळील या आशेने तिने मनाला अडसर घातला. जाऊ दे असतील तेथे सुखी राहू देत. पण मुलीची रंजनाची आठवण आल्यावर मात्र तिच्या डोळ्यात अश्रूंचा डोह झाला, त्याने तिला कोठे नेली असेल. कोठे रहात असेल इ. प्रश्न तिला सतावीत होते. अंगावरचे तेवढेच कपडे होते तिच्या जवळ. आता तिच्या शाळेचे काय? तो तिला शाळेत घालेल कां? का सोडील माझ्या पोरीला वाऱ्यावर. ती कमालीची हळवी झाली. शेगडीवरच्या खिचडीला कढ येत होता नी तिच्या मनालाही. तिने डोळे झाकले नी उघडले तेव्हा खिचडी पार करपून गेली होती, ते पाहून मात्र ती

घाबरली, काही तरी विपरीत घडणार याची भिती तिच्या मनात घर करून राहिली. आणि पून: अश्रूंना वाट करून देत ती आज उपाशीच झोपली.

सकाळी जाग आली तेव्हा ४ वाजले होते, पाणी एकदाच सकाळी येई ४ ते ६ म्हणून भरून ठेवावे लागे पिंपात आणि एक-दोन भांडी प्यायला. तिच्याकडे तिची अशी कोणतीच भांडी नव्हती. पण जाणाऱ्या मंडळीनी एक पाण्याची टाकी मागे सोडली होती, कारण ती सोबत नेणे कठीण होते. तिने चहा केला आणि सोबत पोहे घालून ती उठली. पण डोक्यातून सात दिवसांच्या मुदतीचा विचार काही सरायला तयार नव्हता. तिच्या हातात ५ कामे होती. त्यातून तिला ३०० रुपये मिळत त्यात तिचे नी पोरीचे भागे. शिवाय घरातल्या १० लोकांचे जेवण होई त्यात तिचे जेवण आरामात सुटे. आज तसे काहीच काम घरी नव्हते.

तो दिवस रविवार होता म्हणजे रजा. तिला भेटलेली 'कुंदा' नक्कीच घरी असेल. तिला भेटून येऊ या काहीतरी उपाय नक्कीच निघेल असे तिचे अंतरमन तिला सांगत होते. ती तिच्या दरवाज्याला कडी घालून पहिल्या मजल्यावर आली. काल घरी वर जाताना 'कुंदा' कोणत्या खोलीत गेली हे तिने पाहिले होते. म्हणून ती सरळ तीच्या दरवाज्यावर आली. आणि कडी वाजवली. पण बऱ्याच वेळाने कुंदाने दार उघडले. ती त्यावेळी आंघोळीला गेली होती....

''आता येऊ कां?'' अंकीता

''हो ! या - ना ! काय काम काढलत ? या आत या !... बसा !''

कुंदा २२/२३ वर्षाची तरूण पोरगी होती. मोहक चेहरा, चटपटीत बोलणे, कोणालाही ती आवडेल असे व्यक्तीमत्व. आता तर ती आंघोळ करून आली. आज रजा म्हणून तिने केस धुतले होते, नी ते मागेपूढे सोडले होते.

''तुम्ही चहा घेणार ना ?''

''हो ! मी घेतला आहे ! पण पून: घेणार !'' अंकीता.

कुंदाने दोन कपात चहा ओतला. एक कप अंकीताच्या हातात दिला नी दुसरा आपल्या हातात. चहा प्यायल्यावर कुंदाने दोन्ही कप मोरीत ठेवण्यासाठी अंकीताच्या हातातला कप मागितला पण अंकिताने तिच्या हातातलाच कप घेतला नी मोरीत ठेवला व धुवून तो पून: ओठ्यावर ठेवला.

''तुम्ही येथे एकट्याच कशा?'' अंकीता.

''मी एकटीच रहाते ही खोली माझ्या वडीलांची आता माझ्या नावावर मालकाने केली आहे. माझे लग्न झाले नाही. आता दोन महिन्यांपूर्वी मी

नोकरीला लागले आहे. ही नोकरी मला पसंत नाही पण माझ्या पोटाच्या खळगीला आधार आहे. म्हणून करते. मला शिक्षीका व्हायचे आहे म्हणून बी.ए. झाल्यावर बी.एड. करते आहे. अंकीताला बी. एड. चा अर्थ समजला नसावा.

‘‘म्हणजे तुम्ही मास्तरीण होणार ?’’

‘‘हो! नक्की आणि चांगली शाळा किंवा बी.एम.सी.च्या शाळेत नोकरीला राहिन !’’ कुंदा.

‘‘छान ! ’’ अंकीता.

‘‘काय काम काढलत ? काही खास काम आहे कां? आनमान न करता सांगा, मी तुम्हाला मदत जरूर करीन !’’ कुंदा.

तिच्या आश्वासक बोलण्याने अंकीताचा धीर जरा चेपला. सांगावे की नाही याच विच्यारात ती होती. मग बऱ्याच वेळाने....

‘‘बोला ना !’’ कुंदा

‘‘सांगते !’’ अंकीता

‘‘माझी थोडी अडचण झाली आहे. मी ज्या खोलीत रहात होते ते सगळेजण गावाला कालच गेले. सकाळी मालक आला त्याने मला ही जागा एका आठवड्यात सोडून जा असे सांगितले आहे. किंवा पागडी देऊन ती ताब्यात घे असे सांगीतले. मला यातले काहीच शक्य नाही , मी जावे कोठे असा यक्ष प्रश्न माझ्या समोर आहे. ‘रात्रभर याच विच्याराने मला झोप लागली नाही.

‘‘ठिक ! तुमचे वय काय असावे ?’’

‘‘असेल तीस वा आत बाहेर !’’ अंकीता.

‘‘मग झाले तर !’’ कुंदा.

‘‘काय ?’’ अंकीता

‘‘तुझ्यासाठी आमच्या आश्रमात मी नोकरी बघते तु उद्या सकाळी माझ्या बरोबर भांडूपला यायचे !’’ कुंदा.

‘‘धन्यवाद ताई ! मी पडेल ते काम करीन !’’ अंकीता.

‘‘आता तू घरी जा आणि उद्या सकाळी ७ वा. माझ्याकडे ये ! आपण आमच्या अनाथाश्रमात जाऊ !’’ कुंदा.

‘‘हो! धन्यवाद ताई ! देव तुमचे कल्याण करो !’‘ अंकीता.

सकाळीच त्या दोघी ‘‘अनाथाश्रमात’’ पोहोचल्या. कुंदा तेथे कारकून –

टायपिस्ट म्हणून काम करीत होती. गेल्या गेल्या तिने तिथल्या व्यवस्थापिकेला भेटण्याचे ठरवले व अंकिताला बरोबर घेऊन ती त्यांच्याकडे गेली. पण प्रथम अंकीताला बाहेर बाकड्यावर बसवून.

''मॅडम माझ्या इमारतीत एक परित्यात्त्का आहे. माझ्या ओळखीची तरूण आहे. तेव्हा तिला आपल्या आश्रमात नोकरी देता येईल कां ?

''का नाही ? आपल्या कडच्या दोन मुली पूढच्या आठवड्यात जाणार आहेत. तेव्हा तिच्या जागेवर तिला ठेऊ! हवीतर रहायला जागाही देऊ!'' मॅनेजर

''उपकार होतील मॅडम, ती बाहेर बसली आहे, तेव्हा तिच्याजवळ बोलून घ्या !'' कुंदा.

''हो ! का नाही !'' मॅनेजर.

कुंदाने तिला आत बोलावले तिला पाहून ''तू येथे नोकरी करायला तयार आहेस ?''

''हो ! ताई ''

''तुझे कुटुंब ?''

''नाही नवऱ्याने मला टाकली आहे. त्याला शिकलेली बायको हवी ! मी अनाडी ७ वी पर्यंत शिकलेली !'' अंकीता.

''ठीक! तुझी नोकरी पक्की ! हवे तर रहायला जागाही देऊ ! पगार २५००/– मिळेल!'' मॅनेजर

''धन्यवाद ! ताई आपले उपकार मी कसे विसरीन ! गरीबावर दया केलीत आपण. मी अगदी इमाने इतबारे नोकरी करीन. '' अंकीता.

कुंदा ज्या आश्रमात काम करीत होती तो महाराष्ट्र सरकारने परित्यात्त्का स्त्रियांसाठी चालवलेला आश्रम होता. सरकारी नोकरी, पगार, रहायला कॉर्टर. सगळ्या सोई होत्या. अंकीताला देव पावला होता कुंदाच्या निमित्ताने. ती आज अगदी निश्चिंत होती. आठवडा भराने तीने सन्मेल गल्लीतली जागा खाली केली व टॅक्सीत आपले सामान भरून कुंदा बरोबर भांडूपला आली. आता कुंदा तिची जीवा भावाची मैत्रीण झाली होती.

''आयुष्य हा एक अस्थिरतेचा नमुना आहे. क्षणात आहे, क्षणात नाही. असे हातावरल्या थुंकी सारखे आपली बाजू बदलत असते. क्षणात आनंद तर दुसऱ्या क्षणाला दुःख. हे सारे अंकीताने आजवर अनुभवले होते.

आजची घटनाही अंकिताच्या दृष्टीने अलौकिक होती. तिच्या जीवनाचे तारू आज किनाऱ्याला लागले होते. परमेश्वराने आपले ऐकले. बुडत्याला काडीचा आधार तसा काल ओळख झालेली कुंदा देवरुपाने कामाला आली. हे सारेच अंकीताला अलौकीक होते.

जीवन हा एक खडतर प्रवास असतो. जर तुम्ही काही चांगले केले असेल तर नक्कीच तुम्हाला फलदाई होते, पण जर तुम्ही कुणाच्या वाटेवर चिखल पेरला तर तोच कालंतराने आपल्या प्रपंचाचा म्हणजे जीवनाचा चिखल करतो. हा अनुभव जगभर लोक अनुभवत असतात. पण काहीही शिकायला तयार नसतात. ती इतराना फसवतात. आपल्या जाळ्यात ओढतात आणि त्यांच्या बेसावधतेचा फायदा उठवीत इतराना बरबाद करतात आणि स्वत: ही बरबाद होतात. हे आजचे जगणे कशामुळे आपण भोगत आहोत. हे त्यांनाही कळत नसते. त्यामागे फक्त आणि फक्त स्वार्थ असतो दुसरे काही नाही.

त्याचे असे झाले. सहा महिन्या पूर्वीची गोषदट, कुंदाला वाचनाची आवड. ती आठवड्यातून दोन वेळा तरी पूस्तक बदलायला मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या वाचनालयात जात असायची. तिच्या वाचनाचा झपाटा इतका मोठा होता की २/३ दिवसात पाचशे पानाचा खुर्दा पडे.. ना. सी फडके, मधु मंगेश कर्णिक, श्री. ना. पेंडसे हे सगळे लेखक तिचे आवडते. तिला एक पुस्तक हवे होते. माहिमची खाडी ही मधु मंगेश कर्णिकांची जगप्रसिद्ध कादंबरी. तिने तिच्या साठी क्लेम लावला होता.

लायब्ररियने कुंदाला फोन केला व ते पुस्तक नंदू या माणसाने नेले असून उद्या परत करण्यास सांगीतले आहे. अशा निरोप त्याला देण्यात आला आहे. उद्या संध्याकाळी ५ वा. तुम्ही येऊन जा. हा निरोप मिळताच ती वाचनालयात साडे चार वाजताच आली होती. पण पूस्तक परत करणारा अजून आला नव्हता. लायब्ररीची वेळ ६ ची होती म्हणजे आता ६ वाजे पर्यंत बसावेच लागेल याची वाट कुंदा पहात होती.

एकदाचा नंदू आला...

''सॉरी हं !''

''ठीक !''

त्याने लायब्रियनला पुस्तक परत केले.आणि त्याने कुंदाला दिले.

''स्वारी !'' तुम्हाला बसावे लागले. मला डोंबिवली वरून यायला वेळ

झाला''

''ओके, ओके!''आपले नांव ?'' नंदू

'' कुंदा !''

''आपण निघु या ! मी आज प्रथमच तूम्हाला पहातोय ! आपण कोठे रहातात ?'' नंदू

''लोअर परेलला !'' कुंदा.

''हो कां, मी रहातो महालक्ष्मीला ! '' नंदू

आणि दोघे इमारती खाली आले. कुंदा सारखी घड्याळ पहात होती. तिला लवकर घरी जायचे होते. तिने टॅक्सी केली.

''दादर स्टेशन !'' कुंदा.

''मलाही दादरला सोडा, मी रेल्वेनेच महालक्ष्मीला जाईन ! नंदू.

''ओके, बसा.''

आणि दोघेही दादरला आले, मग पश्चिम रेल्वेच्या दादरच्या प्लाटफार्म नं.२ ला त्यांनी धीमी गाडी पकडली. कुंदा उतरली. तिने उतरल्यावर नंदूला बाय केले. नंदू पूढे निघून गेला.

पुस्तक ७ दिवसात परत करावे असा दंडक होता कारण त्या पुस्तकाला खूप मागणी होती. ते पूढच्या शनिवारी परत करावे लागणार होते.

कुंदा संध्याकाळी साडे सात वाजता लायब्रेरीत पोहचली. पहाते तर नंदूही तेथेच होता. तिने आपले पुस्तक परत केले आणि तिने ना.सी. फडकेंची 'रंजना' ही कादंबरी घेतली. ६ वाजता लायब्ररी बंद झाली. आज महिन्याची फी भरायची होती, तेव्हा काऊंटरला खूप लाईन होती. त्याच रांगेत नंदू उभा होता. तिने आपला नंबर व पैसे त्याच्याकडे दिले. आणि बाजूला जाऊन बसली. पैसे भरून झाल्यावर नंदूने कुंदाची पावती तिच्याजवळ दिली. व ते निघाले. पूनः टॅक्सीने ते दादर स्टेशनला आले.

''मॅम ! आपण कॉफी घेऊ या कां ?'' नंदू.

कुंदाला घाई होती पण कोणी उमदा तरूण कॉफीची ऑफर देतोय तर तिला नाही म्हणता येईना.

''ओके !'' कुंदा

कॉफी घेताना खूप गप्पा झाल्या. अर्धा तास केव्हा गेला हे त्यांना समजले नाही. मग ते दादर स्टेशनला येऊन घरी गेले.

घरी गेल्यावर कुंदा त्या तरूणाचा म्हणजे नंदुचा खूप विचार करीत बसली. त्याचे व्यक्तिमत्व तिला खूप आकर्षक वाटले. ही तिची कोणत्याही पूरुषा बरोबर कॉफी घेण्याची पहिलीच वेळ होती. रात्री घरी आल्यावर ती बराच वेळ त्याचाच विचार करीत होती.. तो पून:, पून: भेटावा असे तिला वाटू लागले.

तिच अवस्था नंदूची झाली होती. तो बेरक्या होता. त्याने पंधरा दिवस तिला भेटण्याचे टाळले. कुंदा मात्र वाट पाहून घरी जाताना खट्टू होऊन जात होती.

मी नंदूकडे ओढली जात आहे अशी भावना कुंदाची होत होती. तो सारखा डोळ्यांच्या पापण्या आड उभा राही. तो तसा होताच राजबिंडा, वय जरी ३२ असले तरी वाटत नव्हते. १९ व्या वर्षी त्याचे गावातच लग्न झाले, गावातल्याच मुलीशी. आणि मग तो मुंबईला आला त्याच्या काकाकडे. तेवढा एकच आधार होता त्याला. रुबाबात रहायचा. तो शिकलेला होता ११ वी पर्यंत. पण वाचनाची आवड जबरदस्त. निवडक पुस्तके तो वाचायचा. त्यात ना.सी.फडके, मधू मंगेश कर्णीक, श्री.ना. पेंडसे यांची अधीक.

आता अनेक वेळा ते जोडीनेच ठरवून लायब्रेरीत येत. आणि संध्याकाळची नाष्टा-कॉफी घेऊनच घरी जात. हा सगळा गुटूरगुचा प्रवास सहा महिने चालू होता. आपण अधिकाधिक त्याच्याकडे ओढले जात आहोत हे कुंदाने जाणले होते आणि तोही. पण हा कोण कुठला, काय शिकलाय ? कोठे काम करतो, याचे वय काय, कौटुंबिक माहिती या बद्दल तिला जराही माहीती नव्हती. बरे विचारावे तरी बरे नाही हेही ती जाणत होती. तो तिला आवडायला लागला होता येवढे मात्र खरे.

नंदू हा बेरक्या तरूण होता. थोडा रंगेल, त्याला सुंदर, मुंबईत रहाणारी, वावरणारी छान बायको हवी होती. तो मुंबईला आल्यावर त्याची चॉईस बदलत गेली आणि त्याच्या बायकोत त्याला जराही रस वाटेनासा झाला होता. ती गावंढळ, गावात रहाणारी. सातवी पर्यंत शिकलेली तिला तिच्या प्रपंच्या पलीकडे कसलाच रस नव्हता. तिला एक मुलगी झाली. ती नंदू मुंबईला येण्यापूर्वी. सुरुवातीला त्याला ओढ होती. पण नंतर डोळे फिरले मुंबईचे झाकपॅक बघीतल्यावर. अंकीता त्याची बायको नऊवारी नेसे. नंदूला सहावारी नेसणारी बायको, गोरीपान, हवी होती पण गावात आईवडिलांनी नात्यातीलच मुलगी बघितली आणि बार उडवून दिला. नव्यानवलाईचे नऊ दिवस संपले ते

त्याने मुंबईत पाऊल ठेवल्यावर. सुरुवातीला तो गावी मनिऑर्डर करी पण मग २/३ महिन्यांनी केव्हातरी. कारण त्याचा अवांतर खर्च वाढला. त्याचा पगार त्याला पुरेना आणि त्यात कुंदाची भेट झाली नी सगळे बजेटच बिघडले. कुंदाही कधीकधी खर्च करी, पण नंदू तिला खर्च करू देत नसे. तो एनकेन प्रकारेण तिच्यावर रोब बसविण्याचा प्रयत्न करी जरी परवडत नव्हता तरी.

ठाण्यात त्याची कंपनी होती तोवर सारे सुरळीत चालले होते असे म्हणायला हरकत नव्हती पण कंपनी डोंबिवलीस गेली नी पगार कमी झाला. अनेक वेळा उसनवार करून नंदूला त्याची चैन भागवायला लागत होती.

आता कधीकधी रविवारी नंदू कुंदाला कोठे कोठे रिसॉर्टवर घेऊन जाऊ लागला. त्याचा सहवास तिला आवडे. श्रृंगाराचे नवनवे प्रकार तिला ओढून नेत होते, हे तिला कळत होते. पण ते वळण्याचे वय नव्हते हे तिला कोठे कळत होते. ती वहात जात होती.

नंदू हा गेली २/३ वर्षे स्त्री-सुखापासून दुर होता आणि त्याला हे गोरे-गोमटे कबूतर काही करून सोडायचे नव्हते. हि जाते कोठे आता असा समज करून त्याने घेतला होता. तोही काही चूकीचा नव्हता, कारण तीही त्याला तशीच साथ देत होती. या अगोदर ती दोघे विरारच्या रिसॉर्टवर गेली होती. खूप मजा केली. आणि आता तिसऱ्यांदा त्याने ती जागा बदलली. कुंदा वेड्यासारखी त्याच्या मागे पळत होती. आपण काय करतोय याचे जराही भान कुंदाला नव्हते. एका विशिष्ठ मर्यादे पलीकडे आपण जायचे नाही. हे तिने पूर्वीच ठरवले होते. पण निसर्ग ? तो तर दोन जीवांना एक करण्यासाठी सतत कार्यरत असतो. आगीला आग भेटते आणि लोह चुंबकासारखी माणसे क्षणभराच्या आनंदासाठी आसुसलेली असतात.

या वेळी नंदूने तिला ठाण्याच्या एका गेस्ट हाऊसवर नेले. ही जागा आपल्यासाठी सुरक्षित नाही. काहीतरी वेडे वाकडे घडू शकते असा संशय कुंदाच्या मनात डोकावला आणि तिने तो बेत बदलला. आज आपला मुड नाही असे सांगून ठाण्यात जाऊनही ती परत मुंबईला आली. नंदू नाराज झाला होता. पाखरू हातून निसटणार तर नाही ना अशी शंका त्याच्या मनाला चाटून गेली. आणि आपण जरा संयमाने घ्यावे असे त्याने ठरवले. किती दिवस ती त्याला टाळणार होती. असा समजही त्याच्या मनाने करून घेतला. तसाच कुंदाने, येईल तो माझ्या मागे. आता त्याला तिच्या सहवासाच्या उबेची चटक लागली

होती, आणि तिनेही त्याला थोडे दिवस टाळायचे ठरवले. आणि ती दोन आठवडे लायब्ररीकडे फिरकली नाही. त्याने लायब्ररीत तिची चौकशी केली पण काही थांगपत्ता लागला नाही. ठीक आहे आपण वाट पहावी येवढाच पर्याय होता. नंदूच्या शरिराला आणि मनाला प्रचंड भूक लागली होती. पण करतो काय?

या पंधरा दिवसात कुंदाने खूप विचार केला आणि पूढच्या भेटीत या विषयाची पूर्ण माहिती घ्यायची आणि मगच पूढचे पाऊल टाकायचे असे ठरविले होते. पण काही केल्या तिचे मन नंदूला सोडायला तयार नव्हते. वाघाला एकदा माणसाच्या रक्ताची चटक लागली की तो वेडा पिसा होतो. तिच अवस्था नंदूची झाली होती आणि तिचीही. नंदू फारसा विचार करीत नव्हता. कुंदाचा होणारा स्पर्श त्याला वेडा करीत होता. आणि ती आता त्याच्या डोळ्या समोर येई नी त्याची झोप पार बिघडली होती. त्याला आपल्यात झालेला फरक जाणवत होता. ही फक्त ओढ आहे भोगासाठी हे त्याला कळत होते. त्यात प्रेम वगैरे काहीही नव्हते. फक्त भोगाची आहे. पण त्याच्या विरुद्ध कुंदाचे मन होते. तिची प्रेमाची भूक नंदु भागवील अशी खात्री झाली होती म्हणूनच ती दोघे ताणलेल्या रबरासारखी जवळ येण्याची वाट पहात होते.

यात तीन आठवडे गेले. कुंदालाही आता चैन पडत नव्हती. नंदू भेटतो ती एकमेव जागा म्हणजे लायब्रेरी. एक दिवस तो येईल या आशेने कुंदा दोन तास लायब्ररीत थांबून राहिली. तो काही फिरकला नाही. मग पून: दूसऱ्या दिवशी ती ५ वाजताच आली तो ६ वाजता आला. प्रथम तिने त्याला टाळण्याचे नाटक केले. पण तो तिच्यावर नजर ठेऊन होता आणि ती निघणार येवढ्यात नंदूने तिला हटकले.

"काय ? तू टाळतेस कां मला ?" नंदू

"नाही ! गेले दोन दिवस मी तुझी वाट पहातेय अडीच तास येऊन बसतेय लायब्ररीत !" कुंदा

" हो! हो! मीही तुझ्या पूर्वी, गेल्या आठवडयात दोनदा येऊन गेलो ! पण तुझी भेट झाली नाही. कुठे गेली होतीस! मला वेड लागायचे बाकी होते! असा दुरावा नसावा, असे नाही वाटत तुला !" नंदू

"हो ! माझीही अवस्था तशीच झाली होती. पण मी माझ्या मनाला आवर घालण्याचा प्रयत्न सतत करीत होते !" कुंदा.

''मग ! रहावेना ! आज कां ?'' नंदू

''हो ! म्हणून गेले दोन दिवस अडीच तास येऊन वाचनालयात थांबून होते!'' कुंदा.

''ओके ओके!'' नंदू

ती दोघे लायब्ररीतून खाली उतरली ती हातात हात घेऊनच खाली येताच–

''आपण कॉफी घ्यायची कां ?'' नंदू

''हो! या इथल्या हॉटेलात जाऊ !'' कुंदा

''नको ! तिथे ओळखणारी बरीच माणसे असतात उगाच बभ्रा नको ! कोठेतरी दूर जाऊ ! हवेतर आपण माटुंग्याला जाऊ! तेथे एका उडपीच्या हॉटेलात म्हणजे डी.पी.मध्ये छान वडे, इडली मिळते. आज तेथे जाऊया ! नंदु.

''ओके!'' कुंदा.

त्यांनी टॅक्सी केली आणि ती दोघे रूईया कॉलेज समोरच्या डी.पी. हॉटेलात आले. त्यांनी ठरविल्या प्रमाणे ऑर्डर दिली आणि वाट पहात बसले.

''मी काय म्हणते मला तुमच्या बद्दल काहीच म्हणजे कसलीच माहीती नाही. तुमचे नांव नंदू आहे, पण तुमचे आडनाव, गाव, घरी कोण, कोण आहेत या बद्दल जराही माहीती नाही. आपल्या दोघांमध्ये पारदर्शकता हवी. मग रडायची पाळी येऊ नये यासाठी !'' कुंदा.

''बरोबर आहे तुझे ! हे आपण पूर्वीच करायला हवे होते. ठिक आहे ती चूक आता सुधारता येईल ओके!'' नंदू. थोडा वेळ थांबून...

'' प्रथम तु तुझ्याबद्दल सांग ! '' कुंदा.

''ओके ! माझे नाव नंदू कामत. मी रायगडचा पाठपणाले गावचा ! गावात माझे आई वडील असतात, थोडी फार शेती आहे. माझे लग्न एका वेड्या मुलीशी झाले होते ती मला सोडून गेली. त्याला बरीच वर्षे झाली... अजून काय हवे ? बोल !'' नंदू.

''लग्न झाले होते म्हणजे ?''

''झाले होते. लहान वयात ! काही समजत नव्हते तेव्हा, ती फार वेडी मुलगी होती हे लग्नानंतर समजले. मी गाव सोडून मुंबईला आलो, त्यानंतर परत तिकडे फिरकलो नाही !'' नंदू.

''ती कोठे असते !'' कुंदा

''तिचे वडील तिला घेऊन गेले पूढचे काहीच माहिती नाही !'' नंदू.

''पूढे तिचे काय झाले ?''

''मला काही तिची माहिती नाही ! पण समजले तिला रत्नागीरीच्या वेड्याच्या हॉस्पीटलमधे ॲडमीट केले होते. पूढे तिचे काय झाले मला माहिती नाही !'' नंदू.

तेवढ्यात खाण्याचे पदार्थ आले. आज कुंदाचा कसलाच मुड नव्हता. तिचा चेहरा काळवंडला कसेतरी दोन घास खाऊन तिने इडली टाकली.

''आज तुझा मुड नाही कां ? तू अशी गप्पच कां आहेस ?'' नंदू

''काही नाही !'' कुंदा

''माझ्या लग्रा बद्दल मी बोललो म्हणून कां ? ते केव्हा तरी पूढे माहीत झाले असते, म्हणून सांगून टाकले !'' नंदु

''नाही, नाही ! तसे नाही. तूम्ही म्हणता तेही काही चूक नाही. ठीक, माझ्या मनातला संभ्रम आता काही अंशी दूर झाला आहे. एक ध्यानात ठेवा की, केव्हा तरी सत्य समोर येईल नी मागे फिरणे कठीण होईल. म्हणून ! कुंदा

''तुझेही काही चूकले नाही म्हणा ! ''नंदू

''चला आता निघू या !'' कुंदा

आज तिच्या मनात बदल झाले होते, आणि ते अधिकच गडद होत गेले मनात. आपण नंदूला टाळलेले बरें. शिवाय आजवर आपण त्याच्या पासून अंतर ठेऊन आहोत हेही बरे . पण तरीही तिच्या मनात निर्माण झालेली प्रेमाची भावना तिला पूढे रेटीत होती. आता तिच्या मनात निर्माण झालेला मोह तिला नंदुकडेच खेचून घेऊन जात होता. ध्यानी मनी तो तिला सतत दिसत होता.

त्या संभाषणात कुंदाने आपली काहीच माहीती नंदूला सांगीतली नव्हती. ती आपल्यावर गट्टू आहे हेच त्याला समजत होते. ती जाते कोठे ? तिच्या बद्दल जाणून घेण्याची त्याला गरज वाटली नाही. तो एक रांगडा पूरूष होता. भूकेने व्याकूळ होता शरीर सुखासाठी. तेच अंतिम धेय त्याचे होते. हे पाखरू आता आपल्या हातून सुटता कामा नाही असे त्याला वाटत होते. त्यासाठी तो सतर्क होता.

येवढ्यात मागची घडलेली घटना ही नुकतीच घडून गेली होती. अंकिताने मुलीला सोडली होती व ती पुन: भेटायलाही आली नाही. हेही त्याच्या पथ्यावर पडले होते. राहता राहीला मुलीचा प्रश्न हा कसा सोडवायचा याच विचारात

होता. सध्यातरी ती त्याच्या बरोबर काकांकडे रहात होती. पण समोर कुंदाचे प्रकरण पूढे सरकत जाईल आणि मग रंजनाची गोष्ट जर पुढे आली तर ? तो आज कमालीचा घाबरला होता. रंजनाला वेगळे कसे करावे याच विचारात तो होता. अंकीताबद्दल त्याला काहीच समजले नाही ना ती डोंबिवलीला कंपनीत आली ना ती त्याच्या काकांच्या घरी. तिने काहीतरी मार्ग पोटा-पाण्यासाठी स्वीकारला असेल. काय सांगावे तिनेही माझ्या सारखा कोणी यार शोधला असेल. नाहीतर ती आपल्या मुलीसाठी व्याकूळ झाली असती. गावातून काही माहिती घेतली असेल. पण गेले दोन महिने तिचा काहीही मागमुस नव्हता म्हणजे ती आपल्या मार्गाने गेली असाच समज नंदूने करून घेतला होता. पण तरीही तिचे भूत काही त्याच्या मानेवरून उतरायला तयार नव्हते नि रंजनाची अडचण त्याला सतावित होती. तो काही तरी संधी शोधीत होता, रंजना ११/१२ वर्षाची म्हणजे म्हटले तर ना समज होती. तिला कोठेतरी ढकलून द्यावे म्हणजे आपला मार्ग मोकळा होणार हेच फक्त तो जाणत होता. आणि तशी संधी शोधीत होता.

इकडे कुंदाच्या मना मधला शंकासुर काही स्वस्थ बसायला तयार नव्हता. नंदू जे काही म्हणाला यावर कुंदाचा विश्वास बसायला काही तयार नव्हता. त्याने जे सांगितले ते अर्ध सत्य असावे असे काहीतरी तिचे अंतरमन सांगत होते. पण प्रेम भावनानी भारलेली मन काही ते स्वीकारायला तयार नव्हते. अजून आपण फार पूढे न सरकता नंदूला भेटत रहायचे आणि सत्याचा शोध घ्यायचा प्रयत्न करायचा ती खरेतर त्याच्या प्रेमात पडली होती तर नंदू भोगासाठी हापापला होता. येवढे मात्र खरे. दोन धृवावर दोघे तडफडत होती. पण वास्तव त्याना दूर ढकलत होते.

जोपर्यंत रंजनाचा निकाल लागत नाही तोवर होता होई तो आपण कुंदाला झुलवत ठेवायचे. असे नंदूने ठरवले होते. त्यानंतर अनेक भेटी त्यांच्या झाल्या आणि कुंदाने अगदी सावध पावित्र्याने त्याचा स्पर्श टाळीत त्याला लांबच ठेवले.

''काय रे नंदू! तुझी पहिली बायको दिसायला कशी आहे? किती शिकलेय? !'' कुंदा

''आहे सुमार. म्हणजे तूझ्यासारखी सुंदर नाही. गावातले ध्यान कसे असेल त्याची कल्पना कर. खरेतर मला ती आवडलीच नव्हती. नव्हे घरच्या लोकांनी लग्ना आधी मला तिला भेटू दिले नाही. ना बोलू दिले, ती नऊ वारी नेसायची,

तो तरी बोलायची हे सारे मला माझे लग्न झाल्यावर कळाले. लोकापवाद टाळण्यासाठी मी तिला जवळ केली खरे. पण त्या येड्या ध्यानाने माझा हिरमोड केला नी त्यानंतर मी तिच्या जवळ गेलोच नाही.

''म्हणजे तिचा तुमचा संबंध आला कि नाही ?'' कुंदा

''आला ना ! पण मेलेल्या मढ्याशी व्यवहार करावा तसा, आणि मग मी सरळ मुंबईला आलो नी परत फिरकलोच नाही गावाला !

''हे सगळे खरे सांगतोस तू की माझ्या रुपावर भाळून तू सगळे सत्य सांगायला टाळतो आहेस ?'' कुंदा.

कुंदाच्या या पवित्र्याने मात्र नंदुची गाळण उडाली. काय बोलावे कळेना त्याची बोलतीच बंद झाली. त्याने पूढे बोलायचे टाळले.

''मी तुम्हाला दुखवायच्या उद्देशाने नाही बोलले. मला, मी असुरक्षित आहे तुमच्या पहिल्या लग्नामुळे असे वाटले . मी फसवली जाऊ नये आणि तुमचा जर प्रपंच तुम्ही बंद करून माझ्या नादाला लागण्याचा विचार असेल तर मला सावध रहायला हवे. तुम्ही कधीही एका ठिकाणी येण्याची शक्यता मला डावलता येईना आणि मी कोणाच्या संसारात 'चिखल' तर कालवित नाही ना ? अशी शंका माझ्या मनात आली. कारण त्याचे भोग मलाच भोगावे लागणार नाहीत कशावरून ? माझे मन मला सावध करीत आहे !''

अशी शंका कां यावी ? असे परत परत तिला वाटत होते म्हणून !.

''तूझे ही बरोबर आहे !, नंदू थोडा वेळ संभाषण थांबवीत.

''बर आपण कधी भेटायचे पून: दोन दिवसांनी माझे खाजगी काम आहे ते मी उद्याच मार्गी लावतो. मग आपण परवा भेटू! कदाचित दोन दिवसही लागतील पण आपण भेटू ते लायब्ररीतच ओके!'' नंदू.

''अरे हो! तू रहातेस कोठे हे तु मला काहीच सांगीतले नाही ! घरी कोण असते ? नाव, गाव सारे सांग मला !'' नंदू.

कुंदाने सारे सांगीतले. म्हणजे ही सडा फटींग आहे. रहायला स्वत:ची खोली आहे, म्हणजे हे पाखरू आपल्या सगळ्या समस्यांवर योग्य उपाय आहे. माझी रहायची व्यवस्था होईल आणि ती आवडते म्हणजे माझा जीव भांड्यात पडेल. आणि तो स्वप्न रंजनात रंगला. पण रंजनाची आठवण झाली आणि त्याचा चेहरा उतरला.

''का हो ! तुमचा चेहरा एकाएकी उतरला तो !'' कुंदा

''नाही बा ! तसे काही नाही !'' नंदू

पण कुंदाच्या मनात मात्र 'पाल' चुकचुकलीच 'काम मार्गी लावणार म्हणजे कसले? जेव्हा तरूण मने प्रेमात अडकतात त्यांचे कसलेच भान ठिकाणावर नसते. वहात जातात ती पूराच्या पाण्यासारखी. आणि त्या जोरात किनाऱ्यांना कसलीच किंम्मत नसते. म्हणजे आपल्या मनात येणाऱ्या विचारांना. अगदी तशीच अवस्था कुंदा आणि नंदूची झाली होती. त्याला अडसर होता तो मुलगी रंजनाचा त्याचे काय करावे याचाच विचार तो दोन दिवस करीत होता.

एक तर ती लहान आहे. मुंबईची कसलीच माहिती तिला नाही. आता ती आपल्या आईची आठवणही विसरली. नंदुने अंकिताचे दुसरे लग्न झाले असे सांगून अंकीता बद्दल तिच्या मनात विष पेरले होते. आता तर त्या बाल मनाला आई कधीच भेटणार नाही याची खात्री पटली होती. शिवाय नंदू आपल्या मुलीला खूष ठेवित होता. चॉकलेट, बिस्किटे देऊन. ती ही त्याच्या घरात खूष होती. तिला अशा ठिकाणी सोडावे कि तिला कोणी तरी सांभाळील, यांच विचाराने दुसऱ्या दिवशी एक दिवसाची रजा घेऊन तो रंजनाला घेऊन निघाला. त्याने अनेक बेवारस मुलांच्या संस्थेची पूर्वीच चौकशी केली होती म्हणून एकदा ती शक्यता चाचपून पहावी, यासाठी तो तिला घेऊन ४/५ संस्थात गेला पण रंजना एकजात तिथे रहायला तयार नव्हती.

आता काय करावे नंदूला समजेना. आपण तर कुंदाला २/३ दिवसात भेटू असे कबूल केले होते, मग भेट कशी होणार. आणि रंजनातर त्या दोघांमधे काटा होऊन बसली होती. तो काटा दूर केल्याशिवाय हे कुंदा प्रकरण मार्गी लागणार नाही हे नंदू ओळखीत होता. आणि त्यासाठी तो मार्ग शोधीत होता.

दुसऱ्या दिवशीही त्याने कंपनीत फोन करून तब्येत ठिक नाही असे कळविले आणि तो भांडुपला आला. त्याने एक रिक्षा केली आणि अंकिता ज्या संस्थेत होती त्या संस्थेच्या दारात आला.

''हे पहा रंजना मी पाच मिनिटात येतो. तोवर तू येथेच बसून रहा. मी तुला न्यायला येतो. मी माझ्या एका मित्राकडे जाऊन येतो. येथे छान गार्डन आहे तू येथे थांब बर ! '' नंदु.

आणि तो निघून गेला. तो पून: भांडूप स्टेशनवर येऊन त्याने परतीची गाडी धरली. त्यावेळी दुपारचे चार वाजले होते. आता रंजना मला शोधू शकणार नाही आणि त्या संस्थेने तिचे संगोपण केले तर जान सुटली. आपण आपल्या

कोवळ्या, ना समज मुलीच्या जीवाशी खेळत आहोत. असा विचार त्याच्या मनात आला पण कुंदाचा विचार समोर येताच ती भावना मावळली.

एक तास होऊन गेला, दोन तास झाले तरी आपले वडील येत नाहीत या चिंतेने तो चिमुकला जीव ओक्साबोक्सी रडू लागला. त्या आश्रमातल्या मुली बाहेर खेळायला आल्या त्यांनी रंजनाला त्या संस्थेच्या ऑफीसमध्ये घेऊन गेल्या.

''माई ! ही मुलगी बाहेर रडत होती. तिला तिच्या वडीलांनी आपल्या आश्रमाच्या दारात सोडली!'' मुली.

त्या संचालिकेने सारे जाणले. अशीच अनेक मुले आईबाप बेवारसपणे या संस्थेच्या दाराशी सोडतात. हा अनुभव काही पहिला नव्हता. त्यांनी तिला जवळ घेतले आणि मायेने तिची चौकशी केली व संस्थेत दाखल करून घेतले. तिला म्हणजे रंजनाला जेवढी माहीती होती ती तिने सांगितली पण त्यावरून काही त्यांना बोध होत नव्हता. ती गावचा, मुंबईचा रहायचा पत्ता सांगू शकली नाही. कदाचीत तिचा बाप येईल आणि घेऊन जाईल अशीही शक्यता होती, पण कोणीही फिरकले नाही. त्यांनी तिला कपडे दिले आणि समवयस्क मुलींबरोबर तिची रहाण्याची व्यवस्था केली.

त्या संस्थेचा परिसर जवळजवळ २५ एकराचा होता. त्यात वयस्कर, परित्यक्ता स्त्रिया, लहान मुले व समंजस मुले तीही फक्त मुलीच. अशी योजना होती. यासंस्थेला महाराष्ट्र सरकार कडून अनुदान मिळे. मोफत धान्य मिळे. मुले शाळेत जात त्यांना पुस्तके वह्या इ. पुरवले जाई. रंजना तशी हुशार होती. त्यांची एक शाळा त्या संस्थेच्या आवारातच होती त्यामुळे मुलांना बाहेर जाता येत नव्हते. तेव्हा ती मुले सुरक्षित होती. त्या संस्थे मार्फत वह्या तयार करणे, दिवाळीचे पदार्थ, कंदील तयार करणे इ. उद्योगही चालवले जात तरूण मुलीना संसाराचे, जेवणाचे सारे शिक्षण दिले जाई शिवाय त्यांची लग्नेही जमविली जात.

याच संस्थेत कुंदा होती पण चार दिवसापूर्वी तिला बी.एम.सी.च्या शाळेत शिक्षीकेची नोकरी मिळाली आणि ती निघून गेली. तिची पोष्टींग दादरच्या बी.एम.सी. शाळेमधे झाली होती. शाळा दुपारची असे साडे पाच वाजता शाळा सुटली की कुंदा लायब्ररीत येत असे व नंदूशी ठरल्या प्रमाणे भेट होत असे. पूर्वी जशी ती चौखूर उधळली होती तशी ती आता वहात जात नव्हती. आता तिला पगारही चांगला मिळणार होता. आता पूढे सगळे छान होणार याची तिला खात्री

होती. ही संस्था सोडताना कुंदा अंकीताला भेटून गेली व केव्हा आलीस तर जरूर भेट, असे सांगून गेली. पण अंकीताला जराही वेळ नसे. म्हणजे १२ तास काम. आता तर तिला वयस्क लोकांच्या विभागात काम देण्यात आले होते. त्यांचे जेवण, कपडे धुणे, आजारपण सारेच तिला बघावे लागत असे. त्या कामात ती स्वतः खूष होती, त्या सगळ्या वयस्कांच्या सोबतीने तिचा दिवस छान जाई त्या सगळ्या वयस्क स्त्रिया आपल्या आईच आहेत असे अंकीताला वाटत होते. ती आपल्या कामात खूष होती. आता ती संस्था तिची सगळी काळजी घेत असे. खाण्यापिण्याची, कपड्या-लत्याची आणि रहाण्याची तिला एक १०X १० ची खोलीही दिली गेली होती. छान दिवस जाई तिचा. पण अनेक वेळा रात्री अंथरूणात पडल्यावर तिला आठवण येई ती रंजनाची. आणि आसवांचा डोह होई डोळ्यात. ती डोळे पूसायची पण ती रंजनाला मात्र विसरायला तयार नव्हती, ती कोठेही असु दे. ती सुखी रहावी. असे तिला वाटत होते. रंजनाचा एक फोटो तिने मोठा करून आपल्या खोलीत लावला होता. मी तिला जन्म दिलाय, अंगावर पाजले. ते माझ्या मायेचे पाखरू आहे. कधी भेटेल देव जाणे. आणि तिचे डोळे पाणावत तो फोटो पाहिल्यावर नवऱ्याची म्हणजे नंदुची मात्र आठवण आता तिच्या मनातून पुसून टाकली होती तिने. तो परत केव्हा भेटूच नये असे तिला वाटायचे. कारण तसेच होते त्याने तिला परित्याक्ता बनविले म्हणून. अंकीता आता पहिल्या सारखी गावंढळ राहिली नव्हती. तब्येतीने ती छान झाली होती. आता तिचा रंगही बदलला होता आणि सगळ्या कामात ती तरबेज झाली होती. आता ती सहावारी नेसायची आणि छान कुंकू लावायची, ते ध्यान कोणालाही पहावेसे वाटे. आणि गळ्यात लहानसे मंगळसुत्र, फक्त नावाला लोकांच्या नजरा टाळायला.

त्या संस्थेत एक एक वर्षानी त्यांच्या बदल्या होत. त्याच्या कामाची पद्धत, चांगुलपणा, मुलांबद्दलची आस्ता, प्रेम यावर त्यांची नेमणूक वेगवेगळ्या विभागात होई. तिला (अंकीताला) आता एक वर्ष पूर्ण होत आले होते. सहजीकच तिची बदली वेगळ्या विभागात होणार होती. पण मला याच सर्व वयस्क महिलांची सेवा करायला आवडते म्हणून तिनेच संचालिकेला सांगीतले माझी बदली करू नका. पण नियम म्हणजे नियम. अंकीताची बसली लहान मुलांच्या विभागात झाली. ती गावातून आलेली लहान मुलांची काळजी कशी घ्यायची हे तिला तिथल्या अगोदरच्या महिलांनी शिकवले. व तिनेही ते काम

चांगले शिकूण घेतले. तेथे ती खूप चांगले काम करीत होती. लहान मुले त्यांना आंघोळ, भरवणे, डायपर बदलणे, झोपवणे ही सगळी कामे तिला करावी लागत होती.

अंकिताला तिच्या लहान मुलांच्या विभागात जाताना ऑफीस समोरून जावे लागे. त्या आश्रमात एक प्रथा होती. जी मुले नव्याने येतात त्यांचे फोटो काढून ते फलकावर लावले जात. अंकीताला ते खरेतर बघण्याची गरज नव्हती. आज अचानक तिची नजर त्या फळ्यावर गेली. रंजनासारख्या दिसणाऱ्या मुलीचा फोटो पाहून ती चक्रावली. तिचे दुसरे मन सांगत होते ती कशाला येथे येईल. तिला तर तिचा बाप घेऊन गेला. मग ही मुलगी कोण. पुनः ती संध्याकाळी घरी जाताना त्याच मार्गाने परतली आणि तिने पुनः तो फोटो न्याहाळला. खाली 'रंजना' असे नाव लिहीले होते. ती तिचीच मुलगी होती. पण ही येथे कशी पोहचली कि ती हरवली म्हणून कोणी येथे आणून सोडली. की बापानेच ही ब्याद सांभाळता येत नाही म्हणून आणून सोडली? त्या रात्री तिला जराही झोप लागली नाही. पण एक गोष्ट चांगली झाली की केली की ती आता येथे सुरक्षित आहे. येवढे खरे आणि आता तिला मी भेटू शकते.

पण तिथले नियम कडक होते. कोणाही परिचारीकेला नेहमीच्या परिचारिकां व्यतिरिक्त कोणालाही त्या विभागात प्रवेश नव्हता. मग ती जाणार तरी कशी? पण ती रहात होती त्या क्वॉर्टरमध्ये संगिता नावाची परिचारीका तिच्या बाजूच्या रुम मधे रहात होती. तिने, या मुलीवर लक्ष ठेव. ती माझी नातेवाईकच आहे असे सांगितले. आणि तेव्हाच तिला आज छान झोप लागली आणि नंदू बद्दल कमालीची घृणा निर्माण झाली. याला झेपणारे नव्हते तर लग्न कां केले. ही मुलगी त्याची तिही त्याला पोसता येत नाही की तो कोणा बाई मध्ये अडकला आहे? की तिची अडचण नको म्हणून तिला येथे आणून सोडली. अनेक शंका-कुशंकानी तिच्या मनात थैमान मांडले होते. आणि रंजनाला भेटावे असे तिचे मन सारखे तिला सांगत होते.

रंजनाची व्यवस्था या नव्या मार्गाने लावल्यावर तो घरी जेथे रहात होता तेथे आला. घरच्यानी विचारले ती मुलगी कुठे आहे? तेव्हा त्याने त्यांना थातूर माथूर उत्तर देऊन गुंडाळले. आता आपण कुंदाला गुंडाळण्याच्या मार्गाला लागायचे हे त्याने ठरवले व तो कामाला लागला.

दोन दिवसानी तो पुस्तक बदलण्याच्या इराद्याने वाचनालयात आला. कुंदा

अजून आली नव्हती. पण आज भेटायचे हे त्या दोघांनी अगोदरच ठेरविले होते. तो तिची वाट पहात होता. तो मंथ एन्ड होता. पगाराचा दिवस तेव्हा पगार हातात मिळे. म्हणून तिला वेळ झाला. वाचनालय ६ वाजता बंद झाले तरीही कुंदा आली नव्हती, म्हणून खाली उतरुन तो चहाच्या टपरीच्या बाकड्यावर बसला. एक कटींग घेतली आणि तो तिची वाट पहात होता. ती घाई घाईने टॅक्सीने येताना त्याने पातिली आणि तो उठला. ती टॅक्सीतून उतरणार येवढ्यात–

''थांब ! हीच टॅक्सी घेऊन आपण हॉटेलमध्ये जाऊ. तू आत बैस म्हणत नंदूने टॅक्सीवाल्याला रुईया कॉलेज कडे टॅक्सी घेण्यास सांगीतले.

''मला वाटले की तू येणार आहेस की नाही, माझे मन मलाच कोसत होते. अजून थोडा वेळ वाट पहावी आणि घरी परतावे असा विचार मी करीत होतो!'' नंदू.

''मला खात्री होती मला उशीर झाला तरी तुम्ही थांबालच. आज आमचा पगाराचा दिवस. पहिलाच हा माझा पगार. म्हणून वेळ झाला. पण आजचे बिल मीच देणार हं !'' कुंदा.

''ओके ! ओके ! चालेल. मग काय मागवू या, आज आपण मीनी लंच मागवू या. म्हणजे घरी जाऊन काही करण्याची गरज पडणार नाही !'' कुंदा.

''म्हणजे! तू एकटीच रहातेस ? '' नंदू.

''हो ! ही माझ्या वडीलांची जागा, ते आता गावाला असतात. आणि मी येथे एकटी. आता माझे शिक्षण मी पूर्ण केले आहे. नोकरीही लागली आहे. ही जागा माझ्या वडीलांनी माझ्या नावांवर केली आहे !'' कुंदा.

''वा छान ! एका जीवासाठी काय ?''

''हो !'' कुंदा.

आणि त्याचे डिनर मीनी लंच आले त्यांनी कोपऱ्यातला गेल्या वेळचाच टेबल पकडला होता. नंदूने आजूबाजूला पाहिले आणि पुरीचा एक घास कुंदाला भरवला. ती कमालीची लाजली आणि तिनेही नंदूला घास भरवला. आज दोघे आनंदात जेवत होते.

''ते तुमचे खाजगी काम तुम्ही केलेत कां ?''

''हो ! आणि त्याला ठसला लागला.

''काय झाले ?'' कुंदा.

''काही नाही ! माझे काम मी करून आलो. कालच. आता मोकळा झालो

आहे !'' नंदू.

''येवढे कसले महत्वाचे काम होते ? '' कुंदा.

''खाजगी होते !'' नंदू

''मला नाही सांगता येणार कां ?'' कुंदा

''नोकरीचे ! मी चांगली नोकरी शोधतोय त्या साठी ठाण्याला गेलो होतो!'' नंदू.

नंदूच्या अडखळत सांगण्यावरून तिच्या मनात विचार येऊन गेला, हा काही खरे बोलत नाही.

''माझी शपथ घे !'' कुंदा.

''नको !'' तो

''कां नको ?''

जाऊ दे ना नोकरी मिळाल्यावर कळेलच. फायर स्टोनमध्ये ठाण्याच्या.

कुंदाने विश्वास ठेवला असा भास नंदूला झाला. पण ती एक शिक्षीका होती. मानसशास्त्राचा चांगला अभ्यास तिचा होता. काहीतरी काळे बेरे नक्कीच आहे. हे तिने जाणले. पण, मग तो विषय सोडून दिला.

येवढ्यात जेवणे झाली. आणि ठरल्या प्रमाणे ते बिल कुंदानेच दिले. ते दोघे बाहेर आली.

''आता खूप उशीर झाला आहे. आपण टॅक्सीनेच जाऊ. तुला सोडून मी घरी जायचे म्हणतो !'' नंदू.

''चालेल की! '' कुंदा.

ती दोघे टॅक्सीत बसली अगदी एकमेकांना खेटून. आणि रोमांस सुरू झाला. रात्रीची वेळ. त्यांनी एकमेकांना मिठी मारली आणि ती सोडली जेव्हा ते सनमिल गल्लीत आले तेव्हाच. आज दोघेही मोहरली होती.

''ही माझी बिल्डींग पहिल्या माळ्यावर मी रहाते.''

''मग तुम्ही असे का करीत नाही. दोन मिनीट माझ्याकडे थांबूनच आपल्या घरी जा!'' कुंदा.

''हो चालेल !'' नंदु

तो याच संधीची वाट पहात होता तिच्या घरापर्यंत पोहोचण्याचा आणि ही संधी चालून आली आपसुकच.

ती जिन्याने चालत घरी आली. तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. घरी येताच

तिने त्याला थंड पाणी दिले.

"चहा घेणार कां ?"

"नको ! ही काही चहाची वेळ आहे ?" नंदू.

"बर! तुम्ही या पून: केव्हातरी भेटू !" कुंदा.

" ओके ! म्हणत तो बाहेर पडला. आता बरेचसे लोक जेवून बाहेर पडले होते. तो गेला पण शेजाऱ्यांचे डोळे दिपले. काही तरी भानगड नक्की आहे ! असा वास त्यांना लागला. त्यांची टकमक नंतर तिनेही पाहिली. पण आता हे होणेच आहे म्हणून तिने ही ते टाळले.

"बऱ्याच दिवसानी त्यांना एकमेकांचा स्पर्श झाला आणि मोहरून गेली होती ती दोघे आता तर स्वप्नांच्या रांगोळ्या दोघांच्याही मनात फेर धरीत होत्या.

आज शनिवार, आणि शिवाय रजा तेव्हा आपण कोठे तरी दूर फिरायला जाऊ. असे नंदूने कुंदाला सांगीतले आणि ती ही शनिवारची वाट पहात होती. सकाळी आपण लोअर परळ स्टेशनवर एक नं. प्लाटफार्म वर भेटायचे आणि ८.४० ची विरार पकडायची असा सारा बेत ठरला होता.

कुंदा सकाळीच वेळेवर स्टेशनवर पोहचली आणि ८.४० ची विरार पकडून निघाले. पण नक्की कोठे जायचे काही नक्की होत नव्हते. शेवटी ते वसईला उतरले आणि तेथे एका रीसॉर्टवर जावे, जमल्यास आजची रात्र तेथेच रहावे आणि उद्या दुपारनंतर निघावे असे ठरविले त्यांनी. या एका दिवसात आपल्याला खूप काही बोलायला मिळेल. एकमेकांच्या विचारांची देवाण घेवाण होईल आणि, म्हणून कुंदाने त्याला होकार दिला. तशी ती सावध होतीच. शक्य तो आपण नंदू पासून लांब रहायचे. खाणे पिणे करायचे पण आपण नंदूच्या आहारी जायचे नाही, हे कुंदाने मनापासून ठरविले होते. सकाळी ११ वाजता ते (गुलमोहर) रीसॉर्टवर पोहोचले. छान जागा होती. दोघांनी रेन डांन्स केला व एक रूप होऊन कपडे बदलले. मग, जेवण, दुपारी थोडी झोप. खरेतर रेन डान्सचा पहिलाच अनुभव कुंदाचा होता. आणि नंदु चाही. अगोदरच्या कोणत्याही रीसॉर्टवर ही व्यवस्था नव्हती.

त्या रुममधें दोन बेड होते. आणि तेव्हा दोघांनाही वेगवेगळे झोपण्याची सोय होती. तो रुम सेल्फ कंटेट होता. शिवाय ए.सी. होता. दुपारी दोघांनाही छान झोप लागली. संध्याकाळी जेवणापूर्वी लाईट शो होता तो त्या दोघांनी पाहिला आणि जेवून दोघे रुमवर आले.

''आपण असे करूया कां?'' नंदू.

''कसे?'' कुंदा

''ह्या दोन कॉट जवळ जवळ घेऊ या म्हणजे बोलताही येईल, पण, थोडे अंतर ठेवायचे!'' नंदू

''चालेल नां !'' कुंदा

पण नंदुची चाल तिच्या ध्यानात नाही आली. नंदूने ती वॉशरूमला गेल्यावर लाईट मंद केली. आणि दोन्ही कॉट एकमेकांना भिडवले ततपुर्वी त्याने एक झोपेची गोळी कुंदाच्या पाण्याच्या ग्लासात टाकली. हे कुंदाच्या ध्यानात आले नाही तेव्हा रात्रीचे ११ वाजले होते. डोळ्यावर झोपेचा कैफ होता. तिला पडल्या पडल्या झोप लागली. नंदु मात्र जागाच होता. त्याने ती झोपेत असताना जवळ ओढले आणि मिठीत घेतले. तीचे शरीर तसे थंडच होते. पण नंदू पेटला होता. कुंदाला काही केल्या जाग येत नव्हती. त्या गोळीचा असर खूपच झाला होता. आणि त्या काळोख्या रात्री नंदूने आपली पाशवीपणाची इच्छा पूरी केली. बेसावध असताना.

सकाळी हे कुंदाच्या ध्यानात आले नंदूला तिने खूप शिव्याशाप दिल्या, लाथाडला. आणि कपडे करून ती खाली उतरली नी रिक्षा करून ती वसई स्टेशनला आली. ती आता स्वत:लाच दोष देत होती. या माणसाची पारख करायला मी विसरले नाही कमी पडले. आणि आज आयुष्याचे नुकसान झाले. पवित्रपणाची ही खिलवाड तिच्या जिव्हारी लागली. आणि ती पुढचा एक महिना त्याला टाळीत राहीली. त्याला तिने घरी तीला भेटण्याचीही बंदी केली. ती गेला महिनाभर वाचनालयात गेली नाही.

महिना होऊन गेला होता. आणि कुंदाच्या मनात एक अनामिक भिती वाटत होती तेच झाले. वेड लागायचेच बाकी होते. तिची पाळी चुकली होती. त्या अमानुष नंदूच्या कृत्याने कुंदाचे सगळे आयुष्यच नासून गेले होते. शरीर अपवित्र झाले आहे. आपण आजवर जे जपले ते सगळे गमावले, असे वाटून पूढचे चार दिवस ती शाळेतही गेली नाही. वा घरातून बाहेर पडलीही नाही. एक अनामिक भितीने ती ग्रासली होती. नंदू हा बदमाश आहे. त्याच्यावर विश्वास ठेऊन मी वहात गेले आणि स्वत:च्याच हाताने आपले वाटोळे करून घेतले. आज त्याच्या बलात्कारी कृत्याने त्याचा कोंब आपल्या शरीरात आकाराला येत आहे. याचे आपण काय करावे हे कुंदाला काही कळेना. आजू बाजूला असे

कोणी विश्वासाचे मायेचे नाही. की त्याला आपण विचारावे. शिवाय आपला हा मुर्खपणा कसा सांगावा कुणाला. लोक काय म्हणतील. आपला बभ्रा होईल आणि उभे आयुष्य नासून जाईल. कोणी लग्नाला तयार होणार नाही. माझ्या आयुष्याची जी काही खिलवाड झाली ती माझी घोडचूकच. पण आता यातून बाहेर कसे पडावे हेच तिला कळत नव्हते. पण, आता गप्प बसून चालणार नाही हे ही तिने ताडले होते. हॉस्पिटलला जाऊन हा जीव साफ करावा तर त्याचा दोष तो काय ? पोलीस येतील बलात्काराची चौकशी करतील. नंदू गजा आड जाईल आणि पेपर, टीव्हीवर बदनामी यालाच ती पुरती घाबरून गेली होती. काय कारावे हे तिला कळेना. आता खरे तर तिची जीवाभावाची मैत्रीण अंकीता जिला तिने नोकरीला लावले होते. तिला आपण बोलावून घ्यावे असे तिला वाटले. तिच एक विश्वासाची आहे आणि मला मदत करू शकेल एवढाच विश्वास तिच्या मनात होता. आणि म्हणून तिने अंकिताला फोन केला तिने येण्याचे कबूल केले. अंकीताने संचालिकेकडून कुंदाकडे जातो आहे सांगून तशी परवानगी घेतली.

दुसरा दिवस रविवार होता. अंकीता १० वाजता तिच्या घरी पोहोचली. कुंदाने घडलेला सगळा वृतांत अंकीताला सांगितिला.

"कोण हा नराधम, सांग ?"

बराच वेळ विचार करूनही त्या नराधमाचे नाव तिच्या ओठावर येईना. बराच वेळ आपला चेहरा हाताने झाकून घेऊन ती पडून राहिली.

"तुला कॉफी करून देऊ कां ! तू त्या नराधमाचे नाव मला नको सांगू. पण, तू हा गाढवपणा केलास याला तूच जबाबदार आहेस. तू त्या नराधमाच्या मनातला डाव कसा ओळखू शकली नाहीस. तो बरेच दिवस उपाशी असणार. आणि म्हणून तो या थराला गेला. तूझ्या वेडीच्या, एका शिकलेल्या मुलीच्या ध्यानी हे येत नाही कसे ? आता हे निस्तरणार नाही. हे ओझे आता तूलाच वहावे लागणार आहे जसे मी वाहीले !" अंकिता.

अंकीताचे हे बोल ऐकून ती चरकली. म्हणजे आता त्या नराधमाचे हे पाप मलाच वहावे लागेल. आता भेटून हे सांगण्या शिवाय दुसरा उपाय नव्हता. पण तो ही हे स्वीकारेल कां? कां हात वर करील? या आणि अशा अनेक शंका तिच्या मनाला स्पर्शून गेल्या.

थोडा वेळ थांबून अंकिताने त्याचे नांव तिला विचारले, "सांग त्या

नराधमाचे नांव सांग किंवा त्याचा फोटो तरी दाखव मला, कुंदा तूला ऐकायला येतेय ना... तूझा माझ्यावर विश्वास आहे ना ?'' अंकीता .

''हो आहे ! सांगते ! आणि फोटोही दाखवते त्याचा. माझ्या मोबाईल मधे आहे !... अंकीता त्या नराधमाचे नांव 'नंदू सामंत' ! हा त्याचा फोटो ! कुंदा. ''काय सांगतेस काय ?'' आणि अंकीताला हुंदका फूटला. तिने तिचे तोंड झाकून घेतले नी... ती तशीच निघून गेली, ती जाताना कुंदा तिला पहात राहिली न बोलता तिने असे कां जावे. याचे कोडे तिला उमगले नाही. आणि कुंदाला रडू फूटले. हमसुन हमसुन तिने दुःख अश्रूंनी धुवून टाकले आणि आता पाय रोऊन ही तिची बेसावधतेत घडलेली चूक निस्तरायला ती तयार झाली. जसे राखेतून उभे राहते शिल्प जीवंत होऊन. आता तसे केल्या शिवाय या दिव्यातून बाहेर पडता येणार नाही... हे ओळखून तिने आपले मन घट्ट केले. आणि तिने उद्या वाचनालयात जाऊन त्याची वाट पहावी असे ठरवले. त्याचा फोन नं. तिच्या जवळ नव्हता. तेव्हा दुसरा कोणताही संपर्काचा उपाय नव्हता. मग सलग तीन दिवस ती संध्याकाळी ५ ते ७ पर्यंत वाचनालयात येऊन थांबत होती.

आणि एक दिवस तो साडे सहा वाजता येताना कुंदाने त्याला पाहिले आणि आवेशाने त्याच्या शर्टाची बाही पकडली आणि त्याला बेसावध असताना खाली पाडले. हे पाहून आजू बाजूची माणसे जमा झाली. तो प्रकार पाहून नंदूही पार घाबरून गेला.

''चल उठ ! बोल तू का मला फसवीलेस ? आज तुझ्या कृत्याचे भोग मी भोगत आहे. नाहीतर तूला पोलीसांच्या हवाली करते ! बोल !'' कुंदा.

नंदू कमालीचा घाबरला होता. तेवढ्यात आजूबाजूच्या लोकांनीही त्याला बडव बडव बडवला, पार वाट लाऊन टाकली त्याच्या कपड्यांची.....

मग कुंदाने त्याला तसाच उभा केला.

''सोडा त्याला, मीच त्याची आता जीरवते ! म्हणत कुंदाने त्याला टॅक्सीत घातला नी भोईवाडा पोलीस स्टेशनच्या समोर टॅक्सी उभी केली.

''माझ्याकडे सगळा पुरावा आहे ! मी तुला आता सोडणार नाही ! तुझे पोर माझ्या पोटात वाढते आहे. याचे काय करायचे ? कि जाऊ पोलीसांकडे सांग ?'' कुंदा

''मी तुला फसवले नाही ! माझे तुझ्यावर प्रेम आहे ! कुंदा माझे तुझ्यावर प्रेम आहे !'' नंदू.

''प्रेम ? असे पाशवी ! फसवलेस तू मला. माझ्या पाण्यात झोपेची गोळी टाकून, मी झोपेत असताना हे घाणेरडे काम केलेस ! तुला लग्ना पर्यंत थांबता येत नव्हते ? बोल!'' कुंदा

नंदू कमालीचा घाबरला होता. उद्या ही ते पोट पाडून टाकील पण आपण मात्र तुरूंगाच्या चार भिंतीत सडत राहू. हे त्याने ओळखले.

''मी तुझ्याशी उद्याच लग्न करतो !'' असे म्हणत त्याने तिचे पाय धरले.

''तू आता घरी जा ! उद्या पार्ल्याला जाऊन आपण वैदीक पध्दतीने विवाह करू ! देवा शप्पथ खरे तेच सांगतोय ! माझ्यावर विश्वास ठेव. आता मला माझ्या घरी सोड समजली ! आणि उद्या मी तुला न्यायला येईन ! '' नंदू

''नको तू पार्ल्याला पोच स्टेशन समोर मी तुला तेथे भेटते आणि आपण लग्न करू ! जर तू मला फसवलेस तर तुझी धडगत नाही ! हे ध्यानात ठेव ?'' कुंदा.

त्याच टॅक्सीने कुंदाने त्याला त्याच्या घरी महालक्ष्मीला सोडले आणि ती निघून गेली. रात्रभर ती फक्त विचार करीत बसली. मला आज कोठून ऐवढे धैर्य आले ? आणि नंदूचा पूरता खूळखूला करून टाकला. आता त्याच्याशी लग्न करायचे आणि पाळीव प्राण्या प्रमाणे त्याच्या गळ्यात पट्टा बांधून खेळवायचे.

आज ती थोडे पिटले-भात करून जेवली. जेवण करण्याचे त्राण आज तिच्यात नव्हते. आणि ती कॉटवर पडली, तिचा डोळा लागला, कारण सकाळी अंकीताने तिला सुनावले होते नी संध्याकाळची नंदूची धुलाई. पण रात्री तिला जाग आली.....

काल नंदूचे नांव ऐकल्यावर आणि त्याचा मोबाईल मधला फोटो पाहिल्यावर अंकीताला का रडू आले ? आणि ती जे पोटतिडकीने बोलली याचा बोध कुंदाला होत नव्हता. पण नक्कीच यामागे काहीतरी गौडबंगाल आहे, येवढे कुंदाने जाणले होते. काहीतरी संबंध असावा ''तो बऱ्याच दिवसांचा भुकेला असणार !'' हे वाक्य तिच्या जिव्हारी लागले. गेले वर्षभर आपण नंदूशी जवळीक करीत होतो. पण, सावधपणे. मी माझी काळजी घेत होते. आहारी न जाता. पण, त्याला जे हवे ते आपण करू देत नाही म्हणून, म्हणून त्याने असा डाव साधला. हे ही तिच्या ध्यानी आले आपण प्रेम केले त्याच्यावर आणि लग्नही करणार होतो. पण असा काही प्रसंग आपल्यावर येईल हे तिच्या ध्यानात आले नव्हते.

रात्री झोपण्यापूर्वी पून: पून: तिला अंकीताचा चेहरा समोर येत होता. की नंदुचे नांव नी फोटो पाहील्यावर तिचा गोरामोरा झालेला चेहरा पाहून ती चरकली. याचा काही संबंध अंकीताशी असावा कां? कि ती त्याला ओळखीत असावी? सारेच प्रश्न अधांतरी राहिले. सकाळी लवकर उठायचे होते म्हणून तिने अर्लाम लावला नी झोपली.

ती पार्ले स्टेशनवर आली. तिने इंटरनेटवरून तिथल्या एका वैदीक पध्दतीने लग्न लावणाऱ्या संस्थेच्या संचालकांना फोन करून ११ वाजताची वेळ घेतली होती. कुंदा तेथे १० वाजताच पोहोचली. थोड्या वेळाने नंदूही आला येताना त्याने त्याच्या एका मित्राला सोबत आणला होता. कुंदा अंकीताला बोलावणार होती. पण परवाच्या तिच्या अचानक जाण्याने ती येणार नाही असे समजून कोणालाही बरोबर आणले नाही, पण येताना आपले रेशन कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक कार्ड आणि सोबत एक झेरॉक्स आणले होते. पण नंदूने काहीच आणले नव्हते. पण, कंपनीने दिलेले आय कार्ड त्याने आणले होते. विवाह संस्थेने त्यांच्या कडून एका १०० रू.च्या स्टॅम्प पेपर वर हवा तो मजकूर लिहीला त्यावर नंदूची सही व विटनेस म्हणून त्याच्या मित्राची सही तसेच कुंदा व स्वत:ची सही त्या संचालकाने केली.

''मला हे करावे लागले कारण बरेच पुरूष मुलींशी लग्न करतात. येताना डॉक्यूमेंट आणित नाहीत आणि मजा करून आठवड्याने त्या पोरीला वाऱ्यावर सोडतात, माझा अनुभव आहे. म्हणून हे सगळे उपचार जबाबदारीने करावे लागतात. आता बघा या मुलीने सगळे पेपर आणले. तूम्ही कां नाही ?'' विवाह संचालक.

''माझे रेशन कार्ड नाही, ना इलेक्शन कार्ड, ना पॅन कार्ड, मी रहातो एका नातेवाईकाकडे !'' नंदू

''मग त्यांना कां नाही आणले ! कि सारा बनाव तर नाही ना ? ओ विटनेस, तुमचे काही ओळख पत्र आहे कां ?''

''आहे! मी ते पॅन कार्ड मी देतो शिवाय मी जेथे काम करतो त्या कंपनीने दिलेले 'आय कार्ड' आपण याची झेरॉक्स घ्यावी ! '' विटनेस साळवी.

सारे सोपस्कार करून त्यांनी रितसर वैदीक पध्दतीने लग्न लावले. लग्नाला उपस्थित एकच त्याचा मित्र. साळवी. त्यांनी एकमेकांना हार घातले. सप्तपदी झाली. आणि लग्नाचा बाजार आटोपला. तत् पूर्वी या संचालकाने त्यांचे फोटो

काढून आपल्या रेकॉर्ड मधें ठेवले. शिवाय लग्न रजिस्टर्ड करण्याचा फार्म भरून तो ओल्ड कस्टम हाऊसला पाठविण्यासाठी ठेवला व आठवड्याने येऊन रजिस्ट्रेशन झाल्याची कॉपी घेऊन जायला सांगितली.

''मी स्वत: येऊन तो फार्म घेईन. यांना देऊ नका. मला माझी सुरक्षितता महत्वाची वाटते म्हणून !'' कुंदा.

''असे कां ?'' संचालक.

''कारण मी एक स्त्री आहे. माझे भवितव्य सुरक्षीत असावे असे मला वाटते म्हणून या पुरुषांचा काही नेम नाही ! '' कुंदा.

एक कटाक्ष नंदू कडे टाकीत ती बोलली. तो खाली मान घालून उभा होता. वर मान करून न बघताच...

''चला ! आपण निघू या ! '' नंदू.

''एक ध्यानात ठेवा. माझ्याकडे सगळे रेकॉर्ड आहे. भारताच्या कुठल्याही कोपऱ्यात गेला तरी शोधून काढीन, मी एक निवृत पोलीस अधीकारी आहे हे ध्यानात ठेवा !'' संचालक

आणि ते सर्वजण निघाले. त्यावेळी जेवणाची वेळ झाली होती. पार्ल्याच्या 'विशाल' हॉटेलात त्यांनी जेवण घेतले व ते निघणार येवढ्यात

''तुमचे नांव साळवी कां ? कोठे रहाता तुम्ही ? तुमचा पत्ता, फोन आणि तुमच्या कंपनीचे आय कार्ड ची कॉपी मला द्या, असे पैशाला पाचशे विटनेस मिळतात हो! तुमचे नांव यांच्या तोंडून मी गेल्या वर्ष भरात कधीही ऐकले नव्हते. आपण कोण? कुठले मी जाणत नाही. मी यांना पोलीस जेल मधे न टाकता लग्न केले कां? माहीती आहे. माझ्या पोटात वाढणाऱ्या यांच्या मुलासाठी, बापाचे नांव ते मुल लावील. पण, तो बापही गुणवान हवा की नाही? हो ना ?'' कुंदा.

तो साळवीही टरकला. साला उगाच या लफड्याच्या केस मध्ये माझा बळी जायचा तर काय लफडा झाला तर ! त्याने त्याच्या डॉक्युमेंटचे पेपर दिले. कुंदाने त्या संचालकाने केलेली ॲफीडेव्हीडची कॉपी आपल्याकडे घेतली. आपल्या बँकेच्या लॉकरमधे सुरक्षीत ठेवली.

आणि ते निघाले, घरी जायला पार्ले स्टेशनवर त्यांनी धीमी गाडी चर्चगेटची पकडली आणि निघाले. आज त्यांचे लग्न झाले आहे असा एकही पूरावा नव्हाता. तिच्या गळयात काळ्या मण्यांचे एक खोटे मंगळसुत्र मात्र तिने घातले.

ते तिने येताना आणले होते.

आपले लग्न होणार आहे. तेव्हा एखादे मंगळसुत्र तरी नंदूने आणायला पाहीजे होते. पण, तेवढाही सेन्स त्याला नसावा, प्रेम करायला, फिरायला, मजा मारायला सगळे जमते... पण ! कुंदाच्या मनात सारे विचार पिंगा घालीत होते. साळवी दादरला उतरला पण, तत् पूर्वी.....

''मी उदया तुमच्या घरी येणार आहे !'' खरच तुम्ही कुटुंबवत्सल आहात की उनाड पप्पू यांच्यासारखे हे पहायचे आहे. सकाळी १० वाजता येते यांना घेऊन म्हणजे तुमच्या मैत्रीचीही शहानिशा होईल. अन्यथा उद्या दोघांनाही पोलीस स्टेशन दाखवीन हे ध्यानात ठेवा !'' कुंदा.

आजच्या कुंदाच्या अवताराने साळवी आणि नंदूही टरकला. ती असे भवानीचे रुप दाखवील असे त्याला वाटले नव्हते. तोही पार हबकला होता. त्याची नशा पार उतरली होती. आता आपण काही सुटत नाही हिच्या कचाट्यातून ही आता मला पाळीव कुत्र्याला फिरवतात तसा गळ्यात पट्टा बांधून फिरवायला कमी करणार नाही हे त्याने जाणले.

ते दोघे लोअर परळ स्टेशन वर उतरले. आता जायचे कोठे ? तुमच्या घरी कि माझ्या ? नंदुला काय बोलावे समजेना.

''माझे घर नाही मी माझ्या नातेवाईकांकडे रहातो !'' नंदू.

''मग येवढ्या प्रेमाच्या उचापती कशाला कराव्याशा वाटल्या. आता एक करायचे. घरी जायचे कपडे घेऊन माझ्या घरी यायचे आणि येथेच रहायचे, मी सांगेन तसे. पूढचे मी तुम्ही घरी आल्यावर सांगेन!'' कुंदा

आणि कुंदा आणि नंदूने लोअर परळ पूर्वेला टॅक्सी केली. नंदू जेथे रहात होता त्या इमारतीसमोर उभी केली थोड्या वेळात आपली बॅग घेऊन तो पून: टॅक्सीत बसला. आणि टॅक्सी सननिल गल्लीत कुंदाच्या इमारती समोर उभी राहिली तेव्हा दुपारचे चार वाजले होते. ती दोघे तिच्या घरी आली नी दार लावून घेतले.

''आता या पूढे येथेच रहायचे. तुमचे माझे लग्न झाले आहे. तुमचा जीव माझ्या पोटात वाढतो आहे. हे ध्यानात ठेवा. तुमचा संबंध एकदाच वसईच्या रिसॉर्टवर आला तोही माझ्या वरचा तुमचा बलत्कार होता, तो शरीर संबंध माझ्या खूशीने झाला नाही. तो शेवटचा! या पूढे माझ्या अंगाला हात लावायचा नाही. हे बजाऊन सांगते !'' कुंदा

कुंदाने महीसासुर मर्दिनीचा अवतार आता घेतलेला पाहून नंदू पुरता टरकला होता. आपण अंकीताला फसवले ती बिचारी गरीब होती. पण ही, ही तशी नाही याची जाणीव त्याला झाली.

''मी क्षमा मागतो तुझी. मला क्षमा कर! मी तू सांगशील तसा वागेन, इकडे-तिकडे, पहाणार नाही. पण मला नवरा म्हणून वागव, मला कुत्र्यासारखी वागणूक देऊ नको ! बस येवढेच !'' नंदू.

''ते नंतर पाहू तुमच्या पूढच्या वागण्यावर ते अवलंबून असेल. तुम्ही तुमच्या बायकोच्या संसारात 'चिखल' कालवलात. तिचा संसार मोडलात, हा अक्षम्य गुन्हा आहे. हे पोर जर माझ्या पोटात नसते ना तर, तर लाथ मारून बाहेर काढला असता... पण त्याच्याकडे पाहून मी ठरवीले लग्न करायचे ! समजले !'' कुंदा.

कुंदाने साधेच जेवण केले. घरात ते दोघे जेवली, घरात एकच कॉट होती. ती त्या दिवशी कॉटवर झोपली आणि नंदू खाली जमीनीवर, दुसऱ्या दिवशी तिने त्याला डबा करून न देताच पाठवला. कंपनीत जेवा ! घरचे जेवण फक्त संध्याकाळी. तो ६ वाजताच उठला. आंघोळ आटोपली आणि कपडे करून बाहेर पडला.

आज तो करी रोडला आला स्लो गाडी पकडून तो निघाला. त्याच्या हातून घडलेल्या चुकीला अशी शिक्षा मिळेल याचा त्याने कधीच विचार केला नव्हता. आपण चुकलोच. प्रथम अंकीताच्या जीवणाशी खेळलो, मुलीला नेऊन सोडली बेवारस अवस्थेत. आणि कुंदाला फसवलेच पण, ती बाप निघाली. तिने पूरता आपला बकरा केला आहे. आता सुटका नाही. तो पुरता ढेपाळला होता आणि मनोमन खजील झाला. आपण गुन्हेगार आहोत दोघींचेही आणि आता पूढे कुत्र्याचे जीण जगावे लागणार आहे हे त्याने जाणले. आणि आता त्याचे पाय जमिनीवर आले होते. आपण गुन्हेगार आहोत याच विचारांनी तो दिवसभर पोळून निघाला होता. ना बोलणे कोणाशी, ना काही संवाद कामाविषयीही.

तो संध्याकाळी ६ वाजता घरी आला. तत् पूर्वी कुंदा घरी आली होती. तिने जेवण केले. तो घरी आला तो अबोलच होता. कुंदाही काही बोलली नाही. तिने जेवण वाढले आणि ती दोघे जेवली आणि झोपण्या पूर्वी....

''हे पहा! ही एक सज्जन लोकांची चाळ आहे. येथे गरीब पण इज्जतदार लोक रहातात हे ध्यानात ठेवायचे. फारसा कोणाशी संबंध ठेवायचा नाही.

सकाळी कामावर जाणे संध्याकाळी घरी येणे. काही गरज पडली तर खाली जाऊन आणणे येवढेच काय? आणि एक गोष्ट सांगते ती निट ऐकायची, " तुम्ही जो फॉर्म भरला आहे ना लग्नाच्या रजिस्ट्रेशनचा त्यावर पूर्वीचे लग्न झाले नाही असे लिहीले तुमच्या हस्ताक्षरात, हा अक्षम्य गुन्हा आहे ! हे लग्न त्या एका कारणाने जरी रद्द झाले नाही तरी हिंदू ॲक्ट प्रमाणे तुम्ही हा गुन्हा केला आहे. येवढे मात्र ध्यानात ठेवा. ती बिचारी कोठे असेल माहिती नाही. तुम्ही तिला आणि मलाही फसवले आहे हे नेहमी ध्यानात ठेवा !" कुंदा.

आज रात्रभर नंदूला झोप लागली नाही आणि आपल्या घोडचूकीमुळे आपण दोन जीवांच्या जीवनाशी खेळलो, हे त्याच्या रात्रभर मनात घोळत होते. आणि शेवटी काय हे कुत्र्याचे जीणे, काय साधले आपण यातून आता या चूकांचे भोग आयुष्यभर भोगावे लागणार आहेत. रात्रभर त्याला झोप लागली नाही.

आणि कुंदाला तरी कोठे झोप लागली ? ती स्वत:लाही बेजबाबदार, गुन्हेगार समजत होती. आपण पूर्ण चौकशी न करता नंदूच्या आहारी गेलो. हा ही नाही तरी वासनेचाच .. भोगासाठी नां? लग्न म्हणजे दोन जीवांचे मिलन आणि तेही पवित्र भावनेने. पण आपण आज काय साध्य केले. तिला तिच्या या सगळ्याची शिरारी आली होती. आपण नंदूच्या आहारी जाऊन भोग भोगला असता तरी तेच आणि फसवले गेलो तेही तेच. काय फरक ! नंदू बरोबर आपणही गुन्हेगार आहोत. आपण जेव्हा त्याने आपले लग्न झाले आहे हे माहीती असून, सावध न होता त्याच्या मागे पळत होतो नां? आणि म्हणून ती स्वत:ला गुन्हेगार समजून कोसत होती.

समाजाच्या दृष्टीने, आम्ही आज जरी लग्न केले तरी तो प्रकार सन्मानाचा नाही. हे ती जाणून होती. पण दुसरा काही उपाय नव्हता हे ही ती जाणून होती. एक मजबूरी म्हणून तिने लग्न केले होते. आणि आता सगळे आयुष्य हेच उराशी घेऊन जगावे लागणार हे ती जाणून होती.

चांगल्या बिजापोटी चांगली फळे जन्माला येतात, समाजाचे भले करतात. आज जे बीज माझ्या पोटात वाढते आहे, ते बलात्कारातून माझ्यामध्ये पेरले आहे. पूढे काय वाढून ठेवले आहे देव जाणे. मी काय सांगावे. माझ्या आई वडिलांनी ते भेटल्यावर या चिंतेने तर ती कोसळलीच.

दुसरा दिवस रविवार होता. तिने तिचे सारे काम आवरले आणि ती साळव्याच्या घरी पोहोचली. पण ते घरही जाग्यावर नव्हते. ती इमारत री-

डेव्हलपमेंटसाठी खाली पाडली होती. आणि त्यातली सगळी कुटुंबे इतरत्र रहायला गेली होती. तिथल्या पाटीवर तिथल्या रहिवाशांची एक यादी लावलेली होती. त्यात त्या साळवेचे नाव नव्हते. हा ही एक बनाव असावा असे तिला वाटले. ती परत घरी आली तेव्हा नुकताच नंदू आंघोळ आटोपून चहा करीत होता.

''तू चहा घेणार कां ?'' नंदू

''नको! मला इच्छा नाही !'' कुंदा आणि ती आपल्या कॉटवर झोपली तिला सारखी आठवण येत होती ती अंकीताची. रिचे सगळे भोग कुंदाने ऐकले होते. तिच अवस्था तर माझी होणार नाही नां? अशी शंका तिला आली. हा नंदू कोण जाणे पळून जाईल आणि माझ्या पोटातली ही ब्याद मला आयुष्य भर पीडीत रहिल. हे तीने पक्के ओळखले होते. पण कुंदा काही कच्चे लिंबू नव्हते. तिने मनाची पक्की तयारी केली होती या सगळ्या चुकांवर मात करण्याची. आणि त्याप्रमाणे तिचा प्रत्येक पवित्रा होता.

कुंदाने अनेक स्वप्ने उराशी जपली होती. आपण चांगल्या मुलाशी लग्न करावे. सुखाने संसार करावा. आपल्या आई-वडीलांना मदत करावी. कारण तिला भाऊ नव्हता. तिच त्यांची मुलगी आणि मुलगा होती. शिवाय चांगले घर घ्यावे. सुखा समाधानाने रहावे आयुष्यभर. पण, आता सुरुवातच जर अशी झाली तर शेवट कसा होणार याचा विचार ती करीत होती, पण या प्रश्नांची उत्तरे तिला मिळत नव्हती. आणि ती उद्वीग्न अवस्थेत, गरोदरपणात बाळंतपणाची वाट पहात होती.

तो आठ महिन्यांचा काळ अगदी सुरळीत गेला. नंदू पण अगदी सुतासारखा आला होता. पण कोण जाणे तोही आता अस्वस्थच होता. त्या बांधलेल्या बैलाला काहीच हालचाल करता येत नव्हती, इतका त्याला कुंदाने आपल्या काबूत ठेवले होते. कुंदाला हे समजत होते पण तिला हे करावे लागत होते ते त्याच्या आणि पोटात वाढणाऱ्या जीवासाठीच ना! जसे दुःख ती सहन करीत होती ते त्यानेही करावे असे तिला कां ? वाटू नये? सहाजीकच. आता कुंदाला काळजी होती ती आपले बाळंतपण कसे पार पडते याचे. तो मार्च महिना संपत आला होता. तोवर ती शाळेत गेली मग तिने बाळंतपणाची रजा घेतली. पण, मुलांचे पेपर तिने तपासून शाळेला पाठवून दिले. १५ दिवसांनी रिझल्ट लागणार होता ती ७ वी च्या मुलांची क्लास टीचर होती. तिने रिझल्ट १५/४ ला दिला

आणि त्यानंतर तिला ट्रेनमधे चढणे अशक्य होत होते. डॉ. नी २ मे. ही तारीख बाळंतपणासाठी दिली होती. तिने आपले नांव सुश्रृषा हॉस्पीटल मध्ये टाकले होते. पहिली वेळ काय सांगावे. सिझरीनही करावे लागेल या भितीने एप्रिलचा शेवटचा आठवडा तिचा अगदी अस्वस्थतेत गेला. आणि २९ एप्रिलला तिच्या पोटात दुखायला लागले.

आपल्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांसोबत तिचे संबंध चांगले होते. बाजूच्या जोशी काकूंना तिने बोलावले त्यावेळी नंदू ऑफीसला गेला होता. पण, तिने त्याला फोन करून बोलावून घेतलं. तो येईपर्यंत तिने कढ काढला पण तिला थांबवेना. नंदू ही येईना, मग जोशी काकूंना सोबत घेऊन टॅक्सीने तिने सुश्रृषा हॉस्पिटल गाठले. नंदू रात्री आठ साडे आठ वाजता आला. पण, तो पर्यंत कुंदा हॉस्पिटलला पोहचली होती. आणि त्या रात्री ११ वाजता ती बाळंत झाली. मुलगी झाली तिच्या सारखी गोरीपान. डिलीव्हरी नॉर्मल झाली. तिने जोशी काकींचे आभार मानले. अशा वेळी कोणीतरी वयस्क बाई घरात हवी असते. पण जोशी काकूंनी ही कसर भरून काढली. त्या एकट्याच त्यांच्या सुनेबरोबर रहात होत्या. कुंदाला आता त्यांचाच आधार होता. मुलीची आंघोळ, तेल पाणी इ. साठी. जोशी काकूनीच तिची पाचवीचा विधी केला. कुंदाला यातले काहीही माहिती नव्हते. आज आपले लग्न जर रितसर देवा ब्राम्हणांच्या साक्षीने झाले असते तर आपण आपल्या आईला बोलावले असते, पण तेही ती आता या अवस्थेत करू शकत नव्हती. पण हेही दिवस जातील असे तिला वाटत होते.

अंकीताला ही बातमी समजली होती. पण कुंदाने तिला दिवसाच बोलावले कारण संध्याकाळी नंदू घरी असेल म्हणून. बारसे झाले आणि कुंदाने त्या मुलीचे नांव 'अंकीता' असेच ठेवले. कारण ते तिच्या आवडीचे नांव होते म्हणून.

एक दिवस शनिवारी अंकीता आली. ते गोरे गोमटे पोरगे तिला आवडले. ''काय ग तुझा चेहरा नाही घेतला तुझ्या मुलीने, बहुतेक बापाच्या वळणावर गेली असणार !'' अंकीता.

''वळणाच बोलू नकोस ! चेहऱ्याचे बोल!'' कुंदा.

तिचे चहा पाणी झाले आणि तिने आणलेली अंगडी टोपरे नी एक छानसी उलनची शाल तिला दिली.

''तू हिचे नांव 'माझेच' ठेवलेस. पण, माझे भोग हिच्या वाटेला येऊ नयेत बाई. ती तुझ्या सारखी होवो !'' अंकीता.

‘‘नाही! माझ्यासारखी नको ! बाई तो वणवा माझ्या मुलीला सहन होणार नाही. ती सुखात रहावी असे वाटते मला!’’ कुंदा.

अंकीता साडे चार वाजता गेली नी नंदू साडे पाच वाजता घरी आला. आता तो खूपच चांगला वागत असे. मुलीला घेऊन बसे पण तिचे ‘अंकीता’ नांव घेताना मात्र तो अडखळे.

‘‘हे अंकिता नाव अवघड वाटते घ्यायला, त्यापेक्षा मी हिला बबडी म्हणेन!’’ नंदू.

‘‘घ्या ना चालेल की ! पण अंकीता नांव घेताना का अवघडल्यासारखे वाटते, ते मी ठेवले म्हणून, की आवडत नाही म्हणून!’’ कुंदा.

‘‘तसे काही नाही पण मी तीला बबडीच म्हणेन !’’ नंदू.

हे बोलताना तो खाली मान घालून होता, वर बघायची हिम्मत त्याला होत नव्हती.

‘‘पण मी मात्र तिला ‘अंकीताच’ म्हणेन !’’ कुंदा.

‘‘म्हणच ! पण मी बबडीच म्हणेन ! ’’ नंदू.

अंकीता मोठी होत होती. जोशी काकू तिचे सारे काही करायच्या. लहान मुलांना हाताळायचा त्यांचा अनुभव मोठा होता. त्यांच्या चार मुली, चौघींचीही पहिली बाळंतपणे त्यांच्या कडेच झाली. शिवाय लेकाची दोन.

अंकीता आता रांगायला लागली होती. संध्याकाळी शाळेतून आल्यावर कुंदा तिला दुध पाजायची आणि सकाळी जाताना दूध काढून फ्रिजमधें ठेवायची. सारे कसे अगदी सुरळीत चालले होते. आता अंकिताला वर्ष व्हायला आले होते. कुंदाने तिचा वाढदिवस छान साजरा केला. कारण बारशाला तिने कोणालाही बोलावले नव्हते. आता अंकिता मोठी झाल्यावर तिचे खूप सवंगडी झाले होते तेव्हा त्या सगळ्यांना तिने वाढदिवसाला बोलाविले होते. खूप मजा आली. अंकिताही आज खूष होती.

त्या दिवशी ती रात्री अंकिता झोपल्यावर खूप विचार करीत बसली. गेली दोन वर्षे आपण नंदूला दूरच ठेवले. गरोदरपणात आणि नंतर १ वर्षभर त्याला खूप शिक्षा झाली असेही तिला वाटू लागले होते. पण, अजून थोडे दिवस त्याला लांबच ठेवायचे. अनेक वेळा तो तिच्याशी लगट करायचा, पण कुंदाचे वटारलेले डोळे त्याला दूर ठेवायचे.

नंदूलाही आता हे सहन करण्यापलिकडे गेले होते. त्याचे शारिरीक आणि

मानसिक संतुलन बिघडले आहे असे कुंदाला वाटू लागले होते. नाही तर ते त्याच्या नेहमीच्या वागण्यात जाणवत होते. आणि आज खूप विचार या बाबत केला. पण, मन काही धजत नव्हते तसा निर्णय घ्यायला.

त्यानंतर आठवडा गेला असेल. आता गेले २/३ दिवस नंदू थोडा लेटच यायचा घरी. त्याच्या कंपनीतून यायची त्याची नेहमीची वेळ होती ६ वाजताची, पण मग गेले.२/३ दिवस तो ९, साडे ९ वाजता का येतो? कोठे जातो ? आणि आता त्याचा चेहरा शांत, समाधानी कसा ? तो तिच्याकडे वा अंकीताकडे ढूंकूनही बघत नव्हता. म्हणजे काय? असा बदल आताच मला कां जाणवतो आहे. याचा ही प्रश्न तिला पडला होता.

तो दिवस रविवार होता. नेहमी घरात असणारा नंदू आज सकाळपासून गायब होता. तो दीड वाजता घरी आला. त्याने दरवाजावरची बेल वाजवली. कुंदाने दरवाजा उघडला तर नंदू ने थोडी घेतली आहे आणि ती पहिल्यांदाच याची जाणीव तिला झाली. दारूचा भपकन वास येताच ती दरवाज्यातून बाजूला झाली पण नंदूच्या मागून येणारा साळवी तिने पाहिला आणि तिचा आटा सटकलाच.

‘‘गेट आऊट ! आल्या पावली परत जा! आणि पून: यायचे नाही दारावर ! ’’ कुंदा

कुंदाने साळवीला हाकलून लावला. पण नंदूचा आजचा मोहरा बघून ती चरकली. हे अपेक्षित नव्हते पण, आज ही बला माझ्या घरी आली. तिचे मन भितीने चरकले. आता काय करावे ? आता नंदू तर नशेत आहे. त्याला समजवण्यात अर्थ नव्हता. हे सारे माझ्या मुळेच घडले. तो व्यसनाधीन झाला याला कारण नंदूला मी जवळ नाही केला. हे त्याने जे केले ते साळवीच्या संगतीने ? कि जाणीवपूर्वक. तिला काहीच कळेना. तिने दरवाजा बंद केला आणि नंदुकडे न पहाता ती जेवण करीत राहिली. तेवढ्यात अंकीताला जाग आली. कुंदाच्या ओरडण्याने म्हणून कुंदाने जेवणाचे काम अर्धवट सोडून तिने तिला जवळ घेतले आणि ती तिला पाजीत होती. नंदू तिला आशाळभूत नजरेने पहात होती. पण तिने त्याच्याकडे जराही लक्ष दिले नाही... आणि तो कॉटवर आडवा झाला. आज तिचे जेवणात लक्ष नव्हते. ती तिच्याच वागण्याला दोष देत होती. आणि पूढे काय वाढून ठेवले आहे याची तिला कल्पना आली हे असेच होत राहिले तर आपले आणि अंकिताचे जीवन भरकटेल या वादळात.

ही धोक्याची घंटा आहे. हे तिने जाणले. पण, तिचे तरी काय चुकले ?

नंदूच्या पहिल्या बलात्काराने आपल्याला अंकिताचे देणे लाभले हा प्रसंग तिला पुन्हा नको होता, पण, नंदू तरी समंजस होता कां ? त्याची आधाशी नजर तिच्या ओळखीची होती. म्हणून ती होता होईल तेवढी ती वेळ टाळण्याचा प्रयत्न करीत होती. नाहीतर एका मुलाचे करता करता ती मेटाकुटीला आली होती वर आणखी दुसरी बला? होता होई तो ती वेळ पूढे जाईल ते ती पहात होती त्याच भितीने. तिचे काय चूकत होते की ती बरोबर करतेय या द्वंदवाची ती शिकार झाली होती.

मध्ये १५ दिवस ठीक गेले. नंदू वेळेवर घरी येत होता. दारू पीत नव्हता. सारे काही ठीक चालले होते. आणि अचानक नंदू आजारी पडला, तिने त्याला डॉ. पांडेना दाखवले पण काहीच निदान झाले नाही. औषधे चालू होती पण काहीही फरक पडत नव्हता. आणि नंदूने कामावर जाणे थांबवले. तो पूरा दिवस घरात अबोल असे दोन वेळा जेवायचे आणि घरचा आढा धुंडायचा हेच त्याचे चालले होते. तो आता कुंदाकडेही ढूंकून पहात नव्हता. आपल्याच विचारांच्या नशेत नंदू असायचा.

आणि त्यानंतर मी बाहेर जाऊन येतो, तास दोन तासाने येतो म्हणून तो निघून गेला. आणि त्या दिवशी तो तीन तासांनी परत आला पण प्यालेला नव्हता. तो आला आणि आपल्या कॉटवर पडला. तो जेवायलाही उठला नाही. कुंदाने त्याला हलवून विचारले बरे वाटत नाही कां ? जेऊन घेता कां ? पण एक ना दोन.... आणि तो रडायला लागला. खाली मान घालून तो मुसु मुसु रडू लागला, पण काहीच बोलायला तयार नव्हता. त्याने डोळे बंद केले आणि तो बराच वेळ पडून होता.

''कुंदा ! मी फसवले तुला ! मी तुझ्या लायक आता राहिलो नाही, मी तूझा, अंकिताचा आणि रंजनाचा गुन्हेगार आहे...कुंदा गुन्हेगार आहे ! मी तूझा नवरा बनण्यास लायक नाही ! पापी आहे मी, मीच अंकिताच्या आणि तुझ्याही प्रपंचात, जीवनात चिखल कालवला कुंदा !. चिखल कालवला माफ कर कुंदा! मला माफ कर'' नंदू.

''काय झालेय येवढे उद्वीग्न व्हायला ?'' कुंदा

''कुंदा ! मला एडस् झाला आहे ! मला एडस् झाला आहे ! मी शेण खल्ले आहे कुंदा!'' नंदू

आणि तो पुन्हा रडायला लागला. कुंदाच्याही डोळ्यात पाणी उभे राहिले पण तिने आपले अश्रू आपल्या पापण्यांनी पिऊन टाकले.... म्हणत तिने ही कपाळाला हात लावला.

कुंदा पूरती ढासळली होती. हे सारे माझ्या मुळेच झाले असे सारखी ती स्वत:ला कोसीत राहिली. तिकडे अंकीता बाळ रडते आहे याकडे तिचे ध्यान नव्हते.

आता तर नंदू शांत पडला होता. कॉटवर पण काही असंबद्धपणे बडबडत होता...

''त्या साळव्याच्या नादाने मी माडी चढलो आणि ही बला बांधून घेतली गळ्यात....'' नंदू.

कुंदाने हे ऐकले आणि ती चरकली. ''या सगळ्याला मीच जबाबदार आहे. माझा हट्ट आणि अहंकार !'' कुंदा.

मग सगळे काही शांत झाले खरे पण ही वादळा पूर्वीची शांतता होती हे कुंदा जाणून होती. त्या दिवशी रात्री तिला झोप लागली नाही. ती पून:पून: नंदूला उठविण्याचा प्रयत्न करीत होती. पण तो अगदी गाढ झोपेत होता.....

सकाळी कुंदाला शाळेत जायचे होते. पण तिचे पाऊल घराबाहेर पडायला तयार नव्हते. आणि अशा अवस्थेत नंदूला सोडून जायला तिचे मन तयार होईना. ती बाहेर पडली पण, मन घट्ट करून. आता तिला नंदूची सुरक्षितता नाहीतर तिची नोकरी अधिक महत्वाची वाटत होती, तिच तिला आणि अंकीता बाळाला... या जागात स्थैर्य देणार होती.

दुपारी कुंदा घरी आली अडीच वाजले होते. तिचे अधिवेशन सकाळचे होते. आज ६ माहीचे पेपर सेटींगचे काम उरकायला तिला वेळ झाला तोवर अंकीता जोशी काकुंकडेच होती. आणि नंदू अजून झोपलेलाच होता. घराचा दरवाजा उघडाच होता. ती घरात आली तिने नंदूच्या डोक्यावर हात ठेवला, तर डोके तापले होते. तिने टेंपरेचर पाहिले १०४ वर होते. ताबोडतोब तिने थंड पाण्याची घडी त्याच्या मस्तकावर ठेवली. तो अजून जेवला नव्हता. जेवण पार थंड होऊन गेले नव्हते. पण नंदूचा ताप काही केल्या उतरत नव्हता. डॉक्टर संध्याकाळी ६ वाजता येणार तोवर ताप तरी उतरायला हवा या ईराद्याने ती न जेवताच नंदूची सुश्रृशा करीत होती. डॉक्टर तरी काय करणार या जीवघेण्या बिमारीला. आता यातून बरा झाला तर बरा. आणि बरा होऊन पुन्हा त्याच

मार्गाने गेला तर ? तिच्या काळजात धस झाले. मीही स्वत:ला रोखले पाहिजे नाही तर उगाच आहारी जाण्याचा विचार केला तर ही बिमारी मलाही ग्रासेल या भितीने तिने नंदू पासून दूर रहाण्याचा विचार मनात पक्का केला. तिला काळजी होती ती अंकिताची ते दीड वर्षाचे पोर. त्याला माझ्या शिवाय वाली नाही. बस आता मन कठोर करायचेच. एकदा का वाघाला माणसाच्या रक्ताची चटक लागली की तो केव्हाही तेच करील या विचाराने जरी उद्या नंदू बरा झाला तरी पुन्हा शेण खाणार नाही याचा नेम नाही ह तिने मनात पक्के रुजवले होते. तेव्हा अगदी मनात आले तरी ते दिव्य करायचे नाहीच म्हणजे नाही.

संध्याकाळी ती नंदूला डॉ. शहांकडे घेऊन गेली. त्यांना सगळी वस्तुस्थिती सांगीतली. प्रथम ते या पेशंटला तपासायला तयार नव्हते. याला उपाय फक्त कस्तुरबा हॉस्पिटलात होण्यासारखे आहे. तुम्ही वेळ वाया न घालवता तेथे घेऊन जा, नी ॲडमीट करा. आता कुंदाच्या पायाखालची वाळू पार सरकली होती. तिच्या जीवनात तिला अंधार आणि अंधारच दिसत होता. पण दूसरा इलाज नव्हता.

तिने टॅक्सी केली आणि कस्तुरबा हॉस्पीटलमध्ये येऊन नंदूला ॲडमीट केला.. केव्हातरी २/३ दिवसानी ती हॉस्पीटलला जाई. कारण तिची शाळा, अंकिता यातून वेळ नव्हता. आपण किती दिवस शेजाऱ्या, पाजाऱ्यांवर विसंबून रहायचे ? आलेल्या संकटाला आपल्यालाच सामोरे जावे लागणार होते.

मध्ये एकदा अंकिताचा फोन आला.

"कशी आहेस ? कशी तुझी कन्या ? " अंकिता

'ठिक आहे ! " कुंदा.

"तूझे मिस्टर आजारी आहेत असे तू म्हणाली होतीस ! ते कसे आहेत ?" अंकिता

"आता त्यांचे काही खरे नाही!" कुंदा.

"म्हणजे !" अंकिता.

आणि तिला रडू फुटले.. काय सांगावे अंकिताला याने रांडेकडे जाऊन दुखणे आणले ! त्याला एडस् झाला आहे... आणि तो पापाची फळे भोगतो आहे. तो आता फारच थोड्या दिवसाचा धनी आहे. सुधारायची काही शक्यता नाही....

"मी येऊ का तुला भेटायला!" अंकिता.

‘‘नको !’’ कुंदा.

‘‘अग असे कां म्हाणतेस ! कसे आहेत ते !’’ अंकिता.

जेव्हा अंकिता पहिल्यांदा आली होती तेव्हा त्याचा फोटो पाहिल्यावर हा नंदूच आहे याची खात्री झाली होती. याने माझे आयुष्य नासवले आणि आता कुंदाचेही.. त्याने चिखल केला आमच्या दोघींच्या आयुष्याचा हे तिने ओळखले होते. पण कुंदाजवळ चकार शब्दही तिने उच्चारला नव्हता. पण हे सत्य काही फार दिवस लपून थोडेच रहाणार होते! केव्हान केव्हा ते चव्हाट्यावर येणारच . अगदी खात्रीने हे अंकिता जाणून होती. या उनाड माणसामुळे आपले दोघींचे आयुष्य बरबाद झाले हे खरे हे फक्त ती जाणून होती. पण, कुंदाला हे काही समजले नव्हते.

आणि नंदू ३ महिने त्या हॉस्पिटलात आपल्या दुखण्याशी झगडत होता तो कमालीचा दु:खी होता. आपल्या आजवरच्या जगण्यात आपण काय साधले? दोन स्त्रियांच्या आयुष्याची वाट लावली. तो रडायचा पण आता त्याचा काही उपयोग नव्हता.

अनेक वेळा नंदूला आपल्या मुलीची रंजनाची आठवण येई. निघृणपणे, बेवारस अवस्थेत आपण तीला वाऱ्यावर सोडले. हे त्याच्या मनात सलत होते. आपण हे कृत्य स्वार्थापाई कुंदासाठी केले पण, पण त्यातून काय निष्पन्न झाले?

त्याच वेळी अंकिताची बदली एक दिवस मुलींच्या विभागत झाली. तिची रंजना तेथेच होती. तिने तिला पहील्याच दिवशी पाहिले आणि आईचे ममत्व जागृत झाले. तिला आठवले बोर्डावर लावलेला तिचा फोटो आपण पाहिला पण त्याचा पाठपुरावा केला नाही. नाहीतर मी माझ्या लेकीला भेटू शकली असती. त्या बेईमान, बेरहम नंदू ने माझ्या नवऱ्याने माझ्या पोरीला येथे बेवारस अवस्थेत सोडले. नशीब येथेच सोडले नाहीतर आपण तिला कधीच भेटू शकलो नसतो. तीला रडू आवरेना तिने रंजनाला हाक मारली जवळ बोलाविले.

‘‘तू मला ओळखलेस रंजना ?’’

‘‘हो ! आई! मी तुला पाहिले होते येथे एक दोन वेळा. पण मीही टाळले तुला भेटायला. तू येथे आहेस सुखी आहेस हे मी जाणले होते. आणि मी येथे आई गेली ३ वर्षे मी येथे आहे. मजेत आहे. बापाची आठवण येते, तो कोठे असेल याची पून: पून: आठवण येते आई. पण !’’ रंजना.

‘‘तो ! मेला! ’’ अंकिता.

‘‘हो ! तो आता मेल्या सारखाच आहे ! नाही भेटणार आपल्याला. ना आपण जाणार त्याला भेटायला ! तो त्याच्या कुकर्माचे भोग भोगतोय ! अंकिता.

‘‘ हे ! खरे काय ? रंजना

‘‘हो! अगदी खरे ! त्याने माझ्या संसाराची वाट लावली आणि ..... ! अंकिता.

तिने आपली जीभ आवरली.

पण हे सत्य फक्त अंकितालाच माहीती होते. कुंदाला नाही. हे ही ती जाणत होती. खरेतर ती सुखी व्हावी. आपल्या जे वाट्याला आले ते हिच्या नको, पण नियतीच्या हातात न्यायाची दोरी असते. ती इन्साफ करते, माणूस मरण्या आधी.... तो जीवंत असतानाच.

इकडे नंदू हॉस्पिटलमधून घरी आला पण अर्धमेल्या अवस्थेत, त्याच्यात त्राण नव्हते. हॉस्पिटलची एक पद्धत असते, तीन महिन्यापेक्षा कोणी पेशंट अधिक काळ तेथे राहू नये. त्याला घरी सोडतात... पण जरूर असेल तर ते त्याला पून: ॲडमीट करतात असा.

तो डिसेंबरचा शेवटचा आठवडा होता. आणि नंदूची तब्बेत अचानक बिघडली. त्याला पून: कस्तुरबाला ॲडमिट केले आणि दोन दिवसात त्याची प्राण ज्योत मालवली. ही बातमी कुंदाला समजली. मग ती जोशी काकूंच्या मुलाला आणि १/२ शेजाऱ्यांना घेऊन हॉस्पीटलला जाऊन ३ वाजता त्या इमारतीच्या आवारात आणली. तत्पूर्वी एकजीवा भावाची म्हणून कुंदाने अंकिताला ही बातमी दिली.

अंकिताने रंजनासह आश्रमाच्या संचालिकेला सांगून परवानगी घेलती व ती ही सनमेल गल्लीत कुंदाच्या घरी आली. कुंदा हॉस्पीटलला गेली होती.

हॉस्पीटलने हि रोगट बॉडी म्हणून पूर्णपणे कपड्यात बांधून त्यांच्या हवाली केली. ती बॉडी आली तेव्हा अंकिताही तेथेच होती. तिलाही रडू आवरेना. कसा झाला तरी नंदू तिच्याही कुटुंबाचा आधार होता.

इमारतीच्या लोकांनी बॉडी नेण्याची तयारी केली. कुंदाने आपल्या बांगड्या काढून नंदूच्या पायावर ठेवल्या आणि मागे उभ्या असलेल्या अंकितानेही तिच्या बांगड्या काढून कुंदाच्या हातात दिल्या.

‘‘हे माझे सौभाग्य वाण, त्याच्या पायावर ठेव ! अंकिता आणि तिला रडू

आवरेना . तिने रंजनाला मिठी मारली आणि तिला रडू आवरेना हे पाहून....

‘‘हाच माझा नवरा ! ज्याने माझे नी तुझेही आयुष्य नासवले आणि त्याच्याही आयुष्याचा चिखल त्याने करून घेतला. शेवटी कर्माची फळे अशीच भोगावी लागतात. हेच खरे! ’’अंकिता.

तेव्हा कुंदाला समजले की हाच तो तिचा नवरा. अशा नराधमासाठी रडणे हे ही पापच कि. तिने आपले अश्रू पुसले आणि बॉडी उचलून नेली ती समोरच्या अँबुलन्समध्ये ठेवे पर्यंत त्या दोघांची नजर त्याच्याकडे होती.

नंदूने केलेल्या चिखलाने अंकिता आणि रंजना तसेच कुंदाच्याही जगण्याचा चिखल झाला होता.

त्यादिवशी अंकिता आणि रंजना दोघीही कुंदाकडेच राहिल्या. त्या तिघीही समदु:खी होत्या.

‘‘हा तुझा नवरा आहे हे मला वेळीच समजले असते तर, मी सावध झाले असते आणि त्याला टाळले असते. पण माझेही पूर्वीच्या जन्मीचे काही भोग असावेत ते या जन्मी आपण तिघीही आणि छोट्या अंकितालाही भोगायला लागले.

नाशिकला जाऊन त्या चौघींनी नंदूचे क्रिया कर्म उरकले आणि त्या मुंबईला आल्या.

‘‘ताई! तू आता येथे माझ्या बरोबर रहा. मी तसे आश्रमाला कळवते. नाही तरी रंजनाला १८ वर्षानंतर तेथे रहाता येणार नाही. तेच कोणतातरी चांगला मुलगा बघून लग्न करून देतील. त्या पेक्षा आता या दोन्ही मुलींना आपण वाढवू, शिकवू आणि त्यांचे प्रपंच सजवून त्यांना पाठवून देऊ. आता आपण आपल्या मुलींसाठीच जगायचे... म्हणत... त्या एकमेकींच्या गळ्यात पडल्या.

नंदू गेल्याने त्याचा पी. एफ. व इतर ची रक्कम कुंदाने अंकितच्या नावावर ठेवली. कारण तो तिचाच अधिकार होता. ती त्याची पहिली बायको म्हणून आणि तिच्या झालेल्या आयुष्याची परवड म्हणून.

मग कुंदाने रंजनाचे कन्यादान केले आणि ती अंकिता आणि मुलगी एका जागेत रहायला लागल्या. अंकीताचीही नोकरी चालू होती. ती नंतर तिने सोडली कुंदाला चांगला पगार होता. ती छोट्या अंकिताला सांभाळीत होती आणि कुंदा आपली नोकरी.

अनेक वेळा त्या आपल्या आयुष्यात त्या गत वाटचालींची चर्चा

करायच्या. आणि हा सगळा दैव योग म्हणायचा, असे म्हणत मनातल्या विचारांना पूर्ण विराम द्यायच्या.

पण ते बरोबर नाही हे कुंदाला समजत होते. अनेक विचाराची जाणीव नेहमी माणसाला होत असते. मन माणसाला सावध करते अनेकदा, त्याला विचार करायची संधी देते. पण, जर तो बेफिकीर असेल, अहंकारी असेल तर अनेक वेळा त्यावर येणारी संकटे वार करतात. हे आपण नाही जाणले तर, दैवाला दोष देणे चूक आहे. निर्णय पूर्ण विचाराअंती घ्यावेत, माणसाने. पण तसे होत नाही. आणि मग चिखल होतो आयुष्याचा जसा कुंदाच्या जीवनात झाला.

म्हणून नेहमी सावधान असावे. प्रत्येक पाऊल विचाराअंती टाकावे. आपले शील हे निसर्गाने दिलेली देणगी आहे ती जपावी माणसाने. येवढे जरी समजले तर जीवन सफल होऊ शकते. आणि धोके टळतात नाहीतर... चिखल ठरलेलाच.

नंदू गेल्याला महिना होऊन गेला होता. एक दिवस कुंदा असाच संध्याकाळी विचार करीत बसली होती. अंकीताची नाईट होती आणि कुंदा एकटीच होती. आपला नवरा एडस्‌ने गेला याचे दु:ख तिला होते. ही एक खरोखर लांछनास्पद घटना होती. कुंदाच्या कठोर वागण्याने हे घडले असे तीला राहून राहून वाटत होते. त्याला मी जवळ केला नाही, म्हणून त्याने दूसरा मार्ग निवडला. त्यात त्याची तरी काय चूक. पून: त्याच, त्याच विचाराने कुंदा पार गळून गेली होती.

आपण आयुष्यात पाहिलेल्या स्वप्नांचा असा चोळा मोळा व्हावा याचेच तिला दु:ख होते. आज ती घरात एकटीच होती आसवानी तिचे डोळे भरून ओसंडत होते. पण, पहायला कोणी नव्हते. काय मिळाले आपल्याला. नवऱ्याचे सुख ना प्रपंचाचे. आपण केली ती ॲडजस्टमेंट आणि शेवटी आपण एकाकीच रहीलो. अंकिताला तिने के. जी ला घातले होते. ती कधी मोठी होणार? तिचे सारे करण्यात आता आपले जीवन आपल्याला वेचावे लागणार हे तर ठरलेच होते.

शेवटी ती एक स्त्री होती, तिला भावना होत्या. आपल्या स्वप्नांची झालेली राखरांगोळी तिने प्रत्यक्ष अनुभवली होती. अनेक वेळा तिच्या मनात येई आपले झालेले लग्न ही एक थट्टा होती आणि ती जरी मनाने स्वीकारली होती तरी आपल्या जीवनाचा होणारा कडेलोट रोखण्यासाठी पण शेवटी कडेलोट झालच

नां ?

तिच्या नवऱ्याचा मृत्यु एडस्ने झाला आहे ही गोष्ट काही लपून राहिली नाही. त्या चाळीतल्या माणसामाणसाला हि गोष्ट माहिती पडली आणि त्यांचा कुंदाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बदलला. हे त्यांच्या नजरेतून तिला जाणवत होते. आणि हिलाही तोच रोग झाला नसेल नां ? अशीही शंका शेजाऱ्यांच्या मनात येणार हे ती जाणून होती. आपली चूक काही नसताना हे घडावे याचे तिला फार दु:ख वाटत होते.

तिने आपल्या मनात पक्के ठरवून ठेवले होते. आपले वय आता २४/२५ आहे. आपण अजून तरूण आहोत. तरूण वयातल्या तिच्या भावना अजून तशाच जाग्या आहेत. तेव्हा अनेक वेळा तिच्या मनात विचार येई आपण लग्न कां करू नये 'पण अंकिताचे पूढे काय ? तिला मुलगी म्हणून स्वीकारणारा कोण भेटेल कां? नाहीतर त्या बालमनाची परवड होईल आणि आपण ती पाहू शकणार नाही. हा ही विचार मनात येऊन जाई. वेळ तशीच आली तर स्विकारू आपण ते दिव्यही. पण नियतीच्या मनात काय आहे कसे कळणार ? नंदूने जी चूक केली ती चूक ती गेली ३ वर्षे भोगत आहे. तो गेला तरी त्याने केलेला चिखल अजून तसाच पायाला लागला आहे. तो धूतला जाईल कां? अशा आणि अनेक शंका कुशंकांनी तिचे मन अंधारून गेले होते.

येवढ्यात दारावरची बेल वाजली. कुंदाने आपले डोळे पुसले. आणि दरवाजा उघडला. अंकिताला सोडायला तिची टिचर आली होती. ती घरात येऊ नये असे तिला वाटत होते. पण दुसरे मन सांगे ती आलेयना तुझ्याकडे, तिला आता बोलव बसायला सांग. तिच्याशी काहीतरी बोल. पण, मनाच्या वादळातून तिला ते सुचेना....

''आत येऊ कां ?''

''या ना ! आत या! बसा ! कॉफी घेणार नां ?

''हो ! रितू... तुम्ही एकट्याच असता कां ?''

''नाही माझी बहीण असते माझ्या बरोबर !'' कुंदा

''ओके ! तुमची मुलगी रंजना माझ्या भावाची बायको !'' रितू.

''हो! कां ? मला कल्पना नव्हती ! पण आता आपली ओळख झाली आहे ! कधी तरी या !'' कुंदा.

आणि ती निघून गेली. आता हि टीचर तर अगदी जवळ आलेय आपल्या.

असे व्हायला नको होते. ती नंदू, रंजना यांना विसरू इच्छित होती कायमची. आता तिला अंकिताचीही अडचण जाणवत होती. कदाचित हे लचांड माझ्या कायमचे बकोटीला बसेल याची भिती तिला वाटत होती. रंजना तिची कोण... नव्हे . नंदूची ! काय घेणे देणे. ठीक आपण तिचे लग्न लावून दिले. विषय संपला होता. अंकिता कामाला होती तेथे तिच्या बद्दल काही बाही वेडे वाकडे ऐकायला येत होते. अंकिताचा काही दोष नव्हता. तिच्या ३५ वर्षाच्या आयुष्यात तिला तरी काय सुख मिळाले. लेकीचे लग्न झाले आता ती मोकळी होती. सध्या कुंदाचा मुड काही ठीक नसायचा.

“कां ग ? तू अशी तूटक तुटक वागते आहेस, गेला महिनाभर ! काही अडचण वाटते कां तुला माझी ? हवेतर मी कॉर्टर घेते आणि आश्रमात जाते !

“नको नको ! तसे नको !” कुंदा

“मग कसे ?” अंकीता

“माझा सध्या मुड ठिकाणावर नसतो. मला कोणाचीच जवळीक नकोसी झाली आहे ! मला एकांत हवा !” कुंदा.

“ठीक आहे ! मी आठवडाभरात निघून जाते नाहीतर तूझा माझा संबंध काय ? सांगून सवरून तू माझी सवतच ना ?” अंकिता.

हे ऐकल्यावर कुंदा मात्र चरकलीच. आपण कोणाची तरी सवत आहोत म्हणजे आपण अंकिताच्या प्रपंच्यात चिखल कालवला ना कि काही वेगळे केले ? हाही माझा अपराधच नां ! नंदूने सारे सांगीतले पण ते अर्ध सत्यच होते. त्यावेळी आपण सावध व्हायला हवे होते. पण भावनांच्या आहारी आपण गेलो. नंदूचा स्पर्श, जवळीक आपल्याला हवी हवीशी वाटत होती. पण तो काही इमानदार नव्हता. संधी साधू होता तो. पण, आपण त्याला न टाळता जवळ केला. ही मोठी घोडचूकच. या साठी कोणा दुसऱ्याला दोष देण्यात अर्थ नव्हता. ती स्वतःच्या आपल्या जीवनात झालेल्या चिखलाला जबाबदार होती. आणि तिने स्वीकारला. पण आता त्यातून बाहेर पडण्यासाठी तिचे तरूण मन असुसले होते. येवढे खरे.

त्यानंतर आठवडाभरातच ती रहात होती त्या इमारतीचे पूर्नः बांधणीची नोटीस म्हाडाने दिली. आणि महिन्याभरात रुम खाली करा तुम्ही तुमच्यासाठी भाड्याने नियमात बसेल अशी जागा बघा, त्याचे भाडे हि इमारत पूरी होई पर्यंत म्हाडाने द्यायचे कबूल केले होते. आणि हालचाली सुरु झाल्या जागा

शोधण्याच्या.

आता मात्र कुंदाला अंकिताची अडचण अधिक जाणवायला लागली होती...

''ताई! तू पुनः आश्रमात जावे म्हणते ! कारण दुसरी जागा मिळे पर्यंत मी कोठेतरी शेअरींग मध्ये राहीन. तुला तेथे घेऊन जाणे योग्य नाही तेव्हा तू आठवडा भरात आपली व्यवस्था करावी !'' कुंदा.

''ठीक आहे मी माझी व्यवस्था करते!'' अंकिता.

कुंदाला ही संधी पथ्यावर पडली. अंकीताची अडचण आता दूर झाली होती. तिला रीतूचीही जवळीक नको होती ना रंजनाची. तिने चार बंगला वन आर के चा प्लॅट भाड्याने घेतला व ती शिफ्ट होणार त्याच दिवशी अंकिताही निघून गेली.

आता ती आणि तिची मुलगी अंकिता दोघीच नव्या जागेत रहात होत्या. तो महिना एप्रिलचा होता. अंकिताला तिने के.जीला ॲडमीशन घ्यायचे ठरवले तिच्या बालमोहन मध्ते म्हणजे जाणे येणे बरोबर होईल आणि तिला कोणाकडे सोडण्याची वेळ येणार नव्हती. शक्यतो आपण एकटे रहावे. आपली नोकरी भली. आपण भले. पण नियतीला हे मान्य नव्हते.....

इकडे अंकिता आश्रमात आली. खरेतरे तिला तेथेच रहावे आणि आपले उर्वरीत आयुष्य व्यथित करावे असे वाटत असे. तिला आश्रमातले एक मार्गी रटाळ जीवन आताशा आवडत नव्हते. तेथील चाकोरीबद्ध जगण्याचा तिला वीट आला होता. ती तेथून बाहेर पडण्याची वाट पहात होती. अनायसे ती आली पण पून: येऊन या दलदलीत पडावे असे तिला वाटत नव्हते. ती अगदी नाराज पणाने आश्रमात आली. आता रंजना पण तेथे नव्हती. कोणीही जीवाभावाचे तेथे नव्हते. सारा एकटीचा कारभार बेचव होता तो.

हे जरी खरे असले तरी तिला ते मान्यच करावे लागले. कुंदाने तिला आधार दिला त्या गोष्टीचे उपकार ती मानत होती पण आता घराबाहेरचा रस्ता तिने दाखवला त्याने ती कमालीची दूखावली होती. पण तिला ते नाईलाजाने स्वीकारावे लागले सुखाची लालुच कोणाला नसते ? पण नियती पूढे झुकावे लागते . हे तिला पटत असते. पण तिचे दुखावलेले मन मात्र हे मान्य करायला तयार नसते. नंदू हा तिचा नवरा होता. देवा ब्राम्हणांच्या साक्षीने लग्न केले होते. त्याच्या बरोबर पण तो बेईमान निघाला. आजन्म उद्या त्याला तिला स्वीकारावे

लागले असते. हे ती पक्के जाणत होती, पण मध्ये कुंदा आली नंतरचे सगळे महाभारत घडले. ते जरी अनपेक्षीत होते तरी आज तीला कुंदा सवतच वाटत होती. तिची प्रतिस्पर्धी, आपण वाऱ्यवर आणि ती सुखात हे अंकिताला पटेना... आणि ती कुंदाचा द्वेश करू लागली.

आपल्या मुळे अंकिता दुखावली आहे हे कुंदा जाणत होती पण भविष्यात ती अडचण होणार हे ही ती जाणत होती, तिला तिचा मार्ग साफ हवा होता. मनाप्रमाणे जगण्याचा. आणि कुंदाचेही काही चुकले नव्हतेच. आता त्या दोघींच्या मधला झालेला चिखल नियती कसा सोडवते कोण जाणे. पण ही पूढच्या वादळाची सुरूवात होती हे मात्र खरे.

कुंदा आता स्वतंत्र होती. ती आणि तिची मुलगी या पलीकडे तिचा काहीच विचार ती सध्यातरी करीत होती.

गेली पाच वर्षा पूर्वी तिने ती बिल्डींग सोडली पण काही अडचणीमुळे ती इमारत काही बांधून पूर्ण होईना. मॅटर कोर्टात अडकले. मालकाने म्हाडावर केस केली आणि अजून किती वेळ जाणार. या मुळे सगळेच भाडेकरू चिंतीत होते. कुंदालाही अनिश्चितता काही केल्या मान्य नव्हती. तिने ती जागा त्याच इमारतीतल्या शहा नावाच्या व्यापऱ्याला ७० लाखाला विकण्याचा विचार केला व त्या पैशातून शिवाजी पार्कला मोठी जागा खरेदी केली. व भाड्याच्या जागेतून बाहेर पडली. ती भाड्याच्या जागेत असताना अनेक अडचणींचा सामना तिला करावा लागला. आता शाळा जवळ होती दोन मिनीटाच्या अंतरावर. पॉश एरीया. तिला तो खूप आवडला.

आणि आता एक नवा खेळ सुरु झाला तो अनपेक्षीत पणे. नियतीला तिचे सुख पहावेना. अंकिता आता ११ वर्षाची झाली होती, हुशार होती. दिसायलाही छान होती अगदी तिच्या सारखी. कुंदाने तिला पाचगणीला पाठविण्याचा विचार पक्का केला. तीन महिन्याने ती पाचगणीला जायची. अंकिताला भेटायची आणि परत यायची.

अंकिता पाचगणीला गेल्यावर कुंदा आता शाळेच्या व्यतिरीक्त ती आता मोकळी असे. वेळ जात नव्हता. लायब्ररित जायचेही तिने बंद केले होते. तिची सगळी हकीकत लायब्ररीच्या व काही सदस्यांना हि माहिती होती. त्या ऐवजी ती आता शाळेच्या लायब्ररीतील पुस्तके आणि किती वाचणार ? संध्याकाळी ती मात्र चांगला एक तास अंकिता जवळ बोलायची तेवढाच एक विरंगुळा होता.

तिचे खूप प्रेम होते अंकितावर. आता तिच्या बापाचे दृष्कृत्य ती पार विसरली होती.

कुंदा शाळेत मराठी विषय शिकवायची. तिचे वाचन प्रचंड त्यामुळे मराठीवर प्रभुत्व. आता विरंगुळा म्हणून कुंदाने आपला जीवनाचा आलेख आठवायला सुरुवात केली. बारीक सारीक घटना आठवून त्यांचे टिपण तीने तयार करायला सुरुवात होईल. याची एक छान कथा लिहीली जाईल. यासाठी या टिपणाची ती नोंद करीत होती.

तिच्या जीवनाची झालेली परवड कां झाली, याची हि कथा होती. प्रेम करावे पण त्यामागे पवित्र, पारदर्शकता असायला हवी. 'लहान वयात म्हणजे थोडे समजायला लागले की मुले वहात जातात, शरिराची ओढ हे मुळात प्रेम नव्हेच, ते आकर्षण हे दोन शरिराचे असते. त्यात फक्त भोगाची वासनेचीच ओढ असते. हे तिला पटवून द्यायचे होते. तिचा अनुभव तीने शब्दांकित करण्याचा विचार केला आणि कृतीत आणला.

दुसरा विचार म्हणजे प्रेम म्हणजे वर सांगीतलेले प्रेम नव्हतेच ते असावे पवित्र, हृदयातल्या कप्प्यात जपून ठेवावे आयुष्यभर असे. पण हे मुलांना नव्हे, वयात आलेल्यांनाही कळत नाही. नव्हे ते कळते पण त्याचे होणारे दुष्परिणाम भोगताना, या घोडचूका निस्तरताना नाकीनऊ येतात त्यांचे आणि मग त्यातून प्रपंच दुभंगतो शकले होतात त्याची आणि नियतीचा खेळ सुरू होतो.

म्हणून सावधानता बाळगावी, समाजाच्या चालीरीती, नियम काटेकोर पणे पाळावेत. आईवडील कुटुंबातली माणसे यांच्या सांगण्याला मान द्यावा आणि शक्यतो टाळावेत हे येणारे धोके. हाच समाजाला समजावण्याचा प्रयत्न कुंदाचा होता. आणि तिने ते काम तडीस नेले.

दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे प्रेमीकांनी, पालकांनी लग्ना पूर्वी दोन्ही बाजूची योग्य चौकशी करावी. गुण, अवगुण, नोकरी, कुटुंबाची सर्व माहिती घ्यावी. शिवाय स्वभाव जूळतात की हे पहावे. खरेतर प्रेमाच्या कैफात सारी मुले, मुली आंधळे होतात. आणि या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात आणि नंतर अडचणीत येऊन गटांगळ्या खातात. त्यांना कोणीच वाली नसतो.

जग फार स्वार्थी आहे हो. हे ही मुले पार विसरतात आणि वहात जातात. प्रपंच, संसार, लग्नानंतरची घडी बसवणे, सहजीवन ही गाजराची पूंगी नव्हे वाजली तर वाजली नाही तर तोडून खायची. हे सारे नव्या पिढीने समजावे

यासाठी कुंदाने आपला अनुभव जगापूढे ठेवण्याचा विचार या लिखाणा मागचा होता.

जीवनाचा **चिखल** माणूस आपल्या हाताने करून घेतो व इतरांना संसारात कालवतो आणि त्याचे भोग चिखलात पडून त्यांनाच भोगावे लागतात.

या साऱ्याला तोच जबाबदार असतो. चिखलात बरबटलेले हात, पाय धुता धुता दम छाक होते. तरीही त्याच्या खूणा नाही धूता येत माणसाला.

०-०-०



लेखक

## ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

सर्व कथा या पुरुषांच्या जीवनाविषयी भाष्य करणाऱ्या असल्या तरी प्रत्यक्षात त्या स्त्री केंद्री आहेत. प्रत्येक कथेत पुरुषाला, त्याच्या चुकांना–दोषांना सावरून घेत, त्या पोटात घालीत त्याच्यावर मायेची पखरण करणारी सशक्त स्त्री आपल्याला पाहायला मिळते. स्त्री ही क्षणाची पत्नी किंवा प्रेयसी असते अन् अनंत काळची माता असते असा संदेश देणारा, स्त्री शक्तीच आगळेवेगळे दर्शन घडविणाऱ्या या समर्थ कथा आहेत अन् हेच या कथांचे वैशिष्ट्य आहे. लेखनाची शैली ही साधी–सरळ, वेगवान अन् चित्रदर्शी अशी आहे. या साऱ्या कथांवर सिनेमा–नाटक या माध्यमात सादर केल्या जाऊ शकतात असा कथावस्तूचा त्यात आशय आहे. नानविध प्रसंग, घटना अन् जिवंत वर्णन यांनी नटलेल्या कथा वाचकांचं मनोरंजन तर करतीलच त्या बरोबर त्याचं जीवनविषयक उद्बोधन ही करतील ही या कथा संग्रहाची जमेची बाजू आहे. श्री. यशवंत कदम यांच्या या कथा संग्रहाच वाचक स्वागत करतील अशी आशा आहे. त्यांच्या भविष्यातील लेखन कार्यास माझ्या अनेक शुभेच्छा...!

**रविराज गंधे**
लेखक, माध्यमतज्ञ

कोमल प्रकाशन